



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय


■ अमरावती, बुधवार ११ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# दादांचा अपघात नव्हे १०० टक्के घात !-रोहित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अपघात नेमका कसा झाला? यासंदर्भात अद्यापही अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यातच आज त्यांचे पुतणे तथा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी, मुंबईत पत्रकार परिषद घेत, पीपीटीच्या माध्यमाने, अजित दादा यांच्या विमान अपघातासंदर्भात, 'मला असे वाटते की, हा अपघात नाही, हा १०० टक्के घात असू शकतो,' असे म्हणत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.



**जर टेक ऑफ पुण्याचे एअरपोर्ट बॅकअप पकडून केले असेल, तर तेथे लँड करण्याचा प्रयत्न का झाला? -** त्यामुळे दादांचा दौरा का बदलला? विमानाची वेळ बदलली गेली का? पायलट खरंच बदलले का? का बदलले? असे काही प्रश्न आहे. मग त्यानंतर, केंद्रीय विमान मंत्रालयाचा अहवाल आलाय का आणि या अहवालामध्ये विसंगती आली का? त्याच्यामध्ये फरक आलेला आहे. मधील वेळेची विसंगती का आली? पायलट रडाच्या एक मिनिट आधीच तो ट्रान्सप ?न्डर का बंद झाला? की बंद केला गेला? व्हिजिबिलिटी कमी असताना सुद्धा टेक ऑफ का झाले? जर टेक ऑफ पुण्याचे एअरपोर्ट बॅकअप पकडून केले असेल तर तेथे लँड करण्याचा प्रयत्न का झाला? असे अनेक गंभीर प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केले.

***रनवे ११ च का मागितला? -*** दरम्यान, रनवे एकोणतीस असताना, सुरक्षित असताना, फ्लॅट असताना, कुठलेही टेन्शन तेथे नसताना, तेथे सूर्याचा पण त्रास नसताना सारखे सारखे 'मला रनवे ११ पाहिजेल,' असे त्याठिकाणी सांगण्यात आले. असेही रोहित पवार यांनी यावेळी सांगितले.

**'हा अपघात नाही, हा १०० टक्के घात असू शकतो -** आधीच विमान कमी उंचीवर आणले गेले होते का? त्यानंतर शेवटच्या काही मिनिटात जो मुख्य पायलट आहे, एवढी घटना, जमीन जवळ येतीये, विमान टिल्ट होतेय, तिथे बंद पडतेय विमान, तरी तुम्ही काहीच बोलत नाही. याचा अर्थ काय? तर याचा अर्थ काढ गेलं तर मी सामान्य परिवारातला एक व्यक्ती म्हणून नाहीतर सामान्य व्यक्ती ज्याचे कुठलेट टेक्निकल बॅग्राउंड नाही, मला असे वाटते की 'हा अपघात नाही, हा १०० टक्के घात असू शकतो आणि हीच माहिती आम्हाला सगळ्या तपास संस्थांकडून हवी आहे.

## अपघात 8.43 ला मग दादांच्या घडाळ्यात 9 का वाजलेले?





दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघातानंतर रोहित पवारांनी आज अजित पवारांचा अपघात की घातपात यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत पत्रकार परिषद घेतली. यामध्ये त्यांनी विमान कंपनी, डीजीसीए यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. २०२३ चा मुंबईतील या कंपनीच्या विमान अपघाताचा अहवाल दाबला नसता तर आज अजित पवार जिवंत असते, असा आरोप रोहित यांनी केला आहे. तसेच आपल्याला घातपातच जास्त असल्याची शंका येत असल्याचे रोहित पवार यांनी स्पष्ट केले. अजित पवारांच्या काही गोष्टी अपघातानंतर सापडल्या. त्यात त्यांचा जळालेला स्वेटर, घड्याळ होते. या घडाळ्यात ९ वाजले होते, असे रोहित पवार म्हणाले. विमान अपघात ८.४३-८.४५ या कालावधीत झाला तर मग अजित पवारांच्या मनगटातील घड्याळामध्ये ९ का वाजलेले होते, असा सवाल करत त्यांनी या शंकेचे निरसन केले. 'अजितदादांचे घड्याळ नेहमी १५ मिनिटे पुढे असायचे, पण अपघातात ते बरोबर ९ वाजता बंद पडले,' असे रोहित पवार म्हणाले.

**'ती बॉडी दादांची नसावी...**

'अपघातानंतरचे सहा दिवस रोहित पवारांसाठी अत्यंत क्लेशदायक होते. 'घटनास्थळी जो मृतदेह सापडला, तो पाहून माझं मन मानायला तयार नव्हतं की ते दादा आहेत. ते कुठूनतरी परत येतील, मी त्यांना ⇨(पान २ वर)

# 6 मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प

■ अधिवेशनात 20 दिवसांचे कामकाज
■ संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय





**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय २३ फेब्रुवारीला सुरू होणार असून २० दिवसांच्या या अधिवेशनात ६ मार्च रोजी राज्याचा सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ फब्रुवारी पासून मुंबईत सुरु वात होत आहे. या पार्श्वभूमीवर आज विधानभवनात संसदीय कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत विधानसभा आणि विधानपरिषदेचे कामकाज निश्चित करण्यात आले. ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थ खाते स्वत:कडे ठेवले आहे. त्यामुळे तेच यंदाचा अर्थसंकल्प सादर करतील असे दिसते. अधिवेशन २५ मार्च पर्यंत म्हणजे जवळपास एक महिना चालणार असले तरी प्रत्यक्ष कामकाज २० दिवसांचे आहे. अधिवेशन काळात होळी, गुढीपाडवा अशा सुट्ट्या येत असल्याने अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात म्हणजे शनिवारी २८ फेब्रुवारी रोजी दोन्ही सभागृहाचे कामकाज सुरु राहणार आहे. १ ते ३ मार्च दरम्यान होळीची सुट्टी देण्यात आली आहे. त्यानंतर १९ मार्च (गुढपाडवा), २० (शुक्रवार), २१ (शनिवार) आणि २२ मार्च (रविवार) असे सलग चार दिवस सभागृहाचे कामकाज बंद ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर तीन दिवसांनी म्हणजे २५ मार्च रोजी अधिवेशन संस्थगित केले जाईल. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील आदी उपस्थित होते.

## चंद्रपूरमध्ये भाजपच्या संगीता खांडेकर महापौर

**चंद्रपूर/ प्रतिनिधी-**चंद्रपूर महापालिकेत भाजपच्या संगीता खांडेकर अवघ्या एका मताने महापौर झाल्या. भाजप सत्ता स्थापन करणार आणि काँग्रेसचा गेम होणार हे अगोदरपासूनच मानले जात होते. चंद्रपूर महागनरपालिकेत सर्वाधिक जागा मिळवूनही काँग्रेसला विरोधी बाकावर बसण्याची नामुष्की आली आहे.



पक्षातील दुहीचा अपेक्षेप्रमाणे भाजपला फायदा झाला आहे. ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील वाद पार दिल्लीपर्यंत पोहोचला होता. त्याचा फायदा भाजपने उचलला. तर ऐनवेळी उद्धव सेनेने काँग्रेसला हात दिल्याचे मानले जात आहे. त्यामुळे बहुमताचे गणित जुळवण्यात काँग्रेसला यश आले नाही. वंचित आणि एमआयएमच्या नगरसेवकांच्या भूमिकेने चंद्रपुरात पारडेच पालटले.

**संगीता खांडेकर एका मताने विजयी-** भाजपच्या संगीता खांडेकर या महापौरपदी निवडल्या गेल्या. त्यांना ३२ मते मिळाली. त्यांनी काँग्रेसच्या वैशाली महाडोळे यांचा अवघ्या एका मताने पराभव केला. महाडोळे यांना ३१ मते मिळाली. यावेळी वंचितचे दोन नगरसेवक गैरहजर राहिले. तर एमआयएमचा नगरसेवक तटस्थ राहिला. चुरशीच्या निवडणुकीत भाजपने ठाकरे सेनेच्या पाठिंब्याने महापौरपदाला गवसणी घातली.

## बांगलादेशात हिंदू व्यावसायिकाची हत्या

**ढाका/वृत्तसंस्था :** बांगलादेशमध्ये आणखी एका हिंदू व्यक्तीची क्रूर हत्या करण्यात आली आहे. सोमवारी (०९ फेब्रुवारी) रात्रीच्या सुमारास अज्ञातांनी हिंदू व्यावसायिकाची हत्या केली. देशात संसदीय निवडणुकीचे वातावरण असताना सातत्याने हिंदू नागरिकांच्या होणा-या हत्येच्या घटना चिंतेच्या विषय ठरल्या आहेत. मतदानासाठी तीन दिवस उरले असताना मायमेन जिल्ह्यात ही घटना घडली आहे.



***एकाच ठिकाणी दोन हिंदूंची हत्या-*** सुशेन चंद्र सरकार (वय ६२) असे हत्या झालेल्या हिंदू व्यावसायिकाचे नाव आहे. सुशेन सरकार तांदूळ व्यापारी होते अशी माहिती समोर आली आहे. भाई भाई एन्टरप्राईसचे ते मालक होते. सरकार यांची हत्या करण्यात आली त्याच ठिकाणी यापूर्वी दिपू चंद्रा दास या हिंदू व्यक्तीची हत्या करण्यात आली होती. जमावाने अमानुष मारहाण करत दिपू चंद्राला ठार केले होते. मायमेन जिल्ह्यातील बाजाराच्या मध्यभागी सरकार यांची हत्या करण्यात आली. सोमवारी रात्री अकराच्या सुमारास ही घटना घडली. अज्ञातांनी सरकार यांना दुकानात गाठून धारदार शस्त्राने वार करत हत्या केली. हल्लेखोरांनी दुकानातून लाखो रु पयांची रोकड देखील लंपास केल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. दुकानाचे शटर बंद करु न सरकार यांच्यावर हल्ला करण्यात आला, अशी माहिती पोलिसांनी एका इंग्रजी वृत्तपत्राला दिली. कुटुंबीयांना दुकानात रक्ताच्या थारोळ्यात पडलेला सरकार यांचा मृतदेह आढळून आला. सरकार यांना उपचारासाठी रु ग्णालयात दाखल करण्यात आले पण, त्यांना मृत घोषित करण्यात आले, असे पोलिस म्हणाले.

आम्ही गेल्या अनेक वर्षापासून तांदळाचा व्यापार करत आहोत. आमच्याशी कोणाची दुश्मनी नव्हती. हल्लेखोरांना दुकानात वडिलांवर हल्ला करु न त्यांची हत्या केली. खून केल्यानंतर दुकानातून रोकड देखील चोरी केली, असे मृत सरकार यांचा मुलगा सुजान सरकार यांनी माहिती देताना म्हटले आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून, उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात ठेवण्यात आल्याचे सुजीत म्हणाले. बांगलादेशध्ये केंद्रीय निवडणुकीसाठी गुरु वारी मतदान होत आहे. मोहम्मद युनिस यांच्या अंतरिम सरकारमध्ये हिंदूंवर वाढते हल्ले चिंताजनक असल्याचे मत आंतरराष्ट्रीय स्तरावरु न व्यक्त केले जात आहे. ऑगस्ट २०२४ नंतर हिंदूंवरील हल्ल्यात वाढ झाली आहे. अल्पसंख्याक नागरिकांवरील हल्ले आणि देशातील लोकशाहीची मूल्ये यावरु न सवाल उपस्थित केला जात आहे. ऑगस्ट २०२४ पासून बांगलादेशमध्ये हजारो हिंदू नागरिकांवर जीवघेणे हल्ले करण्यात आले आहेत. यात अनेकांचा खून देखील झाला. भारताने बांगलादेशात हिंदूंवर होणा-या हल्ल्यांवरु न चिंता व्यक्त केली आहे.

## सुनेत्रा पवारांनी स्वीकारला उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर निर्माण झालेली मोठी जबाबदारी सुनेत्रा पवार यांनी स्वीकारली आहे. सुनेत्रा पवार यांनी आज अधिकृतपणे उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारला आहे. मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील ज्या दालनातून अजित पवार कामकाज पाहत होते, त्याच दालनात सुनेत्रा पवार यांनी आज प्रवेश केला. त्यावेळी त्या आणि मुलगा पार्थ भावूक झाले होते.आपल्या दालनात प्रवेश करण्यापूर्वी सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करू न अभिवादन केले आणि नतमस्तक झाल्या. यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व दिग्गज नेते उपस्थित होते. यामध्ये प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे आणि पार्थ पवार यांचा समावेश होता. दरम्यान, उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी सुनेत्रा पवार यांनी सकाळी सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले आणि चैत्यभूमीवर जाउन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. आज पदभार स्वीकारल्यानंतर त्या पहिल्या कॅबिनेट बैठकीला उपस्थित राहणार आहेत, जिथे त्या आपल्या खात्याचे पहिले निर्णय घेउ शकतात. आज संध्याकाळी सुनेत्रा पवार दिल्लीला रवाना होणार असून, तिथे त्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्याची शक्यता आहे.



## विमानाचा रस्त्यावरच इमर्जन्सी लँडिंग

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**अमेरिकेमधील जार्जिया राज्यात एका विमानाचा अपघात मोठा अपघात टळला. गैनेस्विल ली गिल्मर मेमोरियल एअरपोर्टवरू न या विमानाने उड्डाण केले होते. ते कँटनमधील चेरोकी काउंटी प्रादेशिक विमानतळावर उतरणार होते. पण, त्यापूर्वीच त्यात बिघाड झाला आणि विमानाचे लँडिंग करावे लागले.



एक इंजिन असलेले या विमानात हवेत असताना हवेत असताना बिघाड झाला. इंजिनमध्ये बिघाड झाल्याची माहिती पायलटने अमेरिकेतील फेडरल एव्हिशन ॲडमिनिस्ट्रेशनला दिली. ९ जानेवारी रोजी ही घटना घडली. गैनेस्वील पोलिसांनी सांगितले की, लहान विमान वाहनांची वर्दळ असलेल्या रस्त्यावरच अचानक उतरवण्यात आले. त्यामुळे अनेक वाहनांना ते धडकले. यात काही वाहनांचे नुकसान झाले असून, काही जण जखमीही झाले आहेत. हाकर बीचक्राफ्ट बीई ३६ विमानाच्या इंजिनमध्ये स्थानिक वेळेनुसार दुपारी १२.१० वाजता बिघाड झाला होता. या विमानाचे लँडिंग⇨(पान २ वर)

## अविश्वास प्रस्तावाचा निकाल लागेपर्यंत ओम बिर्ला अध्यक्षस्थानी बसणार नाहीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** विरोधी पक्षाने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणल्यानंतर त्यांनी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि नैतिक निर्णय घेतला आहे. जोपर्यंत सभागृहात या अविश्वास प्रस्तावावर अंतिम निकाल लागत नाही, तोपर्यंत आपण अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसणार नाही, अशी घोषणा ओम बिर्ला यांनी केली आहे. विशेष म्हणजे, नियमांनुसार अशी कोणतीही सक्ती नसतानाही बिर्ला यांनी हा निर्णय घेतल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

***९ मार्चला होणार महत्त्वाची चर्चा-*** बजेट सत्राच्या दुस-या टप्प्यातील पहिल्या दिवशी, म्हणजेच ९ मार्च रोजी लोकसभा अध्यक्षांना पदावरू न हटवण्याच्या प्रस्तावावर चर्चा होण्याची शक्यता आहे. या प्रस्तावासाठी किमान ५० खासदारांचे समर्थन आवश्यक असते. त्यानंतर पीठासीन अधिकारी या प्रस्तावावर चर्चा घडवून आणू शकतात. ओम बिर्ला यांनी मंगळवारीच लोकसभा सरचिटणीसांना या प्रस्तावाची कायदेशीर तपासणी करू न योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. काँग्रेससह ११८ खासदारांची स्वाक्षरी-काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी मंगळवारी दुपारी १:१४ वाजता 'नियम ९४सी' अंतर्गत लोकसभा अध्यक्षांविरु द्ध अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिली. काँग्रेस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकूण ११८ खासदारांनी या नोटीसवर स्वाक्षरी केली असून अध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विरोधी पक्षाने लोकसभा अध्यक्षांवर पक्षपातीपणाचा गंभीर आरोप केला आहे. प्रामुख्याने चार महत्त्वाच्या मुद्द्यांवरू न विरोधक आक्रमक झाले आहेत:राहुल गांधींना बोलू न देणे: राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना चीन सीमावादावर लष्करी संदर्भातील पुस्तकाचा उल्लेख करू दिला नाही, असा आरोप आहे. आठ खासदारांच्या निलंबनाचा मुद्दाही विरोधकांनी लावून धरला आहे. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी माजी पंतप्रधानांवर केलेल्या वैयत्तिक्र टीकेकडे अध्यक्षांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. ⇨(पान २ वर)






## मणिपूरमध्ये पाच दिवसांसाठी इंटरनेट बंद

### दंगलखोरांनी 25 घरे आणि चार सरकारी निवासस्थाने जाळली, जिल्ह्यात संचारबंदी लागू

**इम्फाळ/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मणिपूरमध्ये नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर एका आठवड्याच्या आत हिंसाचार उसळला. दंगलखोरांनी उखरु ल जिल्ह्यातील लितान सरेइखोंग गावात २५ घरे आणि चार सरकारी क्वार्टरला आग लावली.हिंसाचारानंतर संपूर्ण जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली. १० फेब्रु वारी रोजी सकाळी ११:३० वाजल्यापासून पुढील पाच दिवसांसाठी इंटरनेट सेवा बंद करण्यात आल्या आहेत. तांगखुल आणि कुकी जमातींमधील हिंसक संघर्षानंतर परिसरात सुरक्षा दल तैनात आहेत.हिंसाचाराची सुरु वात ७ फेब्रु वारी रोजी संध्याकाळी लितान सरेइखोंग येथे दारूच्या नशेत झालेल्या भांडणातून झाली होती, ज्यात तांगखुल नागा समुदायाच्या स्टर्लिंग नावाच्या व्यक्तीला मारहाण करण्यात आली होती.



**लितानमध्ये जाळपोळीनंतर संचारबंदी-**उखरु ल जिल्ह्यातील लितान परिसरातील गावांमध्ये उपद्रवींनी अनेक घरांना आग लावली. पोलिसांनी सांगितले की, हिंसाचारादरम्यान रायफलमधून गोळीबारही करण्यात आला. परिसरात दहशत पसरल्यानंतर संचारबंदी लागू करण्यात आली. सध्या परिस्थिती तणावपूर्ण आहे, परंतु मोठ्या प्रमाणात सुरक्षा दलांच्या तैनातीमुळे ती ब-याच अंशी नियंत्रणात आहे.तणाव वाढण्याच्या शक्यतेमुळे लोकांनी कोणत्याही प्रशासकीय मदतीशिवाय स्वतःहून घरे सोडण्यास सुरु वात केली आहे. अधिका-यांनी सांगितले की, लितान पोलिस ठाण्याने लोकांची सुरक्षित वाहतूक सुनिश्चित केली आणि कायदा व सुव्यवस्था राखली. हिंसाग्रस्त भागांमध्ये बीएसएफ, सीआरपीएफ आणि आसाम रायफल्सचे जवान तैनात करण्यात आले आहेत, तर अतिरिक्त सुरक्षा दलही पाठवण्यात आले आहेत.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेतही अमरावती विद्यापीठ अव्वल

## अमरावतीला सुवर्ण ,जालंधरला रजत, कालिकत व चंदिगड युनिर्व्हसिटीला कांस्य



**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली १ फेब्रुवारी पासून सुरू झालेल्या 'अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेचा मंगळवारी समारोप झाला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला संघाने सुध्दा सर्वांवार मात करत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदकाचा मान मिळविला. तर उपविजेता संघ लवली प्रोफेशनल युनिर्व्हसिटी, जालंधरने रजत पदक, कालिकत विद्यापीठ व चंदिगड युनिर्व्हसिटीने कांस्य पदक पटकाविले. यावेळी ट्रॉफी व पदके देवून मान्यवरांच्या हस्ते चारही चमूंना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सहभागी खेळाडूंचे कौतूक करुन खेळामध्ये जय-पराजय होत असतो, परंतु त्यामुळे खचून जावू नये. सहभाग देखील तितकाच महत्वाचा असून हा आपल्या जीवनातील महत्वाचा क्षण असतो असे सांगून पुरुष स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सुवर्ण पदक पटकाविले, तर महिला स्पर्धेतही अमरावती विद्यापीठाने सुवर्ण पदकाचा मान मिळवून राष्ट्रीय स्तरावर आपल्या विद्यापीठाचा नावलौकीक केला आहे. सर्व खेळाडू, प्रशिक्षक तसेच मार्गदर्शक यांचे त्यांनी भरभरुन कौतूक करुन अभिनंदन केले. समारोप समारंभामध्ये अध्यक्षीय भाषण करतांना ते मार्गदर्शन करीत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, उपाध्यक्ष जयवंत उर्फ भैय्यासाहेब पुसदेकर, कार्यकारिणी सदस्य सुरेशराव खोटरे, सुभाषराव बनसोड, प्राचार्य डॉ. जी.व्ही. कोरपे, प्राचार्य अंबादास कुलट, दिलीप तिरके, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, डॉ. रुपाली इंगोले आदी उपस्थित होते.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. दिलीपबाबू इंगोले म्हणाले, आपण सुध्दा व्हॉलिबॉल खेळाडू होतो व कालिकत विद्यापीठामध्ये झालेल्या स्पर्धेत आपण आपल्या संघाकडून खेळलो, असा उल्लेख करुन विजेता ठरलेल्या चारही टीम उत्कृष्ट आहेत. थोडयाशा फरकाने हारजीत होत असते व त्यातही सर्वांनी आपल्या खेळाचे चांगले प्रदर्शन केले आहे. स्पर्धेदरम्यान खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, मार्गदर्शक यांना आवश्यक त्या सुविधा देण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर चांगली मैदाने देखील आम्ही उपलब्ध करुन दिलीत, असेही ते म्हणाले.

यावेळी लवली प्रोफेशनल युनिर्व्हरसिटीची खेळाडू अनुराधा भिंगारे व संघ मार्गदर्शक प्रभारिका गौर यांनी मनोगत व्यक्त करतांना चांगल्या सुविधांबद्दल अमरावती विद्यापीठ तसेच आयोजक महाविद्यालयाचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी विविध विद्यापीठांच्या प्रशिक्षक, मार्गदर्शक, अम्पायर तसेच स्पर्धेच्या आयोजनासाठी परिश्रम घेणा-या सर्व शारीरिक शिक्षण संचालकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोपटे देवून सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट टिचर पुरस्कार कंचन (लवली प्रोशनल युनिर्व्हसिटी, जालंधर) बेस्ट कॅचर ममता (पंजाब विद्यापीठ), बेस्ट फास्टमॅन हन्सा मोल (कालिकत विद्यापीठ), बेस्ट सेकंड फास्ट मॅन सोनी (पंजाब युनिर्व्हसिटी, चंदिगड), बेस्ट थर्ड मॅन दिव्या (जालंधर विद्यापीठ), बेस्ट शॉट (नवदीप पंजाब विद्यापीठ, चंदिगड), बेस्ट लेफ्ट लॉक कमला (पंजाब युनिर्व्हसिटी, चंदिगड), बेस्ट सेंटर लॉक अश्विनी (कालिकत विद्यापीठ), बेस्ट राईट लॉक सँड्रा (कालिकत विद्यापीठ), ऑल राऊंडर क्षितिजा (संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ) यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शिक्षण महर्षि डॉ. भाऊसाहेब देशमुख व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने समारंभाची सुरूवात झाली. डॉ. रुपाली इंगोले यांनी स्पर्धेच्या शुभारंभापासूनची रुपरेखा सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवंतिका मानकर चौधरी व डॉ. रेखा मग्गीरवार यांनी, तर आभार क्रीडा संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे पदाधिकारी तसेच खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते.

# वायर चोरीचा गुन्हा २४ तासांत उघड

## तरुणासह विधिसंघर्षित बालक ताब्यात




**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नवीन बांधकामस्थळांवर सुरू असलेल्या इलेक्ट्रिक केबल वायर चोरीच्या घटनांचा गुन्हा अमरावती शहर गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत उघडकीस आणला आहे. या कारवाईत एका आरोपीसह विधिसंघर्षित बालकास ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून सुमारे ७० हजार रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांवर आळा घालण्याच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी गुन्हे उघडकीस आणण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण (गुन्हे शाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. दरम्यान, १० फेब्रुवारी रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात नवीन बांधकामस्थळावरून वायर चोरी झाल्याची नोंद झाली. या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना, गुन्हे शाखेला चवरे मार्केट परिसरात दोन इसम संशयास्पदरीत्या केबल वायरचे बंडल घेऊन थांबले असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करत गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपींकडून विविध प्रकारच्या इलेक्ट्रिक केबल वायर व तांब्याच्या तारा असा एकूण ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणात ईश्वर किशोर भोसले (वय २०, रा. मोगरा पारधी बेडा, ता. जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्यासोबत एक विधिसंघर्षित बालकही ताब्यात आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पीएसआय गजानन सोनुने, पोलीस हवालदार सुनील लासुरकर, दीपक सुंदरकर, जहीर शेख, सचिन बहाळे, नापोका अतुल संभे, पोकॉ सुरज चव्हाण, राजिक रायलीवाले तसेच चालक प्रभात पोकळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# दोन महिन्यांनी चोरीचा पर्दाफाश, चोर गजाआड

## -दोन मोबाईल फोन जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलिस स्टेशन हद्दीतील कामगार कॅम्प परिसरात झालेल्या मोबाईल व रोख रक्कम चोरी प्रकरणात गाडगेनगर डीबी पथकाने दोन महिन्यांनंतर एकाला अटक करून चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या प्रकरणात चांगापूर येथील कुणाल अरुण पारडे (वय ३१) याला अटक करण्यात आली असून, आरोपीकडून दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, मयूर राजेश साबळे (वय ३१, रा. रोढा, जि. वर्धा) हा नागपूर येथील चापेकर कंपनीत अकाउंटंट म्हणून कार्यरत आहे. तो अमरावतीतील कामगार कॅम्प येथे वास्तव्यास होता. १९ डिसेंबर रोजी कामगारांना पैसे दिल्यानंतर उर्वरित ३२ हजार रुपये रोख रक्कम व दोन मोबाईल फोन त्याने खोलीत ठेवले होते. याच दरम्यान अज्ञात चोराने ते चोरून नेले. याप्रकरणी गाडगेनगर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली होती. तपासादरम्यान डीबी पथकाला गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार चांगापूर येथील कुणाल पारडे याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीत आरोपीने चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून २३ हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, विजया पांढरे तसेच एपीआय मानकर, आशिष दौंड, नीलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद माळवे, सिद्धार्थ श्रृंगारे आणि सचिन गौरखेडे यांनी केली. पुढील तपास गाडगेनगर पोलीस करत आहेत.

# पेंशन समाधान उपक्रम, पेंशन अदालत उत्साहात



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा कोषागार कार्यालयातर्फे कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात आहरण व संवितरण अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी पेंशन समाधान उपक्रम आणि पेंशन अदालत उत्साहात पाडली.

कोषागार अधिकारी अमोल इखे अध्यक्षस्थानी होते. महालेखापाल नागपूर यांचे कार्यालयातील वरीष्ठ लेखाधिकारी मैथीली जगनाथन, सहायक लेखाधिकारी अनुपमा भटटाचार्य, लेखापाल सचिनकुमार, वरीष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा पवार उपस्थित होते.

महालेखापाल कार्यालयातील अधिकारी यांनी अचूक निवृत्ती वेतन प्रस्ताव कसे तयार करावेत, ज्यामुळे निवृत्ती वेतन व कुटुंबनिवृत्ती वेतनधारकांना वेळेवर लाभ प्रदान करण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी निवृत्तीवेतनविषयक प्रश्नांची तात्काळ सोडवणूक करुन देण्यात आली. तसेच शंकाचे समाधान करण्यात आले. उपस्थितांनी माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निवृत्तीवेतन प्रदाने तात्काळ करण्यासाठी महालेखाकार कार्यालय, कोषागार कार्यालय आणि संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी एकत्रितपणे कार्य करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

कनिष्ठ लेखापाल साजीया शमसू मोहम्मद यांनी प्रास्ताविक केले, त्यांनी निवृत्तीवेतन विहीत कालावधीत प्रदान करणेसाठी कोषागार कार्यालयाची भूमिका विषद केली. तसेच पेंशन समाधान उपक्रम आणि पेंशनअदालतीचे आयोजन करण्याचे उद्दीष्ट सांगितले. कनिष्ठ लेखापाल श्रुतिका तडस यांनी सूत्रसंचालन केले.

निवृत्तीवेतन धारकांकरीता पेंशन अदालत कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डी. आर. देशमुख, जगदीश सायसिकमल, विरेंद्र दिक्षीत आदी उपस्थित होते. वरीष्ठ लेखापाल राम जाधव यांनी प्रस्ताविक केले. यावेळी निवृत्तीवेतनधारक, तसेच कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. निवृत्तीवेतन धारकास घरपोच सेवा देण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. जगदीश सायसिकमल यांनी सेवानिवृत्त संघटनेच्या वतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे लाभ त्यांना विहीत कालावधीत मिळण्यासाठी कोषागार कार्यालय आणि महालेखाकार कार्यालय करीत असलेल्या उपक्रमांची प्रशंसा केली. विरेंद्र दिक्षीत यांनी मांडलेल्या तक्रारीची महालेखाकार कार्यालयाच्या चमूने तात्काळ सोडवणूक केली.

कनिष्ठ लेखापाल राधिका निरंतर यांनी आभार मानले. जगनाथन यांनी उपस्थित निवृत्तीवेतन धारकांच्या अडचणींची सोडवणूक केली. निवृत्तीवेतन प्रकरणामध्ये महालेखाकार कार्यालयाची भूमिका मांडली. कार्यक्रमासाठी कनिष्ठ लेखापाल सुबोध भगत, आदित्य सुरजूसे, लेखा लिपीक प्रणीत टिंगणे, सोनू राठोड, दिपक चव्हाण यांनी पुढाकार

## १ व १० वरिल उर्वरित

### अपघात ८.४३ ला मग

घट्ट मिठी मारेन, असंच मला वाटत होतं. पण तिथे सापडलेला त्यांचा तो अर्धवट जळलेला स्वेटर, त्यांची चप्पल आणि ते घड्याळ पाहून सत्याचा स्वीकार करावा लागला,' असे रोहित पवार यांनी सांगितले.

अपघाताची टाईमलाईन (रोहित पवारांच्या दाव्यानुसार):

सकाळी ७.५६: विमान रडारच्या संपर्कात आले.

सकाळी ८.१०: विमानाचे उड्डाण झाले.

सकाळी ८.३२: विमान सुपे गावाजवळ पोहोचले.

८.४३ ते ८.४५: विमानाचा अपघात झाला.

सकाळी ९ वाजता अपघाताची माहिती मिळाली.

सकाळी ९.४५: निधनाची पहिली अधिकृत माहिती समोर आली.

पायलटवर दबाव आणि सुरक्षेची ऐशीतैशी:

विश्रांतीचा अभाव: पायलटसाठी आवश्यक असलेला १२ तासांचा 'गॅप' पाळला जात नाही.

धमकावून उड्डाण: इन्सेंटीव्ह कापण्याची किंवा नोकरीवरून काढण्याची धमकी देउन वैमानिकांना विमानावर बसविले जाते.

तांत्रिक हेराफेरी: उड्डाणाच्या तासांमध्ये फेरफार करणे आणि विमानातील संभाषणाची रेकॉर्ड करणारी सीव्हीआर (CVR) यंत्रणा जाणीवपूर्वक बंद ठेवली जाते.

मेन्टेनन्समध्ये कपात: कॉस्ट कटिंगच्या नावाखाली विमानाची योग्य देखभाल (ग्क्लत्दद्यड्ढदठ्ठदड़्ढ) केली जात नव्हती.

### विमानाचा रस्त्यावरच इमर्जन्सी

करतानाचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. विमानामध्ये दोन पायलट होते. उड्डाण केल्यानंतर काही वेळातच इंजिनमध्ये बिघाड झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. विमान परत विमानतळापर्यंत नेण्यासाठी लागणारी शक्तीच निर्माण होत नसल्याचे त्यांना कळले. त्यांनी लगेच रस्त्यावर विमान उतरवण्याचा निर्णय घेतला. विमान लँड होण्याच्या काही सेंकद आधीच जमिनीवर आदळले आणि समोर रस्त्यावरील दुभाजकाला जाउन धडकले. त्यानंतर इतर गाड्यांना विमान धडकले. यात काही लोक जखमी झाले आहेत. पोलिसांनी तातडीने जखमी रुग्णालयात दाखल केले.

### अविश्वास प्रस्तावाचा निकाल

काही काँग्रेस खासदार पंतप्रधानांच्या जागेपर्यंत येउन अनुचित प्रकार करतील, अशी माहिती मिळाल्यामुळे मीच मोदींना सभागृहात न येण्याची विनंती केली, असे विधान बिर्ला यांनी केले होते; यावरूनही विरोधकांनी संताप व्यक्तकेला आहे. आता ९ मार्चला संसदेत काय घडते आणि ओम बिर्ला यांच्या भवितव्याचा काय निकाल लागतो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

### बारावीची परीक्षा 'कॉपीमुक्त'

नियुक्ती करण्यात आली आहे.

आज जिल्हाधिकारी अशिष येरेकर यांनी अमरावतीतील विद्याभारती येथील परीक्षा केंद्राला भेट दिली. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी नांदगाव पेठ येथील दोन केंद्राची पाहणी केली. कोणत्याही केंद्रावर बाहेरून असामाजिक तत्वांचा उद्रेक आढळून आला नाही.

जिल्हा प्रशासनाने धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील केंद्रांवर लक्ष ठेवण्यासाठी आयएफएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज उपवनसंरक्षक अग्रीम सैनी, निता कट्टे, किर्ती जमदाळे यांनी परिसरातील परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. तसेच मेळघाटातील उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार यांनी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या.

केवळ शिस्तच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सोयीचाही विचार प्रशासनाने केला आहे. परीक्षा कालावधीत विद्युत पुरवठा अखंडित रहावा आणि परिवहन विभागाने विद्यार्थ्यांना केंद्रावर पोहोचण्यासाठी सहकार्य करावे, असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. परीक्षेत कॉपी किंवा इतर गैरप्रकार आढळल्यास संबंधितांविरुद्ध 'महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टिस ॲक्ट १९८२'च्या कलम ८ सह भारतीय दंड विधानाच्या कलम ३४, १८८ व १२७ नुसार गुन्हे दाखल करण्यात येतील. बारावीच्या परीक्षा केंद्रावर अनुचित आणि कॉपीचा प्रकार होत असल्यास याची माहिती जिल्हा प्रशासनाला द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

### शाळेतून परतणाऱ्या अल्पवयीन

, काही महिन्यांपूर्वी ही अल्पवयीन विद्यार्थिनी शाळेतून घरी जात असताना तिच्या भावाच्या ओळखीतील दोन तरुणांनी तिचा रस्ता अडवला. बदनामीची धमकी देत त्यांनी तिला निर्जन ठिकाणी नेले आणि बळजबरीने लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर घटनास्थळी आणखी तीन तरुण आले व त्यांनीही पीडितेवर अत्याचार केल्याचा आरोप आहे. भीती आणि धमकीमुळे पीडितेने हा प्रकार कुणालाही सांगितला नाही. मात्र मागील तीन महिन्यांपासून मासिक पाळी थांबल्याने कुटुंबीयांनी तिला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल केले. तपासणीत अल्पवयीन तीन महिन्यांची गर्भवती असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. त्यानंतर पीडिता व तिच्या कुटुंबीयांनी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे अंजिक्य, कार्तिक व संकेत यांना अटक करण्यात आली असून, दोन अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

### जनता दरबार आयोजित करून

नागरिकांनी यावेळी लेखी स्वरूपात मांडल्या. भोगवटा धारकांचा शासन स्तरावर पाठपुरावा करून जागेचा पट्टा व आठ ची नोंद करून चार महिन्यात लाभ देण्याचे प्रयत्न करणार असल्याचे नगराध्यक्षा यांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर, उपनगराध्यक्ष शेख जमिर, पाणीपुरवठा सभापती वासुदेव लोखंडे, बांधकाम सभापती मो. रियाज, स्वच्छता सभापती ज्योत्सना धवसे, महिला बालकल्याण सभापती कांता लोमटे, उपसभापती शिला वाडेकर नगरसेवक सर्व मो. साजिद, प्रकाश मरोटकर, आयेशा शेख, रजियाबी, अलमास बी, प्रांजली गुल्हाने, प्रिती इखार, मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांच्यासह न.पं. कर्मचारी व शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

### दारूच्या दुकानात सेवानिवृत्त

खाली पाडले. यामुळे त्यांच्या डोक्याला जबर मार लागला आणि यातच त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी तेथून पळून गेले. घटनेची माहिती मिळताच मंगरूळ दस्तगीर चे ठाणेदार शरद अहेर पथकासह घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक पथकाला घटनास्थळी बोलविण्यात आले होते. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी धामणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला. मृतक अनिल आव्हाड यांचे पुतणे अमोल किशोरराव आव्हाड (४०, समता नगर, सावंगी मेघे वर्धा) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तिन्ही आरोपींना उशिरा रात्री अटक केली. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे.

### महापालिकेत शिंदे सेनेसह

१ सदस्य आहेत. महापौर-उपमहापौर निवडणुकीमध्ये भाजपा, युवा स्वाभिमान आणि राकॉं अजित पवार गटात युती झाली आहे. त्यामुळे मनपामध्ये महायुतीची सत्ता आली आणि भाजपाचे श्रीचंद तेजवानी महापौर झाले. सव्वा वर्षाचा फॉर्मुला यासाठी निर्धारित झाला आहे. या निवडणुकीनंतर आता शिंदे सेना आणि बसपा एकत्र आले आहे. ६ नगरसेवकांनी मिळून आपला एक नवीन गट निर्माण केला आहे. यापूर्वी मनपामध्ये ९ स्वतंत्र गटाची नोंदणी झालेली आहे.

### लाडकी बहीण योजनेसाठी

, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबतचा पर्याय निवडताना नजर चुकीचे पर्याय निवडण्यात आलेला आहे, अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईन ई-केवायसीमध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आली आहे. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अतुल भडांगे यांनी कळविले आहे.

### इंग्रजीच्या पेपरला विभागात

जिल्ह्यातील १३७ केंद्रावर ३५ हजार ९२९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा शांतीपूर्णरित्या संपन्न करण्यासाठी शिक्षा विभाग आणि पोलीस विभाग प्रयत्न करत आहे.अशात वाशिम जिल्ह्यातील केंद्रांवर २० विद्यार्थी कॉपी करताना पकडले गेले, तसेच अकोला, बुलढाणा मध्ये ही १-१ विद्यार्थ्यांना कॉपी करताना पकडले आहे. अमरावती मध्ये कॉपीचे एकही प्रकरण समोर आले नाही. प्रशासनाच्या वतीने कॉपी मुक्त अभियान चालविण्यात येत आहे. सीसीटीव्हीच्या देखरेखित परीक्षा घेतली जात आहे.

### दुपारी झोपण्यासाठी गेलेल्या

नातेवाईक आणि शेजाऱ्यांना बोलवले. शेजाऱ्यांच्या मदतीने रोहित गजभियेला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. जेथे डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. या संदर्भात नातेवाईकांच्या बयानावरून कोतवाली पोलिसांनी आकस्मिक मृत्यू चा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शरयू उबाले करत आहे. मृत्यूचे नेमके कारण अजून पर्यंत समोर आलेले नाही.

### चिखलदरा येथे पर्यटन विकासासाठा

सहकार्य करण्यात येईल. यासोबतच मेळघाटातील २२ गावांच्या विजेच्या प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाची परवानगी मिळताच इतर कामे करावीत. आमझरी मधाचे गाव म्हणून विकसित करण्यात येत आहे. येथे शबरी महामंडळाने रिसॉर्टसाठी एकत्रितरित्या कार्य केल्यास जादा पर्यटकांची सुविधा निर्माण होण्यास मदत होईल. तसेच जिल्ह्यात कोल्ड स्टोअरेज, संत्रा प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यात यावी, अशी सूचनाहीं येरेकर यांनी केली.

### महापौर तेजवानी यांनी घेतला

यांनी प्रत्येक मुद्द्यावर संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. शहरातील स्वच्छता अधिक प्रभावीपणे राबवावी, प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना वेळेत घरे मिळावीत, ई-बस सेवेद्वारे नागरिकांना सुरक्षित व पर्यावरणपूरक वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्यावी, यावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच महानगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी मालमत्ता कर वसुली प्रभावीपणे करण्याच्या सूचना दिल्या.

ट्रान्सपोर्ट नगर व बडनेरा येथील बाजारपेठा विकसित झाल्यास स्थानिक व्यावसायिकांना चालना मिळेल तसेच नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध होतील, असे मत यावेळी महापौरांनी व्यक्त केले. सर्व विकासकामे नियोजनबद्ध पद्धतीने व ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागांना दिले.

सर्व विभागांनी आपापल्या कामांचा नियमित आढावा घ्यावा व प्रगती अहवाल सादर करावा, अशा स्पष्ट सूचना महापौरांनी दिल्या.

या बैठकीस उपमहापौर सचिन भेंडे, अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, गटनेता चेतन गावंडे, गटनेता अविनाश मार्डीकर, गटनेता नाना आमले, गटनेता राजेंद्र तायडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, मालमत्ता अधिकारी सचिन मांडवे, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

### जानवी दाभाडे व झोया फातिमा

प्रा.अभिजीत पाखरे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. विद्यार्थिनींना विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधनात्मक उपक्रमांना नवे बळ मिळाले असून परिसरातून विद्यार्थिनींवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### राजपूत ढाबा मार्गावर

रुग्णालयात दाखल करताच मृत्यू झाला, तर दिनेश जोशी यांचा उपचारादरम्यान मध्यरात्री मृत्यू झाला, अशी माहिती गाडगेनगरचे पोलिस निरीक्षक अतुल वर यांनी दिली. अपघातप्रकरणी रोहित जनार्दन राऊत (वय २५, रा. कुंडखुर्द, ता. भातकुली) यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर अज्ञात बोलेरो वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नातेवाइकांच्या माहितीनुसार, भारत आठवले आणि दिनेश जोशी हे दोघेही एसटी वर्कशॉपमध्ये बस वॉशिंगचे काम करीत होते. रविवारी रात्री रात्रपाळीच्या ड्युटीकरिता जात असताना हा अपघात झाला. उत्तरीय तपासणीनंतर दोघांचेही मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांनी अपघातग्रस्त बोलेरो वाहन आणि चालकाचा शोध सुरू केला असून, पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहेत.

### राजापेठ परिसरात प्लास्टिक

आढळून आल्याने 'रघुवीर रिफ्रेशमेंट' या आस्थापनावर ५,००० रुपयांचा दंड आकारण्यात आला व वसूल करण्यात आला. सदर मोहिमेमध्ये प्लास्टिक नोडल अधिकारी विनोद टांक, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक श्रीकांत डवरे, स्वास्थ निरीक्षक धनिराम कलोसे, प्रशांत गावनेर, सचिन सैनी, मनिष हडाले, शैलेश डोंगरे व शक्ती पिवाल यांनी सहभाग घेतला.

महानगरपालिकेच्या वतीने शहर प्लास्टिकमुक्त ठेवण्यासाठी अशा मोहिमा यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## वाशिम जिल्हा पोलीस भरती प्रक्रिया आज पासून; १० हजारांहून अधिक उमेदवार सहभागी होणार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ तसेच पोलीस शिपाई चालक भरती २०२४-२०२५ संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली. सदर भरती प्रक्रिया मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ४.०० वाजता नविन पोलीस मुख्यालय, चिखली रोड, वाशिम येथील कवायत मैदानावर सुरू होणार आहे.**



या भरती अंतर्गत पोलीस शिपाई (जनरल) ३२ पदे, बॅण्डस्मन ०८ पदे (एकूण ४० पदे) तसेच पोलीस शिपाई चालक ०८ पदे भरण्यात येणार असून, यासाठी मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी अर्ज केले आहेत. पोलीस शिपाई संवर्गासाठी एकूण ४,८०६ उमेदवारांनी, तर पोलीस शिपाई चालक पदासाठी ५,१२० उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील या भरती प्रक्रियेकडे राज्यभरातील उमेदवारांचे लक्ष लागले आहे. पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी स्पष्ट केले की, भरती प्रक्रिया पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारे, निःपक्षपाती, पारदर्शक आणि शासनाच्या नियमानुसार राबविण्यात येणार आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी, शिफारस, नियमबाह्य हस्तक्षेप किंवा गैरप्रकाराला अजिबात थारा दिला जाणार नाही. भरती प्रक्रियेदरम्यान आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून, डमी उमेदवार आढळून आल्यास संबंधितावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

भरती करून देतो, नोकरी लावून देतो, ओळखीचा फायदा करून देतो अशा भूलथापांना उमेदवारांनी बळी पडू नये, असे आवाहन करताना, अशा प्रकारे कोणी लाच मागितल्यास किंवा प्रलोभन दिल्यास त्याची तक्रार वाशिम पोलीस नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र. ०७२५२-२३४८३४, तसेच पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम (दु.क्र. ०७२५२-२३५९३३, मोबा. ९९२२६७१०६४) येथे करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांनी त्यांना ऑनलाईन प्राप्त होणाऱ्या प्रवेशपत्रात नमूद केलेल्या तारखेला व वेळेवर अनिवार्यपणे उपस्थित राहावे. उशिरा हजर राहणाऱ्या किंवा अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना पुन्हा संधी दिली जाणार नाही, असेही सांगण्यात आले. उमेदवारांनी भरतीसाठी येताना सर्व मूळ कागदपत्रे, त्याच्या छायांकित प्रती (दि. ०७/१२/२०२५ पूर्वीची), आधारकार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र तसेच ५ पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे आवश्यक आहे. भरती परिसरात मोबाईल फोन बाळगण्यास सक्त मनाई असून, मोबाईल वापरताना आढळल्यास संबंधित उमेदवारावर कारवाई केली जाईल. तसेच चाचणी दरम्यान उमेदवारास कोणतीही शारीरिक इजा झाल्यास त्यास उमेदवार स्वतः जबाबदार राहील. उमेदवारांनी स्वतःच्या क्षमतेनुसार चाचणी पूर्ण करावी, तसेच मादक द्रव्यांचे सेवन केल्याचे आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट केले. दरम्यान, प्राप्त अर्जांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे .

पोलीस शिपाई (जनरल) पदासाठी प्राप्त अर्ज ३,०३४ त्यामध्ये पुरुष २५०६, महिला ५२८, पोलीस शिपाई बॅण्डस्मन पदासाठी प्राप्त अर्ज १७७२, पुरुष १,३४०, महिला ४३१, तर तृतीयपंथी ०१ अर्ज प्राप्त झाला आहे.

## महापुरुषांच्या छायाचित्रांवर प्रशासनाची धूळफेक!

### नगरपंचायतीच्या उदासीनतेमुळे मालेगावात जातीय तेढीचा धोका तहसीलदारांकडे तीव्र तक्रार

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

महापुरुषांच्या विचारांवर उभारलेल्या राज्यघटनेची शपथ घेणारेच प्रशासन आज त्या महापुरुषांच्या सन्मानाबाबत बधीर झाल्याचे चित्र मालेगावात दिसून येत आहे. मालेगाव नगरपंचायत कार्यालयात थोर महापुरुषांची छायाचित्रे सन्मानपूर्वक लावावीत, या मागणीसाठी दिलेल्या लेखी निवेदनाकडे प्रशासनाने तब्बल अनेक दिवस दुर्लक्ष केल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नगरपंचायत सदस्य गणेश रामप्रसाद आहिर यांनी दि. २३ जानेवारी रोजी महापुरुषांची छायाचित्रे स्वखर्चाने सप्रेम अर्पण करून ती कार्यालयात दर्शनी ठिकाणी लावण्याची लेखी मागणी केली होती. मात्र आजतागायत या निवेदनाची कोणतीही दखल न घेता प्रशासनाने मौन बाळगले असून, दिलेली छायाचित्रे अद्यापही कार्यालयात न लावणे ही बाब अत्यंत गंभीर व खेदजनक असल्याचे आहिर यांनी स्पष्ट शब्दांत नमूद केले आहे.



'ज्या समाजाने महापुरुष दिले, त्याच समाजाला त्यांच्या सन्मानासाठी प्रशासनाच्या दारात वारंवार उभे राहावे लागणे ही लोकशाहीची शोकांतिका आहे,' अशा तिखट शब्दांत त्यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. काही ठराविक महापुरुषांचीच छायाचित्रे टाळणे हे जातीय दुजाभावाला खतपाणी घालणारे असून, यामुळे मालेगाव शहरात जातीय तेढ निर्माण होण्याची गंभीर शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या निवेदनावेळी संदीप पखाले, संघपाल पखाले, इलियाज पठाण, शंकर रुमकर, सोनू जहिरव, तौसिक खान, अमीर पठाण, बबलू मालवी, शेख तनवीर, महेश पोपळघट, श्री सोनी तसेच महेश भुतडा हे सर्व मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे या प्रश्नाला केवळ वैयक्तिक नव्हे तर सामूहिक सामाजिक पाठबळ असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर आहिर यांनी तहसीलदार मालेगाव यांना दिलेल्या तक्रारीत तात्काळ हस्तक्षेप करून नगरपंचायत प्रशासनास स्पष्ट आदेश देण्याची मागणी केली आहे. तसेच १० दिवसांच्या आत लेखी कार्यवाही अहवाल देण्यात यावा व दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी ठोस मागणी केली .

## दास नवमी महोत्सवाला भक्तिरसाचा साज

### मालेगावात कीर्तन-गायनाने भाविक मंत्रमुग्ध



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील श्री समर्थ सेवा मंडळ, मालेगाव यांच्या वतीने गेल्या ६१ वर्षांपासून अखंडपणे साजरा होत असलेल्या दास नवमी महोत्सवानिमित्त आयोजित पाच दिवसीय गायन–कीर्तन कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. मंजुश्री खोंड (कीर्तन अलंकार), मालेगाव यांच्या प्रभावी कीर्तनाने कार्यक्रमाची मंगल सुरुवात झाली. समर्थ रामदास स्वामींच्या चरित्रातील दत्तदर्शनाचा प्रसंग त्यांनी अत्यंत भावपूर्ण व प्रभावी शैलीत उलगडून दाखविला. त्यांच्या ओघवत्या वाणीने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

दुसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. आसावरी श्रीधर रोडे (खोंड), पुणे यांनी 'संसारात कसे असावे?' या विषयावर समर्पक दाखल्यांसह कीर्तन सादर केले. विजय पांडुरंग आख्यान त्यांनी मार्मिक व रसपूर्ण पद्धतीने मांडले. 'जीवनात आसक्ती हीच नाशाला कारण आहे.

## जुन्या वादातून पंचशील नगर येथे दगडाने ठेचून खून

### काही तासांत आरोपी यश तोमर जेरबंद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहर पोलिस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी ९ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री पेट्रोलिंग करत असताना पंचशील नगरातील संत गाडगेबाबा शाळेजवळ एका इसमाचे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले प्रेत आढळून आले. डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले.

सदर इसम कोणतीही हालचाल करत नसल्याने पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ सुरक्षित करून तपास सुरू केला. आजूबाजूच्या नागरिकांकडून चौकशी केल्यानंतर मृत व्यक्तीची ओळख राजू तुळशीराम कांबळे (वय ३९, रा. पंचशील नगर) अशी पटली.



प्राथमिक अंदाजानुसार ही घटना रात्री १० ते १२ च्या दरम्यान घडली असावी. घटनेच्या उकलसाठी पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण केले. 'लुशी' नावाच्या श्वानाने थेट संशयिताच्या घरापर्यंत मार्ग दाखवला. मात्र तेथे आरोपी आढळून न आल्याने पोलिसांनी त्याच्यासोबत असलेल्या एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेऊन चौकशी केली. या चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली. अल्पवयीन मुलाने सांगितले की, यश तोमर (ठाकूर), वय २०, रा. पंचशील नगर यानेच राजू कांबळे यांच्या डोक्यात दगड घालून हत्या केली. त्यानंतर पोलिसांनी यश तोमरला तात्काळ ताब्यात घेतले. तपासात असे निष्पन्न झाले की, राजू कांबळेचे यश ठाकूरसोबत जुने वाद होते. यातून 'एकदाचा कायमचा काटा काढण्याच्या' मानसिकतेतून यशने ही हत्या केल्याची कबुली दिली आहे. या प्रकरणी वाशिम शहर पोलीस ठाणे येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला . ही संपूर्ण कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलिस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच पोलिस निरीक्षक प्रदीप परदेशी, संजय चौधरी, जितेंद्र आडोळे व त्यांचे पथक व डॉग हॅन्डलर शेषराव शेजुळकर आणि सुभाष इंगोले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## गण गण गणात बोतेच्या गजराने दुमदुमली राहुलपार्क नगरी




■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील राहुल पार्क सोमठाणा येथील श्री गजानन महाराज मंदिर यांच्या वतीने सात दिवसीय विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये श्रीमद भागवत कथा, सामूहिक पारायण, काकडा आरती, महिला भजन, हरिपाठ, पालखी मिरवणूकीने रंगत आणत गण गण गणात बोतेच्या गजराने राहुलपार्क नगरी दुमदुमली होती. सायंकाळी सात वाजता श्रीच्या प्रकटदिनी मानोरा पोलीस निरीक्षक नैना पोहेकर यांचे हस्ते महाआरती करण्यात आली. राहुल पार्क सोमठाणा येथील श्री गजानन महाराज मंदिर येथे सात दिवसीय धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान दिनांक ८ फेब्रुवारी रोजी श्रीच्या प्रकटदिनी मानोरा पोलीस निरीक्षक नैना पोहेकर यांचे हस्ते महाआरती करण्यात आली.

## 'दृष्टी शुद्ध असेल तरच जीवन शुद्ध' - श्रीराम महाराज चिखलीकर



■ प्रतिनिधी | मानोरा ■

संत श्री सेवालाल महाराज जयंतीनिमित्त मानोरा तालुक्यातील हळदा गावामध्ये सुरू असलेल्या श्रीमद् भागवत कथा सप्ताहात तिसऱ्या दिवशी भावपूर्ण आणि बोधप्रद कथाकथन झाले. अनाम कबीर पंथी , ह.भ.प. श्रीराम महाराज चिखलीकर यांनी श्रीमद् भागवत कथेतील आजामील (अजामील) ब्राह्मणाची कथा प्रभावीपणे मांडत मानवी जीवनात दृष्टीचे महत्त्व विशद केले.

महाराजांनी कथेतून सांगितले की, मनुष्य जे पाहतो त्यातूनच त्याचे विचार आणि आचरण घडत असते. जर पाहण्याची दृष्टी शुद्ध नसेल, तर डोळ्यांद्वारे पाप शरीरात प्रवेश करते आणि माणूस अधःपतनाकडे जातो. या संदर्भात महाराजांनी एक दृष्टांत सांगितला. एक संन्याशी कठोर तपश्चर्या करीत असताना त्याची तपश्चर्या पूर्ण होईल या भीतीने इंद्राला चिंता वाटली. त्यावेळी इंद्राने पारध्याचे रूप धारण करून त्या संन्याशाची तपश्चर्या भंग करण्याचा डाव रचला. पारध्याने आपला धनुष्य त्या संन्याशासमोर ठेवून तो घेण्यासाठी परत येतो असे सांगून निघून गेला; मात्र तो परत आलाच नाही. धनुष्य समोर असल्याने संन्याशाची दृष्टी वारंवार त्याकडे जाऊ लागली. कालांतराने त्या धनुष्याविषयी मोह निर्माण झाला आणि एक दिवस संन्याशाने ते उचलून निशाणा साधला. पुढे तो उडणाऱ्या पक्ष्यांना मारू लागला आणि अशा प्रकारे त्याची तपश्चर्या भंग पावली. याच कथेशी साधर्म्य सांगत महाराजांनी आजामील ब्राह्मणाची कथा उलगडली. वेदशास्त्रांचा अभ्यास करणारा, कथा-कीर्तन व भागवत करणारा आजामील ब्राह्मण एका स्त्रीच्या संगतीत पडला.


## लहान मुलांमध्ये मोबाईलचे वाढते आकर्षण : आरोग्यासाठी धोक्याची घंटा

### सतत स्क्रीन आणि वेगवान व्हिडिओंचा मेंदूवर गंभीर परिणाम

■ स्वप्निल सरकटे ■

**अकोट :** डिजिटल युगात मोबाईल हा जीवनाचा अविभाज्य भाग झाला असला, तरी लहान मुलांमध्ये वाढत चाललेले मोबाईलचे आकर्षण भविष्यासाठी चिंताजनक ठरत आहे. दोन ते पाच वर्षांच्या वयातच मोबाईल, युट्यूब, गेम्स आणि रील्सशी जवळीक साधणारी पिढी तयार होत असून, याचा थेट परिणाम मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

घरात पाहुणे आले की अनेक पालक अभिमानाने 'आमचे मूल स्वतः मोबाईल चालवते' असे सांगतात. मात्र या कौतुकामागे दडलेले धोके दुर्लक्षित होत आहेत. सतत स्क्रीनकडे पाहण्यामुळे लहान वयातच डोळ्यांवर ताण पडत असून, कमी वयात चष्मा लागण्याचे प्रमाण वाढले आहे. डोळे कोरडे पडणे, डोकेदुखी, चिडचिड, झोप न लागणे यांसारख्या तक्रारी वाढत असल्याचे



बालरोग व नेत्ररोग तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

डोळ्यांपुरतेच नव्हे, तर मेंदूच्या कार्यक्षमतेवरही मोबाईलचा परिणाम होत आहे. सतत बदलणारे व्हिडिओ, झटपट रील्स आणि गेम्स यामुळे मेंदूला त्वरित उत्तेजनाची सवय लागते. परिणामी वाचन, अभ्यास किंवा एखाद्या विषयावर एकाग्रतेने विचार करण्याची क्षमता कमी होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पालकांच्या मते आजची मुले लवकर विसराळू होत चालली आहेत. मोबाईलमुळे थेट विस्मरणाचा आजार होतो असे म्हणणे अतिशयोक्ती ठरेल, मात्र तयार माहिती सहज उपलब्ध झाल्याने लक्षात ठेवण्याची सवय कमी होत असल्याचे वास्तव आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे क्षणात उत्तरे मिळत असली, तरी विचार करण्याची, शोध घेण्याची आणि परिश्रम करण्याची सवय कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तंत्रज्ञानाचा विरोध करणे हा उपाय नसून, त्याचा मर्यादित व शिस्तबद्ध वापर गरजेचा असल्याचे तज्ज्ञ सांगतात. लहान मुलांसाठी स्क्रीन टाइम निश्चित करणे, झोपण्यापूर्वी मोबाईल टाळणे, तसेच मैदानी खेळ, पुस्तक वाचन, चित्रकला, संगीत यांसारख्या सर्जनशील उपक्रमांना प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे.

पालकांनी स्वतः मोबाईल वापरात संयम दाखवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. घरात संवाद, एकत्र जेवण, गोष्टी सांगणे आणि खेळ यांना प्राधान्य दिल्यास मुलांचे मानसिक व शारीरिक आरोग्य अधिक सक्षम राहते.

दोन वर्षांचे मूल मोबाईल हाताळते, हे क्षणिक कौतुक असू शकते. मात्र विचारशील, सर्जनशील, निरोगी आणि आत्मविश्वासू पिढी घडवणे हेच खरे यश आहे. तंत्रज्ञान साधन म्हणून वापरूया, पर्याय म्हणून नव्हे. मोबाईल आपल्या हातात असावा, आपण मोबाईलच्या हातात नसावे, हीच जाणीव भविष्यासाठी आवश्यक आहे.


## जाहिर नोटीस

अर्ज क्रं. ०३३/ कलम ४७ / २०२५

**श्री.बालाजी मंदिर संस्थान ट्रस्ट, मंगरूळपीर, ता. मंगरूळपीर जि.वाशिम**

नों. क. ए-३३८ / अकोला

**अर्जदार :-** श्री. विनायकराव रामराव गवळी + ४

**विरुध्द**

**गैरअर्जदार :-** श्रीमती. नलीनी प्रभाकर दयाल (मयत)

सर्व सबंधित लोकांना कळविण्यात येते की, मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे दिनांक ०७/०१/२०२६ रोजीचे आदेशान्वये वरील नमुद न्यासात महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४७ प्रमाणे नवीन विश्वस्तांची नेमणुक करावयाची आहे. सदरच्या न्यासात विश्वस्त होण्यासाठी खालील लोकांनी मा. धर्मादाय सहआयुक्त, अमरावती यांच्याकडे अर्ज केला आहे. १. श्री. विनायकराव रामराव गवळी रा.सपटगांव, तालुका शेगांव, जि. हिंगोली २. श्री. अशोकराव विश्वनाथ शिंदे रा.मंगलधाम, चौभुजी हनुमान मंदिर, मंगरूळपीर ता. मंगरूळपीर जि.वाशिम ३. श्री. गोपाल विश्वनाथराव शिंदे रा. हुडको कॉलनी, ता.मंगरूळपीर जि.वाशिम ४.श्री.सुधाबाई विष्णुपंत डाके रा.लक्ष्मी विहार कॉलनी, अकोला रोड, पोस्ट, मंगरूळपीर जि.वाशिम ५. श्री. वृंदा शिवानंद देवकर रा. हुडको कॉलनी, ता.मंगरूळपीर जि.वाशिम

सदरच्या न्यासात जर कोणालाही विश्वस्त होण्याची इच्छा असेल तसेच वरील चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयावयाचा असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व चौकशी पूर्ण करून अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिल्या जातील. हि नोटीस माझे सहीनीशी व मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दि. ०४/०२/२०२६ रोजी काढण्यात आली.

(शिक्का)

**अधिक्षक (न्याय)**
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय अमरावती


## अजितदादा पवार विमान अपघातप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी

### आमदार अमोल मिटकरी यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन; सकारात्मक आश्वासन



■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या दुर्दैवी विमान अपघाताने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. ही घटना केवळ अपघात होती की त्यामागे काही नियोजन होते, याबाबत राज्यभरात शंका व्यक्त होत असून नागरिकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणाची तात्काळ व निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी ठोस मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे.

आमदार मिटकरी यांनी मंगळवारी (दि. १०) दुपारी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन यासंदर्भात लेखी निवेदन सादर केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश पदाधिकारी रूपाली ठोंबरे पाटील, सुभाष गायकवाड, दत्ता चव्हाण, बाबासाहेब पाटील, महेश जाधव व रविंद्र नाना पाटील उपस्थित होते.

निवेदनात विमान अपघाताच्या तांत्रिक बाबी, सुरक्षा यंत्रणांची भूमिका, नियोजनातील संभाव्य त्रुटी, संबंधित यंत्रणांची जबाबदारी तसेच अपघातापूर्वी व नंतरचा संपूर्ण घटनाक्रम यांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे प्रकरण अत्यंत संवेदनशील व गंभीर असल्याचे स्पष्ट केले. या संदर्भात करण्यात आलेल्या सर्व चौकशीच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून योग्य ती प्रक्रिया राबविली जाईल, असे त्यांनी आश्वासन दिले. सत्य जनतेसमोर येणे आवश्यक असून या प्रकरणात कोणतीही शंका शिल्लक राहू दिली जाणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ७७ ■ बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### बिबट्याचा मुक्त संचार

# रात्रीचा तो क्षण... पुलगाव भयाच्या छायेत बिबट्याने उडवली नागरिकांची झोप

**पुलगाव । जनमाध्यम :** पुलगाव शहरात सोमवारी (दि. ९) रात्री अचानक बिबट्याच्या वावराने एकच खळबळ उडाली. वर्धा रोडवरील रेल्वे क्रॉसिंग परिसरात रात्री सुमारे १०.१२ वाजताच्या सुमारास बिबट्या दिसून आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. सुमारे एक ते दोन तास हा बिबट्या परिसरात दबकत फिरत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना आणि पादचाऱ्यांना त्याचे दर्शन झाल्याने क्षणातच ही बातमी शहरभर पसरली.

रेल्वे क्रॉसिंगजवळ बिबट्या काही वेळ थांबून अचानक कॅनलच्या दिशेने सरकला. तो जवाहर कॉलनी तसेच आसपासच्या वस्तीमध्ये शिरण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड





घबराट निर्माण झाली. अनेकांनी घरांचे दरवाजे बंद करून घेतले, तर काही ठिकाणी रात्रीची शतपावली थांबविण्यात आली.

बिबट्या प्रत्यक्ष पाहताच हर्षल काळे यांनी तातडीने वनविभागाच्या वैशाली लोणकर यांना माहिती दिली. माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पाहणीदरम्यान बिबट्या सलग दोन वेळा मुख्य वर्धा रोड ओलांडताना पुन्हा दिसून आल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली. गर्दी वाढू नये म्हणून पोलिसांच्या मदतीने नागरिकांना सुरक्षित अंतरावर ठेवण्यात आले.

वनविभागाकडून बिबट्याला सुरक्षितरीत्या पकडण्यासाठी रेस्क्यूची तयारी सुरू करण्यात आली असून, त्याच्या हालचालींवर सतत नजर ठेवली जात आहे. कॅमेरे, शोधपथक आणि आवश्यक उपकरणांच्या मदतीने परिसर पिंजून काढण्यात येत आहे. कोणतीही जीवितहानी होऊ नये, यासाठी सर्व खबरदारी घेतली जात असल्याचे वनअधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, कॉलनीतील नागरिकांना सोशल मीडियाच्या माध्यमातून सतर्कतेचे संदेश पाठविण्यात आले आहेत. रात्री अनावश्यक बाहेर पडू नये, लहान मुले व वृद्धांची विशेष काळजी घ्यावी, तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. बिबट्याच्या या अचानक वावरामुळे पुलगावकरांची रात्र भीतीच्या सावटाखाली गेली, हे मात्र नक्की.

# अंडरपासमधील धोका, प्रवाशांची वाढती भीती; वर्ध्याच्या रेल्वे प्रश्नांकडे खा.काळेंनी लक्ष वेधले

### -वर्ध्याचे रेल्वे प्रश्न थेट दिल्लीच्या दारी

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा लोकसभा मतदारसंघातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या रेल्वे समस्यांवर अखेर दिल्लीदरबारी ठोस आवाज उठवण्यात आला आहे. खासदार अमर काळे यांनी मंगळवारी (दि. १० फेब्रुवारी २०२६) केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन मतदारसंघातील गंभीर प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली. अंडरपासमधील अपघातांचा धोका, रखडलेली उड्डाणपुले, बंद रेल्वे गाड्या व थांबे यासह अनेक ज्वलंत मुद्दे थेट रेल्वे मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

नागपूर-अमरावती रेल्वे मार्गावर वर्धा लोकसभा मतदारसंघात रेल्वे विभागाने उभारलेले अनेक अंडरपास वर्षभर पाण्याखाली असतात. पाण्याखाली रस्त्यांवर मोठे खड्डे पडले असून ते वाहनचालकांना दिसत नसल्याने येथे वारंवार अपघात होत आहेत. पावसाळ्यात तर हे अंडरपास पूर्णतः वाहतुकीसाठी बंद ठेवावे लागतात. परिणामी नागरिकांना लांबचा वळसा घालून प्रवास करावा लागतो आणि वेळ व इंधनाचा अपव्यय होत आहे. या गंभीर समस्येवर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी खासदार काळे यांनी केली.

पुलगाव-आर्वी मार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाचे काम अनेक वर्षांपासून अर्धवट अवस्थेत आहे. रेल्वे फाटक बंद केल्याने वाहतूक नदीकाठावरील अरुंद पुलावरून वळवण्यात आली असून वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. मंजुरी मिळूनही विभागाच्या अनास्थेमुळे काम रखडले असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. त्यामुळे उड्डाणपुलाचे काम तात्काळ पूर्ण करावे किंवा तोपर्यंत रेल्वे फाटक नागरिकांच्या वापरासाठी खुले ठेवावे, अशी रोखठोक मागणी त्यांनी केली.कोरोना काळात रद्द करण्यात आलेले नागपूर-बडनेरा तसेच वर्धा-हिंगणघाट मार्गावरील अनेक रेल्वे थांबे आणि काही गाड्या अद्याप सुरू करण्यात आलेल्या नाहीत. कोरोना संपून तीन ते चार वर्षे उलटूनही प्रवासी सुविधांचा गाडा रुळावर न आल्याने सर्वसामान्य प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. बंद केलेले थांबे पूर्ववत करावेत आणि रद्द गाड्या तात्काळ सुरू कराव्यात, अशी ठाम मागणी खासदारांनी मंत्र्यांकडे केली.



पुलगाव-आर्वी नॅरोगेज मार्गावरील बंद पडलेली रेल्वे सेवा पूर्ववत सुरू करून हा मार्ग ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित करण्याचा मुद्दाही चर्चेत आला. पुढे हा मार्ग वरुडपर्यंत वाढविल्यास पुलगाव व आमला येथील दारुगोळा भांडारे रेल्वे मार्गाने जोडली जाणार असून सध्याच्या सुमारे १५० किलोमीटरच्या प्रवासात मोठी बचत होणार आहे. त्यामुळे ही रेल्वे लाईन केवळ जनहिताचीच नव्हे तर केंद्र सरकार व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची असल्याचे खासदार अमर काळे यांनी स्पष्ट केले.

याशिवाय अधिस्वीकृत पत्रकारांना रेल्वे सवलत देण्याबाबत, नागपूर-भुसावळ-खंडवा ही नवी रेल्वे सुरू करण्याबाबत तसेच रेल्वे स्थानकांवरील प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा व वाढ करण्यासंदर्भातही सविस्तर चर्चा झाली. वर्धा लोकसभा मतदारसंघातील नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी रेल्वे प्रश्नांवर ठोस निर्णय होणे आवश्यक असून, या मागण्यांवर सकारात्मक कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# डिजिटल कर्जाच्या नावाखाली महिलांची मोठी फसवणूक

### -५० हजारांच्या आमिषाने 'रिंग ॲप'द्वारे कर्ज उचल; हिंगणी परिसरात खळबळ

**सेलू । जनमाध्यम :** तालुक्यातील हिंगणी परिसरात आर्थिक अडचणीत असलेल्या महिलांना डिजिटल कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. प्रत्येकी ५० हजार रुपयांचे कर्ज मिळवून देतो, असे आमिष दाखवत एका भामट्याने अनेक महिलांचा विश्वास संपादन केला आणि त्यानंतर ऑनलाइन कर्ज ॲपच्या माध्यमातून त्यांच्या नावावर कर्ज उचलून आर्थिक फसवणूक केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सदर भामट्याने सुरुवातीला कर्ज मिळवण्यासाठी सात महिलांचा गट तयार करण्याची अट घातली होती. कर्ज प्रक्रिया सुरू असल्याचे भासवून त्याने प्रत्येकी ७०० रुपये 'प्रोसेसिंग फी' म्हणून गोळा केली. यामुळे महिलांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसला. त्यानंतर कर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक असल्याचे सांगत संबंधित महिलांचे मोबाईल फोन स्वतःकडे घेतले.

याच दरम्यान, तीन महिलांचे क्रेडिट रिपोर्ट (CIBIL) चांगले असल्याची खोटी माहिती देत त्यांच्या मोबाईलचा वापर करून 'रिंग ॲप'च्या माध्यमातून ऑनलाइन कर्ज उचलण्यात आले. एका महिलेच्या बँक खात्यात तब्बल २५ हजार ७५२ रुपये जमा झाले. मात्र, हे पैसे महिलेला न देता, हे पैसे मी माझ्या खात्यातूनच टाकले आहेत, असे सांगून संबंधित भामट्याने ते पैसे पुन्हा स्वतःच्या खात्यात वळते करून घेतल्याचे समोर आले आहे. अशाच प्रकारे इतर महिलांच्या बाबतीतही आर्थिक फसवणूक करण्यात आली.

तब्बल महिनाभर महिलांना अंधारात ठेवण्यात आले. दरम्यान, अचानक संबंधित महिलांच्या मोबाईलवर कर्जाच्या हप्त्यांचे आणि परतफेडीचे संदेश येऊ लागल्याने महिलांना धक्का बसला. तेव्हा आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. संतप्त झालेल्या महिलांनी तातडीने सेलू पोलीस स्टेशन तसेच पोलीस अधीक्षक, वर्धा कार्यालयात धाव घेऊन लेखी तक्रार दाखल केली असल्याची माहिती आहे.

या घटनेमुळे हिंगणी परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, डिजिटल कर्ज ॲप्सचा गैरवापर करून महिलांची फसवणूक करणाऱ्या भामट्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून ग्रामीण भागातील महिलांना आवाहन करण्यात आले असून, कोणालाही आपला मोबाईल फोन, ध्ऊइ, बँक खात्याची माहिती, आधार-पॅन तपशील किंवा वैयक्तिक कागदपत्रे देऊ नयेत, तसेच आकर्षक आमिषांना बळी पडू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# जमनालालजींची दूरदृष्टी पोहोचली शाळेपासून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत

### आज स्मृतीदिवस : जमनालाल बजाज सेवा ट्रस्टच्या माध्यमातून कार्याला मिळाली गती

**वर्धा जनमाध्यम :** वर्ध्याच्या इतिहासात जमनालाल बजाज यांचे नाव मोठ्या अभिमानाने घेतले जाते. त्यांनी आपले जीवन आणि संपत्ती पूर्णपणे राष्ट्रार्पण केली होती. त्यांच्या निस्वार्थी सेवाभावामुळे महात्मा गांधी त्यांना आपला 'पाचवा मुलगा' मानत असत. यातूनच महात्मा गांधी यांचे वर्ध्यात आगमन झाले आणि सेवाग्राम आश्रमाची स्थापना झाली. जमनालालजींचे मानवतेचे आणि समाजसेवेचे विचार आजही त्यांच्या पश्चात 'जमनालाल बजाज सेवा ट्रस्ट' च्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविले जात आहे. याला व्यापक स्वरुप प्राप्त झाले असून शाळेतील शिक्षणापासून तर शेतकऱ्यांच्या



बांधापर्यंत ते पोहोचले आहेत.

जमनालाल बजाज सेवा ट्रस्टच्या माध्यमातून शिक्षण आणि शेतकरी या दोन गोष्टी भर दिला जात आहे. जिल्ह्यातील जिल्हा परिषदेसह खासगी शाळांची लोकसहभागातून दुरुस्ती करणे, संगणक प्रयोगशाळा व विज्ञान प्रयोगशाळा उपलब्ध करुन देणे आदी काम ही संस्था अविरत करीत आहे. यासोबतच नाला खोलीकरण, सरळीकरणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यावरही काम करीत आहे. नाला खोलिकरण व सरळीकरणामुळे हजारो एकर पडीक जमिन आता पेरणीयोग्य झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात भर पडली आहे. यासोबतच ४ ते १५ एकरच्या शेतकऱ्यांना विहिर खोदून देण्याचा कार्यक्रमही गेल्या वर्षीपासून सुरु केला आहे. दरवर्षी ४० विहिरीच्या खोदकामाचे उद्दिष्ट्ये ठेवण्यात आले असून आतापर्यंत ६० विहिरींचे खोदकाम करुन दिले आहे. यामुळे कोरडवाहू शेतकऱ्यांना वर्षातून दोनपेक्षा अधिक उत्पन्न घेण्याची सोय झाल्याने त्यांचीही आर्थिक बाजू मजबूत व्हायला लागली आहे. संस्थेच्या या कार्यातून समाजातील शेवटच्या घटकाला तसेच गरजुंना खरा लाभ मिळत असल्याने दिवंगत जमनालाल बजाज यांचा सेवाभाव आजही कायम असल्याचे दिसून येत आहे.

# वर्ध्यात हॉस्पिटल फार्मसीवर कुणाचाच अंकुश नाही!

### -मुदतबाह्य 'स्टेरॉईड' विक्रीमुळे औषध विभागाची कसोटी; जिल्हाभर विशेष तपासणीची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात हॉस्पिटल फार्मसीवर औषध विक्री दुकानांची संख्या झपाट्याने वाढत असताना, या दुकानांमधून होणाऱ्या औषध विक्रीवर कोणतेही ठोस नियंत्रण नसल्याचे गंभीर वास्तव समोर येत आहे. महिन्यागणिक फार्मासिस्ट बदलणे, औषध साठ्याची अपुरी तपासणी आणि आर्थिक फायद्यासाठी नियमांना हरताळ फासण्याचे प्रकार सातत्याने उघडकीस येत आहेत. याच पार्श्वभूमीवर शहरातील 'श्वास फार्मसी' या हॉस्पिटल फार्मसीवर औषध विक्री दुकानातून मुदतबाह्य 'स्टेरॉईड' टॅबलेटची विक्री झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. परिणामी, जिल्ह्यातील अशा सर्व दुकानांची विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे.

शहरातील 'श्वास' फार्मसीतून रुग्णास चक्क मुदत संपलेल्या 'स्टेरॉईड'च्या चार गोळ्या विकल्या गेल्याची बाब उघडकीस आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या औषध विभागाने संबंधित फार्मसीच्या संचालकांना कारणे दाखवा नोटीस बजावली. नोटीस प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसांत लेखी खुलासा सादर करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. मात्र, तीन दिवसांचा कालावधी उलटूनही कोणतेही लेखी म्हणणे सादर न केल्याने औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर, औषध विभागाच्या नोटीसला केराची टोपली दाखवली जात आहे काय अशी चर्चा आता वैद्यकीय वर्तुळात उघडपणे रंगू लागली आहे. पुढील कारवाई काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात सध्या २५० हून अधिक हॉस्पिटल फार्मसीवर औषध विक्री दुकाने कार्यरत असल्याचा अंदाज आहे. रुग्णालयातील डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे बहुसंख्य रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून रुग्णालयाच्या आवारातीलच औषध दुकानांतून खरेदी केली जातात. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत काही ठिकाणी औषध साठ्याची गुणवत्ता, मुदत आणि नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे आरोप होत आहेत.

नाव न छापण्याच्या अटीवर वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी सांगितले की, औषध कंपन्यांकडून चिल्लर विक्रेत्यांना 'पाच वर एक मोफत'सारख्या योजना, आकर्षक भेटवस्तू तसेच परदेश दौऱ्यांचे आमिष दिले जाते. या साखळीत हॉस्पिटल फार्मसीवर औषध दुकानांच्या संचालकांनाच सर्वाधिक आर्थिक लाभ मिळतो, तर रुग्णांचे आरोग्य मात्र धोक्यात येत असल्याची गंभीर बाब आहे.

तज्ज्ञांच्या मते, औषध विभागाने या दुकानांची नियमित, काटेकोर आणि अचानक तपासणी करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, रुग्णांच्या जीवाशी उघडपणे खेळ सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**कोडिंगमुळे बाहेर औषध मिळेना-** हॉस्पिटल फार्मसीवर औषध विक्री दुकानांमध्ये संबंधित रुग्णालयातील डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे सहज मिळतात. मात्र, तीच चिठ्ठी घेऊन रुग्ण बाहेरील औषध दुकानात गेल्यास औषध मिळण्यात अडचणी येतात. काही डॉक्टर औषध लिहिताना पॅरासिटामोल'ऐवजी 'पीसीएम'सारखे कोडिंग वापरत असल्याचा गंभीर आरोप वैद्यकीय तज्ज्ञांनी केला आहे.

# आष्टी खाणवाडी कॅनलमध्ये सापडला मृतदेह

**तळेगाव शा.पं । जनमाध्यम :** गजानन महाराज प्रकट दिनाच्या दिवशी जेवणासाठी घरी येतो असे सांगून घराबाहेर पडलेले दिलीप तुकाराम वाघाडे (वय ४९), रा. गणेशनगर, आष्टी, यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. खाणवाडी परिसरातील मेन कॅनलमध्ये त्यांचा मृतदेह आढळल्याने गणेशनगरसह परिसरात शोककळा पसरली आहे.

खाणवाडी येथील शेतशिवारातून जाणाऱ्या कॅनलमध्ये एका अनोळखी इसमाचा मृतदेह पाण्यात वाहत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर तळेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह पाण्यातून बाहेर काढला. प्राथमिक चौकशीत मृत इसमाची ओळख दिलीप वाघाडे अशी पटली.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतकाला दारू पिण्याची सवय होती. प्रकट दिनाच्या दिवशी दारूच्या नशेत असताना तोल जाऊन कॅनलमध्ये पडल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र मृत्यूचे नेमके कारण पोस्टमार्टम अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, वाघाडे बेपत्ता झाल्यानंतर त्यांच्या नातेवाइकांनी आष्टी पोलीस स्टेशनमध्ये मिसिंगची तक्रार दाखल केली होती. मृतकाच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार असून अचानक घडलेल्या या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार मंगेश भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# फेब्रुवारीतच उन्हाच्या झळा; दोन दिवसांतच पारा चढला

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहर व परिसरातील वातावरणात कमालीचा बदल झालेला असून ऋतुबदलाचे संकेतही आता मिळू लागले आहे. फेब्रुवारीचे दहा दिवस पूर्ण झालेले असताना प्रखर सूर्यकिरणे जमिनीवर येऊ लागली असून दुपारी कमाल तापमानाचा पारा थेट ३२ अंशांच्या पुढे स्थिरावत असल्याने वर्धेकरांना जणू मार्चच्या झळा अनुभवयास येत आहे. वातावरणात उकाडा वाढल्याचा अनुभव मागील काही दिवसांपासून नागरिक घेत आहेत.

**कूलरवरची धूळ झटकण्यास प्रारंभ**

उन्हाळ्याची चाहूल लागण्यास सुरुवात झाल्यामुळे आता बहुतांश नागरिकांकडून अडगळीत ठेवलेले कूलर बाहेर काढून धूळ झटकण्यास सुरुवात झाली आहे. नादुरुस्त कूलरची दुरुस्तीसाठी आता कारागिरांचा शोध नागरिकांकडून घेतला जात आहे.

**उन्हाबाबत तज्ज्ञांचा अंदाज काय?**




दि. २ फेब्रुवारीपासून कमाल तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाली. २९ अंशांवरून तापमानाने ३२ शी ओलांडली. गेल्या तीन दिवसांपासून तापमान ३२ अंशांच्या पार स्थिरावू लागले आहे. सोमवारी (दि.२) किमान तापमानात एक अंशाने वाढ होऊन सकाळी साडेआठ वाजता १७ अंश इतके किमान तापमान मोजण्यात आले. सोमवारी तापमान थेट ३२.३ अंशांवर पोहोचले. महिनाभर वर्धा मध्ये उकाडा अधिक राहणार आहे. दोन ते चार अंशांनी सरासरी दुपारचे कमाल तापमान वाढलेले राहील. थंडी माफक प्रमाणात जाणवेल, असे हवामान अभ्यासकांनी सांगितले.

# बारावीची रणधुमाळी सुरू; वर्ध्यात पहिला इंग्रजीचा पेपर शांततेत पार

### -५६ केंद्रांवरून विद्यार्थ्यांनी सोडविला इंग्रजीचा पेपर; प्रशासन सज्ज

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला मंगळवार, १० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी इंग्रजी विषयाचा पेपर जिल्ह्यातील ५६ परीक्षा केंद्रांवर शांततेत पार पडला.

परीक्षा सुरू होण्याच्या सुमारे एक तास आधीच सर्व परीक्षा केंद्रांवर विद्यार्थी व त्यांच्या पालकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पहिला पेपर असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता तसेच थोडा तणावही जाणवत होता. सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक केंद्रावर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कॉपीमुक्त परीक्षा अभियान प्रभावीपणे राबवण्यात आले असून जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथके गठित करण्यात आली होती. या पथकांनी विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेटी देऊन पाहणी केली.

# वर्ध्यातील ४६ विद्यार्थी विमानाने ISRO कडे झेपावणार

### पालकमंत्र्यांच्या संकल्पनेतून नाविन्यपूर्ण शैक्षणिक दौरा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ४६ गुणवंत विद्यार्थ्यांची बंगलोर येथील 'इसरो' (घ्ऍध) आणि कुप्पम (आंध्र प्रदेश) येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक दौऱ्याच्या पूर्वतयारीसाठी 'डाएट' येथे पालक आणि विद्यार्थ्यांची विशेष बैठक पार पडली. विमानाने होणाऱ्या या पहिल्याच शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या वैज्ञानिक संस्था पाहायला मिळाव्यात आणि त्यांच्यातील शास्त्रज्ञ जागा व्हावा, या उद्देशाने पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून ही सहल होत आहे.



पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष पाठपुराव्यामुळे या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी निधी उपलब्ध झाला असून, सहलीचे संपूर्ण नियोजन अत्यंत उच्च दर्जाचे करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील मुलांनी विमानाने प्रवास करून अवकाश संशोधनाचे धडे गिरवावेत, हा पालकमंत्र्यांचा मानस या उपक्रमातून पूर्ण होत आहे.

डाएटमध्ये आयोजित बैठकीत प्राचार्य डॉ.मंगेश घोगरे यांनी पालक आणि विद्यार्थ्यांना प्रवासाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. दिनांक १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात ४६ विद्यार्थी, ४ अधिकारी आणि १ वैद्यकीय अधिकारी असा ५१ जणांचा चमू सहभागी होणार आहे. बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी मोबाईल फोन न बाळगणे, ओळखपत्र सतत जवळ ठेवणे, विमानातील प्रवासाचे नियम आणि 'इसरो' भेटीदरम्यान पाळायची शिस्त याबाबत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या.

प्रवासाचा असा आहे कार्यक्रम : १५ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता वर्धा येथून नागपूर विमानतळाकडे प्रस्थान. दि.१६ ते १८ फेब्रुवारी इसरो (घ्ऍध) केंद्र भेट, शास्त्रज्ञांशी संवाद आणि कुप्पम येथील वैज्ञानिक प्रकल्प पाहणी. दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:४० वाजता बेंगलोर ते नागपूर असा परतीचा विमान प्रवास.पालकांनी या उपक्रमाबद्दल पालकमंत्री डॉ. पंकज भोयर आणि जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत, असे जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.मंगेश घोगरे यांनी कळविले आहे.


MAHATRANSCO

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online Bids (SRM E-Tender)

| Tender Specification No. | RFx/Event No. | Name of Work | Estimated cost (Rs.) | EMD (Rs.) | Time limit / Tender cost Rs. |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| SEC/NGP/ T/03/ 2nd call/ 2025-26 | 7000038813 | Asphalting of interna peripheral road on existing road and Horticulture/ landscaping at 220 KV S/Stn Karanja (Ghadge), Dist-Wardha | 54,73,421.45 | 54,734.21 | Three (03) months/ Rs.500 + 18% GST (Non-refundable) |

Tenders Available at: https://srmetender.mahatransco.in; from 11.02.2026 (10.00 Hrs.).
Due date for online submission: 21.02.2026 (10.00 Hrs.);
Tender Opening: 23.02.2026 (11:00 Hrs.) (if possible).
Note:- All eligible interested contractors are mandated to get enroled on SRM e- Tendering portal.

Sd/-
Superintending Engineer (C)
EHV CCCM Circle, MSETCL, Nagpur

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com

# गुंडगिरी सहन केल्या जाणार नाही

## ■ सरन्यायाधीश सूर्यकांत संतप्त ■



**नवी दिल्ली :** देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश सुर्यकांत यांनी दिल्लीतील न्यायालयातील घटनेवरून कडक इशारा दिला आहे. इथे गुंडगिरी मान्य केले जाणार नाही असे ते म्हणाले आहेत. ७ फेब्रुवारी रोजी सरन्यायाधीश सुर्यकांत यांनी राष्ट्रीय राजधानी दिल्लीमधील जिल्हा न्यायालयात मारहाणीचा आरोप करणा-या वकिलाला दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांशी संपर्क साधण्यास सांगितले आहे. न्यायालयात मारहाण झाल्याचा आरोप या वकिलाने केला आहे. एका वकिलाने मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर तातडीने सुनावणीसाठी आपली याचिका मांडली. वकिलाने सांगितले की मी तीस हजारी न्यायालयात अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश हरजीत सिंह पाल यांच्या न्यायालयात हजर झालो. मी आरोपीचे प्रतिनिधित्व करत होतो. तक्रारदाराच्या वकिलाने अनेक गुंडांसह माझ्यावर हल्ला केला.

### ■ न्यायालयात सर्वांसमोर वकिलाला मारहाण

न्यायाधीश न्यायालयातील आसनावर बसलेले असताना संबंधित व्यक्तीने माझ्यावर हल्ला केला, असा गंभीर आरोप एका वकिलाने केला आहे. या घटनेच्या वेळी न्यायालयातील सर्व सदस्य उपस्थित होते, अशी माहितीही वकिलाने दिली. यावर सरन्यायाधीशांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ही घटना ७ फेब्रुवारी रोजी घडली असल्याची माहिती आहे. तसेच त्यांनी संबंधित वकिलाला विचारले की, या प्रकरणाची माहिती दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना दिली आहे का? यानंतर सरन्यायाधीशांनी संबंधित वकिलाला या घटनेबाबत दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडे औपचारिक तक्रार करण्याचे निर्देश दिले.

### ■ गुंडाराज आम्हाला मान्य नाही

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेउन सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी संबंधित वकिलाला उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. तसेच या प्रकरणाबाबत उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना पत्र लिहण्यास सांगून, पत्र पाठवल्यानंतर माहिती देण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची मुख्य न्यायाधीशांनी दखल घ्यावी आणि प्रशासकीय पातळीवर योग्य कारवाई करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. अशा प्रकारची गुंडगिरी आम्हाला मान्य नाही. याचा अर्थ कायद्याचे राज्य कोसळत असल्याचे संकेत आहेत असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. तसेच संबंधित वकिलाला उच्च न्यायालयात योग्य ती कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले.

# दोन जपानी पर्यटक बेपत्ता

## ■ दिल्लीहून टॅक्सीने आले होते बॅग सोडून मॅकडोनाल्ड्समध्ये गेले, परत आलेच नाहीत

**जयपूर :** जयपूरला फिरायला आलेले दोन जपानी पर्यटक बेपत्ता झाले आहेत. टॅक्सी ड्रायव्हरला जेवण करून येतो असे सांगून ते दोघे मॅकडोनाल्ड्स रेस्टारंटमध्ये गेले होते, पण परत आले नाहीत. त्यांचे सामान टॅक्सीमध्येच होते. अशोक नगर पोलिस ठाण्यात ड्रायव्हरने दोघांच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल केली आहे. माहितीनुसार, ते दोघे तीन दिवसांपूर्वीच भारतात आले होते. पोलिस आता त्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनुसार, दोघांचा शोध सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे घेतला जात आहे. ६ फेब्रुवारी रोजी दोघे दिल्लीत पोहोचले होते. एसएचओ (अशोक नगर) मोतीलाल यांनी सांगितले की टॅक्सी ड्रायव्हर पिकेंद्र कुमार यांनी सांगितले की ६ फेब्रुवारी रोजी दोन्ही जपानी पर्यटक (हिबिक्की शिब्बा आणि युमा) पर्यटक व्हिसावर दिल्लीत आले होते. दुस-या दिवशी तो त्या दोघांना घेउन जयपूरमधील ब्रम्हपुरी येथील एका हाटेलमध्ये आला होता. तिथून संध्याकाळी उशिरा ते दोन्ही पर्यटक अशोक नगर येथील एका रेस्टारंटमध्ये जेवण करण्यासाठी गेले होते असे सांगून निघाले होते. नंतर ते परत आलेच नाहीत. पर्यटकांकडे मोबाईल होते, पण ड्रायव्हरकडे त्यांचे नंबर नव्हते. ड्रायव्हर ८ फेब्रुवारीच्या सकाळपर्यंत रेस्ट?रंटबाहेर त्यांच्या परत येण्याची वाट पाहत राहिला, पण दोन्ही पर्यटक परत आले नाहीत. त्यांच्या बॅगा टॅक्सीतच होत्या. खूप वाट पाहिल्यानंतरही पर्यटक न आल्याने ड्रायव्हरने अशोक नगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी दोन्ही पर्यटकांच्या टॅक्सीत ठेवलेल्या बॅगा ताब्यात घेतल्या आहेत आणि प्रकरणाचा तपास करत आहेत. त्या दोघांचा जयपूरमधील वेगवेगळ्या पर्यटन स्थळांना भेट देण्याचा प्लॅन होता. पोलिसांचे म्हणणे आहे की, आजूबाजूला लावलेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली आहे. फुटेजमध्ये दोन्ही पर्यटक रेस्टारंटमध्ये प्रवेश केल्यानंतर सुमारे ५ मिनिटांनीच तिथून बाहेर पडून पायी जाताना दिसत आहेत. दोन्ही पर्यटक सध्या कुठे आहेत, याची माहिती गोळा केली जात आहे. दोन्ही पर्यटकांना जयपूरमध्ये दोन रात्री थांबायचे होते. येथून रणथंबोर आणि आग्रा मार्गे त्यांना परत दिल्लीला परतायचे होते.

# हिमंता शूटिंग व्हीडीओवरून वाद



**नवी दिल्ली :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या एका व्हीडीओवरून सीपीआय(एम) आणि सीपीआयच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या व्हीडीओमध्ये मुख्यमंत्री मुस्लिम लोकांकडे रायफल रोखलेले दिसत होते. डाव्या नेत्यांनी या प्रकरणी कारवाईची मागणी केली आहे. ज्येष्ठ वकील निजाम पाशा यांनी मंगळवारी हे प्रकरण सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यासमोर मांडले. ते म्हणाले की, आसामच्या सध्याच्या मुख्यमंत्र्यांच्या कथित भडकाउ भाषणांवरून आणि नुकत्याच समोर आलेल्या व्हीडीओवरून सर्वोच्च न्यायालयाच्या तातडीच्या हस्तक्षेपाची गरज आहे. निजाम पाशा यांनी सांगितले की, या प्रकरणी संबंधित अधिका-यांकडे तक्रारी देण्यात आल्या आहेत, परंतु अद्याप कोणतीही एफआयआर दाखल करण्यात आलेली नाही. समस्या अशी आहे की, निवडणुका जवळ येताच, निवडणुकीचा काही भाग सर्वोच्च न्यायालयात लढला जाउ लागतो. हीच अडचण आहे. मात्र, त्यांनी असेही म्हटले की, न्यायालय या याचिकेवर सुनावणीसाठी तारीख निश्चित करेल. सर्वोच्च न्यायालयाने सीपीआय(एम) आणि सीपीआय नेत्यांच्या याचिकेला सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्यास सहमती दर्शवली आहे. या याचिकेत आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या विरोधात कारवाईची मागणी करण्यात आली आहे. खरं तर, ८ जानेवारी रोजी काँग्रेसने दावा केला होता की आसाम भाजपच्या हँडलवरून एक व्हीडीओ पोस्ट करण्यात आला होता, ज्यामध्ये आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा मुस्लिमांवर गोळीबार करताना दिसत आहेत. काँग्रेसने म्हटले की, हा व्हीडीओ अल्पसंख्याकांच्या लक्षियत पाइंट-ब्लँक हत्येला प्रोत्साहन देण्यासारखा आहे. काँग्रेसचा दावा आहे की, हा व्हीडीओ हटवण्यात आला आहे. व्हीडीओ व्हायरल झाल्यानंतर, संघटनेचे प्रभारी काँग्रेस सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांनी या मुद्यावर भाजपवर टीका केली.

# इराणवर युध्दाचे सावट

**तेहरान :** मध्य पूर्वेतील तणाव आता शिगेला पोहोचला असून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कोणत्याही क्षणी इराणवर लष्करी कारवाईचे आदेश देउ शकतात, अशी चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेकडून गेल्या काही दिवसांत मिळालेले संकेत आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीसाठी जारी केलेली नवीन मार्गदर्शक तत्वे यामुळे युद्ध अटळ असल्याची चर्चा जागतिक स्तरावर सुरू झाली आहे.

अमेरिकन सागरी प्रशासनाने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणा-या अमेरिकन व्यावसायिक जहाजांसाठी नवीन नियमावली जारी केली. अमेरिकन जहाजांना इराणच्या प्रादेशिक हद्दीपासून शक्य तितके दूर राहून ओमानच्या सागरी हद्दीजवळून प्रवास करण्याची शिफारस करण्यात आली. जर इराणी सैन्याने जहाजांना अडवण्याचा प्रयत्न केला. तर, क्रू मेंबर्सनी सशस्त्र प्रतिकार करू नये, असे सांगण्यात आले. मात्र, याचा इराणी सैन्याला संमती देणे असा होत नाही असेही स्पष्ट करण्यात आले. अमेरिकेने आपल्या नागरिकांसाठी सर्वात कडक अशी ट्रॅव्हल ॲडव्हायझरी जारी केली. इराणमधील अमेरिकन नागरिकांनी सरकारी मदतीची वाट न पाहता स्वतःहून देश सोडण्याची योजना तयार ठेवावी आणि तातडीने इराण सोडावे, असा इशारा देण्यात आला.

# सिंचन प्रकल्पासाठी 15 हजार कोटी

## ◆ 57 सिंचन प्रकल्पांचे काम मार्गी लागणार ◆ 8 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, तसेच कालवे आणि वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी पंधरा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यात आठ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. याचा लाभ राज्यातील सर्वच विभागांना होणार आहे. याबरोबरच पुरंदर विमानतळ भूसंपादनासाठी सहा हजार कोटी कोटींच्या कर्जालाही मान्यता देण्यात आली आहे.

राज्यात बांधकाम सुरू असलेले जलसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १५ हजार कोटी रुपयांचे कर्ज वित्तीय संस्थाकडून घेण्याचा निर्णय ७ ऑगस्ट २०१९ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. त्यापैकी ७ हजार ५०० कोटी रुपयांचे प्रथम टप्प्यातील कर्ज नाबार्डकडून घेण्याचा निर्णय ११ मार्च २०२४ रोजीच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. आता उर्वरित ७ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज नाबार्डकडून घेण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. राज्यातील ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आणि १९३ पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी पंधरा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास आज एकत्रित सुधारित मान्यता देण्यात आली. सर्व जलसिंचन प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यात सुमारे आठ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. पंधरा हजार कोटी पैकी ८ हजार ९८२ कोटी ७६ लाख रुपये ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी तर ६ हजार १७ कोटी २४ लाख रुपये १९३ पूर्ण झालेल्या सिंचन प्रकल्पांच्या कालवे आणि वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठीच्या कामासाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली.

**पुरंदर विमानतळ भूसंपादनासाठी ६ हजार कोटी**

पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळाच्या विकासाला चालना मिळावी यासाठी आवश्यक भूसंपादनासाठी सहा हजार कोटींचे कर्ज घेण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. पुरंदर विमानतळाच्या विकासासाठी विशेष हेतू प्राधिकरणाची(स्पेशल पर्पज व्हेईकल-एसपीव्ही) स्थापना करण्यात आली आहे. या प्राधिकरणात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ-एमआयडीसी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी एमएडीसी, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) तसेच अन्य संस्थांची एसपीव्ही स्थापन करण्यात आली आहे.

परिसरातील सुमारे ९६ टक्के शेतक-यांची विमानतळासाठी समंतीपत्र मिळाली आहेत. त्यानुसार आता मोठ्या प्रमाणात भूसंपादन करावे लागणार आहे. त्यासाठी आवश्यक निधी उभा करण्यासाठी विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज उपलब्ध करून घेण्यात येणार आहे असे कर्ज उपलब्ध करून घेण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच या कर्जास शासन हमी देण्यास ही मंजुरी देण्यात आली.



**इंदापूर तालुक्यातील जमीन एमआयडीसीला-**पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील रत्नपुरी मळ्यातील १ हजार एकर जमीन महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) हस्तांतरित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामुळे यापरिसरातील उद्योजकांना सुविधा तसेच गुंतवणूक व रोजगार संधी निर्माण होणार आहे. पुणे जिल्हा आणि परिसरातील वाढत्या औद्योगिकरणास पुरेशी जमीन उपलब्ध व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने राज्य शेती महामंडळाच्या रत्नपुरी मळ्यातील एक हजार एकर जमीन मिळण्याबाबत मागणी केली होती. त्या मागणीस आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मान्यता देण्यात आली. या जमिनीमुळे पुण्यातील वाढत्या औद्योगिकरणाला जमीन उपलब्ध होणार आहे. पुणे जिल्हाधिकारी यांनी शेती महामंडळाकडील जमीन एमआयडीसीला उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती कारवाई करावी, असाही निर्णय घेण्यात आला.

**विज्ञान प्रदर्शनातील विजेत्यांच्या बक्षीसात वाढ-**राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात बक्षीस मिळविणा-या विद्यार्थी, शिक्षक आणि प्रयोगशाळा परिचर यांना देण्यात येणा-या बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार सर्व गटात सर्वसाधारण, आदिवासी आणि दिव्यांग गटात बक्षीस दिले जाणार आहे. सर्व गटासाठी बक्षिसाची रक्कम प्रथम-५१ हजार, व्दितीय-३१ हजार. तृतीय २१ हजार, चतुर्थ-११ हजार आणि उत्तेजनार्थ तीन- प्रत्येकी १० हजार रुपये अशी असणार आहे. विद्यार्थ्यांतील विज्ञान आणि गणित विषयातील सर्जनशीलता, कल्पकता आणि नाविन्य वृत्तीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन आयोजित करण्यात येते. या राष्ट्रीय प्रदर्शनासाठी राज्यस्तरीय प्रदर्शनातील विजेत्यांची उपकरणे पाठविण्यात येतात. राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात जास्तीत जास्त कल्पक उपक्रमांचा समावेश व्हावा यासाठी राज्यातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षिसांच्या रक्कमेत वाढ करण्यात आली. सध्या केंद्र सरकार इन्स्पायर, बिल्डॅथ?न, हॅकॅथॉन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करीत आहे. यामध्ये राज्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा म्हणून बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**११ अतिरिक्त जिल्हाधिकारी पदांच्या निर्मितीस मान्यता**

राज्यातील जिल्हा प्रशासनावर वाढत चाललेला प्रशासकीय ताण कमी करण्यासाठी आणि नागरिकांना महसूलविषयक सेवा अधिक वेगाने तसेच पारदर्शकपणे उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील ११ नवीन पदांच्या निर्मितीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे सध्या तब्बल ३९ विषयांचे कामकाज आहे. यामध्ये शासकीय वसुली, गौणखनिज नियंत्रण, नगरपरिषद आणि ग्रामीण भागातील जमिनीचे व्यवस्थापन, जमाबंदी आणि जमीन सुधार विधिविधानांची अंमलबजावणी, ग्रामपंचायत आणि नोंदणी अधिनियमाशी संबंधित बाबी, महसूल अधिनियमांखालील अपीले, गावठाण विस्तार, भूसंपादन प्रक्रिया, बेघर आणि भूमिहिनांसाठी घरकुल योजना, प्रकल्पबाधित आणि पूरग्रस्तांचे पुनर्वसन, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती विषयक कामकाज अशा महत्त्वाच्या जबाबदा-यांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर ११ नवीन पदांची निर्मिती केल्यास जिल्हास्तरावरील निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान होणार आहे. शिवाय प्रलंबित अपील प्रकरणांचा निपटारा लवकर होणार आहे. विशेषतः भूसंपादन, पुनर्वसन, गावठाण विस्तार आणि अतिक्रमण कारवाई यांसारख्या संवेदनशील विषयांमध्ये वेळेत निर्णय मिळाल्यास सामाजिक तणाव कमी होण्यास मदत होणार आहे.

# गोव्यात परवानगीशिवाय पर्यटकांचा फोटो, सेल्फीवर बंदी

## नियमांचा भंग केल्यास पोलिस कारवाई समुद्रकिना-यांवर आता पोलिसांची गस्त



**पणजी/वृत्तसंस्था :** गोव्यातील समुद्रकिना-यांवर विदेशी महिलांना टवाळखोरांकडून होणारा वाढता त्रास लक्षात घेता, पोलिसांकडून कठोर पावले उचलण्यात आली आहेत. पर्यटकांना फोटो किंवा सेल्फीसाठी त्रास दिल्यास अशा हुल्लडबाजांना आता पोलिसांकडून ताब्यात घेतले जाणार आहे. गोव्यात विदेशी अथवा देशी पर्यटकांचा आता परवानगीशिवाय फोटो किंवा सेल्फी काढता येणार नाही.गेल्या आठवड्यात उत्तर गोव्यातील बागा समुद्रकिना-यावर तामिळनाडूच्या काही पर्यटकांना विदेशी पर्यटकांनी फोटोसाठी त्रास दिला. विदेशी महिला पर्यटकांनी परवानगी दिली नसताना त्यांना फोटो, सेल्फीसाठी त्रास देण्यात आला. याघटनेचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांकडून याची गंभीर दखल घेण्यात आली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १७० अंतर्गत चौकशीसाठी दोघांना ताब्यात घेतले.

### विदेशी महिलेचा व्हीडीओ प्रकरण

कळंगुटमध्ये विदेशी पर्यटक महिला समुद्रात आंघोळ करत असताना तिचे चित्रीकरण केल्याचा प्रकार गुरुवारी उघडकीस आला होता. संशयित अलिस्टो लोबो याच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा नोंद करुन त्याला ताब्यात घेतले होते. संशयिताने पर्यटक महिलेचा व्हीडीओ सोशल मीडियावर शेअर केला होता. संशयिताने राज्यातील पर्यटनाला धक्का लावण्यासह, महिलेची बदनामी केली असे पोलिसांनी दाखल केलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. संशयित लोबोच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ७९, ३५६ (२) अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे. यापूर्वी रशियन पर्यटक महिलेला त्रास दिल्याप्रकरणी ओडिशाच्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

### सोशल मीडियावर व्हीडीओ, फोटो व्हायरल

गेल्या काही दिवसांत विदेशी पर्यटकांना त्रास दिला जात असल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. समुद्रकिना-यांवर प्रामुख्याने महिलांना फोटो आणि व्हीडीओसाठी जबरदस्ती केल्याचे व्हीडीओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आले आहेत. पर्यटकांच्या परवानगीशिवाय फोटो अथवा व्हीडीओ काढल्यास संबंधिताला ताब्यात घेतले जाईल अशी माहिती एका पोलिस अधिका-याने दिली आहे.

### समुद्रकिना-यांवर पोलिसांची गस्त वाढली

वाढत्या घटना लक्षात घेता पोलिसांनी समुद्रकिना-यावर गस्त घालण्याचे प्रमाण वाढवले आहे. पर्यटन हंगाम सुरु होताच उघडकीस आलेल्या या दोन घटनांमुळे राज्यातील महिलांच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये काही जणांना महिला पर्यटकांना त्रास दिल्याची घटना हरमल समुद्रकिना-यावर उघडकीस आली होती. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंद करुन संशयितांना अटक केली होती. ऑक्टोबरमध्ये देखील अशाप्रकारची घटना उघडकीस आली होती.

# पॅन कार्डची नियमावली जाहीर होणार

## गाडी खरेदी करण्यापासून ते कॅश डिपाझिटपर्यंत सर्व बदलणार




**नवी दिल्ली :** पॅन कार्डशी संबंधित अनेक नियमांमध्ये बदल होणार आहेत. केंद्र सरकारने नुकताच नवीन आयकर नियम-२०२६ चा मसुदा (ड्राफ्ट) जारी केला आहे. या मसुद्यानुसार, आता कोणत्याही व्यक्तीच्या एक किंवा एकापेक्षा जास्त बँक खात्यांमध्ये एका आर्थिक वर्षात एकूण १० लाख रुपये किंवा त्याहून अधिक रोख रक्कम जमा केल्यास किंवा काढल्यास पॅन कार्ड अनिवार्य असेल. सध्याच्या नियमानुसार, एका दिवसात ५०,००० रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम जमा करताना पॅन कार्ड देणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे, मोटार वाहन खरेदी करताना पॅन क्रमांक देण्याच्या मर्यादेतही बदल करण्यात आला आहे. पूर्वी मोटारसायकलसह कोणतीही मोटार वाहन खरेदी करताना त्यांची किंमत ५ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास पॅन क्रमांक देणे अनिवार्य होते. सध्याच्या नियमांनुसार, दुचाकी खरेदीसाठी पॅन क्रमांकाची कोणतीही तरतूद नाही, परंतु इतर मोटार वाहनांसाठी किंमत कितीही असली तरी पॅन क्रमांक देणे अनिवार्य आहे.

**हास्पिटॅलिटी, इव्हेंट मॅनेजमेंटवर परिणाम-** हास्पिटॅलिटी आणि इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्रावरही या नवीन नियमांचा परिणाम होणार आहे. हाटेल किंवा रेस्टारंटचे बिल, कन्व्हेन्शन सेंटर, बँक्वेट हाल किंवा कोणत्याही इव्हेंट मॅनेजमेंट सेवेसाठीचे पेमेंट १ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास पॅन कार्ड देणे आवश्यक असेल. सध्या ही मर्यादा ५०,००० रुपये इतकी आहे. दुसरीकडे, कोणत्याही मालमत्तेची खरेदी, विक्री, गिफ्ट किंवा जाइंट डेव्हलपमेंट ॲग्रीमेंटसाठी सध्या १० लाख रुपयांची मर्यादा आहे, ती वाढवून २० लाख रुपये करण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय, विमा कंपन्यांसोबत खाते-आधारित संबंध सुरू करण्यासाठी आता पॅन कार्ड अनिवार्य असेल. सध्या केवळ ५०,००० रुपयांपेक्षा जास्त वार्षिक प्रीमियम भरल्यावरच पॅन कार्डची गरज असते.

**कधीपासून लागू होणार?** नवीन आयकर कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार आहे. पीटीआयच्या एका रिपोर्टनुसार आणि वित्त मंत्रालयातील सूत्रांच्या हवाल्याने सांगण्यात आले आहे की, सीबीडीटी संबंधितांशी चर्चा केल्यानंतर या नियमांना अंतिम रूप देईल आणि मार्चच्या पहिल्या आठवड्यापर्यंत यासंदर्भात अधिसूचना जारी केली जाईल.

# सुप्रिया सुळेंची मुलगी रेवतीचे ठरले लग्न

**पुणे /प्रतिनिधी-**राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांची नात, खासदार सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सुळे यांचे लग्न ठरले आहे. सारंग अरुण लखानी यांच्यासोबत रेवती सुळेंचा विवाह निश्चित झाला आहे.सुप्रिया सुळे यांच्या अत्यंत जवळच्या मैत्रिणीने ही गुड न्यूज जाहीर केली आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची मुलगी स्मृती शिंदे यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून पोस्ट करत लग्न ठरल्याची बातमी शेअर केली. रेवती आणि सारंग या दोघांचा एकत्र फोटो पोस्ट करत स्मृती यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच सुप्रिया सुळे, सदानंद सुळे यांचेही त्यांनी अभिनंदन केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सारंग अरुण लखानी हे नागपूरचे आहेत, त्यामुळे रेवती सुळे या नागपूरच्या सूनबाई होणार आहेत. दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थीने हे लग्न ठरल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सुळे व पवार कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सारंग अरुण लखानी हे नागपूरचे असून, व्यवसायी आणि उत्तम बॅडमिंटनपटू तथा विश्वराज ग्रुपचे अध्यक्ष अरुण लखानी यांचे ते सुपुत्र आहेत. तेही एक उत्तम बॅडमिंटनपटू असल्याचे समजते. उद्योजक सारंग लखानी आणि रेवती सुळे यांच्या या नव्या प्रवासासाठी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांकडून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थीने लग्न ठरल्याची माहिती देखील समोर आली आहे. रेवती सुळे या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि सदानंद सुळे यांची मुलगी आहेत. शरद पवार यांची त्या नात आहेत. त्यांना विजय सुळे हा एक भाउही आहे. रेवती सुळे यांनी लंडन स्कूल ऑफ इकानामिक्समधून पदवी घेतली आहे. बारामती लोकसभा निवडणुकीत रेवती सुळे यांनी प्रथमच आपल्या आई सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात सक्रिय सहभाग घेतला होता. स्मृती शिंदे यांनी रेवती व सारंग यांचे लग्न ठरल्याची पोस्ट करताच बघता बघता ती सोशल मीडियावर व्हायरल झाली. त्यानंतर रेवती यांचा भाउ, विजय सुळे यांनीही त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर स्टोरी शेअर करत बहिणीचे व भावी जिजाजींचे अभिनंदन केले.






# सचिन तेंडूलकरच्या लेकाचं शुभमंगल

## ■ सचिनने सहकुटुंब घेतली पंतप्रधान मोदींची भेट
## ■ अर्जुनच्या लग्नाची दिली पत्रिका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** क्रिकेटचा देव मानला जाणारा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर सध्या आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारीत व्यस्त आहे. सचिनचा मुलगा अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक यांचा विवाह सोहळा येत्या मार्च महिन्यात पार पडणार आहे. या विशेष सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी सचिनने पत्नी अंजली आणि मुलगा अर्जुनसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. सचिनने एक्सवर पोस्ट करत लिहिले की, आम्हाला अर्जुन आणि सानियाच्या विवाह समारंभासाठी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजींना आमंत्रित करण्याचे सौभाग्य लाभले. या जोडीला तुमचा आशीर्वाद आणि मोलाचा सल्ला मिळाला, त्याबद्दल मोदीजींचे मनःपूर्वक आभार. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदींनी तेंडुलकर कुटुंबाशी संवाद साधला आणि अर्जुनला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अर्जुनची होणारी पत्नी सानिया चंडोक ही मुंबईतील सुप्रसिद्ध व्यावसायिक रवी घई यांची नात आहे. घई कुटुंब हास्पिटॅलिटी आणि खाद्य क्षेत्रात मोठे नाव असून ब्रुकलिन क्रीमरी सारखा आईस्क्रीम ब्रँड आणि इंटरकान्टिनेंटल हाटेलची मालकी त्यांच्याकडे आहे. सानिया स्वतः एक वेटरनरी टेक्निशियन आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये त्यांचा साखरपुडा अत्यंत मोजक्या लोकांच्या उपस्थितीत पार पडला होता.

**५ मार्चला रंगणार शाही विवाह सोहळा-**अर्जुन आणि सानियाच्या लग्नाचे विधी ३ मार्चपासून सुरू होतील आणि ५ मार्च रोजी मुंबईत हा शाही विवाह सोहळा पार पडेल. याआधी सचिनने पत्नी अंजलीसह सोनिया गांधी यांचीही त्यांच्या १० जनपथ येथील निवासस्थानी भेट घेउन त्यांना लग्नाचे आमंत्रण दिले होते.

**अर्जुन तेंडुलकरची क्रिकेट कारकीर्द-** २५ वर्षीय अर्जुन तेंडुलकर हा डावखुरा वेगवान गोलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू आहे. आयपीएलमध्ये तो मुंबई इंडियन्सकडून खेळला आहे, मात्र आयपीएल २०२६ च्या लिलावापूर्वी त्याला लखनौ सुपर जायंट्सने ट्रेड केले आहे. आता नव्या संघात आणि आयुष्याच्या नव्या इनिंगमध्ये अर्जुन कशी कामगिरी करतो, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## महायुतीची ताकद

**लोकसभा, विधानसभा, नगरपालिका, नगरपरिषदा आणि महापालिकांच्या निवडणुकांतील यशानंतर भाजपप्रणीत महायुतीने आता महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांसाठी झालेल्या निवडणुकांतही बाजी मारली. भाजप हाच एक नंबरचा पक्ष ठरला असून, त्यानंतर शिवसेना, मग अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असा क्रम राहिला. विरोधी आघाडीतील पक्षांमध्ये काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या असून, त्यानंतर ठाकरे सेना व नंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा नंबर लागला. एकेकाळी काँग्रेस आणि राष्ट्रवादीची असलेली सत्तास्थाने महायुतीने काबीज केली असून, त्यातही भाजपने मुसंडी मारली. विशेषत:, ग्रामीण आणि प्रादेशिक राजकारणात भाजपने मिळवलेले हे यश पक्षाच्या सूत्रबद्ध आणि पर्यायी राजकीय मांडणीचे आहे. विशेषत:, विकासाचे राजकारण आणि मतदाराला ट्रिपल इंजिन सरकारची दिलेली ग्वाही, लाडकी बहीण यासारख्या लोकानुनयी योजनांची अंमलबजावणी याचा या निवडणुकीतही प्रभाव पडल्याचे दिसले. कोकणात रायगडला शिवसेना (शिंदे), भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) ची कामगिरी दमदार ठरली. रत्नागिरीत शिंदे शिवसेनेला, तर सिंधुदुर्गात भाजपला मोठे यश मिळाले. मराठवाड्यातील लातूर जिल्हा परिषदेत काँग्रेसला चांगले यश मिळाले. मनसेने अनपेक्षितपणे तीन जागांवर विजय प्राप्त केला. या निकालांमुळे मराठवाड्यातील राजकारणात मनसेचा प्रवेश झाला असला, तरी राज्यात बाकी कुठेही या पक्षाचा फारसा मागमूसही दिसून येत नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक मतदान पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे या निवडणुकीत किती टक्के मतदान होते, याकडे लक्ष लागून राहिले होते. परंतु, १२ जिल्ह्यांमध्ये सरासरी ६८ टक्के मतदानाची नोंद झाली. जवळपास तीन जिल्ह्यांत ७० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले. सर्वात कमी ५५.७९ टक्के रत्नागिरी जिल्ह्यात झाले, तर त्यापेक्षाही कमी ५४.९० टक्के बारामतीत झाले. या निवडणुका स्थानिक स्तरावरील असून, त्या कार्यकर्त्यांच्या असतात, असे मानले जाते. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या या मोठ्या प्रमाणावर राज्य सरकारवर अवलंबून असतात. त्यामुळे जो पक्ष सत्तेत, त्याच्या बाजूने मतदारांचा कल असतो. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांचे लोकशाही आघाडी सरकार असताना, या संस्थांमधील निवडणुकांत त्यांना यश मिळत होते. २०१४ मध्ये महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले. त्यावेळी, फडणवीस यांचे नेतृत्व नवखे असून ते शहरी आहे, त्यांना राज्यात कोणी ओळखत नाही, अशी टीका विरोधकांनी केली होती. प्रत्यक्षात त्यानंतर झालेल्या ग्रामपंचायती व जिल्हा परिषदांच्या निवडणुकांत फडणवीस यांनी कमाल करून दाखवली. आता तर केंद्रात, राज्यात आणि महापालिकांमध्ये महायुतीची, म्हणजेच ट्रिपल इंजिनची सत्ता असून, त्यामुळे एकापाठोपाठ एक विजय मिळताना दिसत आहे. भाजपने विजयातील सातत्य टिकवून धरलेले आहे. सोलापूर महापालिकेपाठोपाठ जिल्हा परिषदेतवरही भाजपने झेंडा फडकावला. कोल्हापूरचा पहिला महापौर केलाच, जिल्हा परिषदही महायुतीकडे गेली. या बदलाची नोंद घ्यावी लागेल. अजित पवारांच्या निधनामुळे या निवडणुकांवर दुःखाचे सावट होते. त्यांच्या निधनापूर्वी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ताकदीने प्रचार केला. खुद्द अजित पवार हे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांतील पराभवामुळे निकालानंतर दुसऱ्या दिवसापासूनच अक्षरशः झपाटल्यासारखे काम करत होते. त्यांच्या निधनानंतर सहानुभूतीची लाट उसळली. त्यांच्या कामाचा झपाटा, त्यांची प्रशासकीय कार्यक्षमता आणि लोकाभिमुख कारभार हे गुण आठवून राष्ट्रवादी काँग्रेसला लोकांनी भरभरून मतदान केले. त्यामुळे या पक्षाने या निवडणुकांत खूप वरचे स्थान प्राप्त केले आहे. पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने एकहाती सत्ता मिळवून दादांचे स्वप्न पुरे केले. पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादीचे सर्वाधिक आमदार असून, याचा या निवडणुकीत फायदा झाल्याचे दिसते. पुणे जिल्ह्यात भाजपला मात्र फटका बसला असून, महापालिकेतील यशाच्या पार्श्वभूमीवर हा पराभव धक्कादायक मानावा लागेल. पुणे, सातारा, रायगडमध्ये हा प्रभाव ठळकपणे दिसला. सांगलीत राष्ट्रवादी शरद पवार गट सर्वात मोठा पक्ष ठरला. ही जिल्हा परिषद त्रिशंकू स्थितीत पोहोचली आहे. राज्यात अन्यत्र मात्र शरद पवार राष्ट्रवादीला फारसे यश मिळवता आले नाही. साताऱ्यात २०१७ साली झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत एकूण ६४ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसने तब्बल ३९ जागांवर विजय मिळवला होता. मात्र, यावेळी सातारा जिल्ह्यातही भाजपने लक्षणीय यश मिळवले. कोल्हापुरात काँग्रेस आणि राष्ट्रवादीला उल्लेखनीय यश मिळाले आहे. मात्र, स्वतंत्रपणे लढलेल्या महायुतीतील पक्षांच्या यशस्वी उमेदवारांची संख्या जास्त असून, त्यामुळे ते सहजपणे सत्ता स्थापन करतील, असे चित्र आहे. मंत्री उदय सामंत, नितेश राणे, भरत गोगावले आदी अनेक मंत्र्यांनी ठसा उमटवला. या निवडणुकांमधून महाविकास आघाडीची झालेली दुर्दशा पाहायला मिळाली. केंद्र सरकारच्या माध्यमातून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांकडे प्रचंड निधी येत असतो. शिक्षण, आरोग्य, कुटुंब नियोजन, रस्ते, पाणी अशा अनेक क्षेत्रांत विकासकामे हाती घेतली जात असतात. गेल्यावेळची निवडणूक २०१७ मध्ये झाली होती. त्यानंतर ९ वर्षांचा कालावधी लोटला. त्यामुळे अनेक विकासकामे खोळंबली. आता ती वेळेवर मार्गी लावण्याचे आव्हान आहे. त्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील विकासाच्या अनेक जबाबदाऱ्या जिल्हा परिषदांवर सोपवण्यात आलेल्या असतात. पिण्याच्या पाण्याची सोय, विहिरी खोदणे, लसीकरण मोहिमा राबवणे, प्राथमिक आरोग्य केंद्रे चालवणे, शेतकऱ्यांना सुधारित बियाणे व खते पुरवणे, सिंचनाच्या लहान योजना राबवणे ही कामे कार्यक्षमतेने करण्याची गरज आहे. ग्रामीण भागात शहरांप्रमाणे सोयीसुविधा पुरवणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लक्ष्य आहे. आता निवडणुकीतील यशाचा गुलाल उधळल्यानंतर मिळालेल्या जबाबदाऱ्यांचे चोख पालन होणे आवश्यक आहे. केवळ निवडणुकांत जिंकून येणे, यापेक्षा कामाने लोकांचे मन जिंकणे हे अधिक महत्त्वाचे.**

***शेतकऱ्यांना पीक उत्पादनातून मिळणाऱ्या उत्पन्नावर मर्यादा असल्याचे महत्वपूर्ण निरीक्षण केंद्रीय आर्थिक पाहणी अहवालातच नोंदवण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी अर्थमंत्री आर्थिक पाहणी अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहांत सादर करतात. या अहवालात नोंदवलेली ही ओळ म्हणजे शेतकऱ्यांच्या हिताला घातलेला बांधच ठरलेला आहे.***

# भारतीय शेतीला संकटांचे बांध..!

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा सरकारचा संकल्प असल्याचे अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी सांगितले आहे. यापूर्वी देखील खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, असे सांगितले होते. यंदाच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी पीक उत्पादकता वाढ, पशुधन व्यवसायाला प्राधान्य आणि मत्स्य व्यवसाय विकसित करणे असे सांगितले आहे. शिवाय उच्च मूल्य पिकांच्या उत्पादनावर सरकार भर देणार आहे असेही त्यांनी म्हटले आहे. मात्र कापूस, सोयाबीन, तेलबिया, कडधान्य, भरडधान्य उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढणार यावरती अर्थमंत्र्यांनी कोणतेही भाष्य केलेले नाही. यातच सर्व काही ओळखून जावे.

### विधानसभांच्या निवडणुका

दरवर्षी कोणत्या ना कोणत्या राज्य विधानसभांच्या निवडणुका होत असतात. यावर्षी तमिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुचेरी राज्यांच्या निवडणुका होणार आहेत. हे लक्षात ठेवून नारळ, काजू, कोको, अगत चंदन, बदाम, अक्रोड आणि मत्स्य शेतीला प्रोत्साहन देण्याची भाषा अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. ही सर्व पिके अधिक उत्पन्न देणारी असली तरी या शेतकऱ्यांचे प्रमाण देशाच्या एकूण शेतीच्या मानाने अल्प आहे. पण या चारही राज्यांच्यामध्ये यातील महत्त्वाची पिके घेतली जातात. बरोबर याच वर्षी या पिकांची आठवण होण्याचे कारण तेथे होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका हेच आहे. गेल्यावर्षी बिहार विधानसभेची निवडणूक होती. त्यामुळे मखना विषयी सरकारला कळवळा आला होता. मखना विकास बोर्ड स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याची चर्चा बिहारच्या निवडणुकीत खूप झाली. बिहारमध्येच केवळ मखना उत्पादन घेतले जाते. त्या त्या राज्यातील पिकांची आठवण मतांसाठीच होते असे म्हटले तर वावगे ठरू नये.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील शेतकऱ्यांच्या शेतमालाला आधारभूत किंमत मिळवून देण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. याउलट खत अनुदानाच्या तरतुदीमध्ये आठ टक्क्यांची कपात करण्यात आली आहे. २०२५-२६ ची प्रस्तावित तरतूद एक लाख ६७ हजार कोटी रुपये होती. प्रत्यक्षात खताची टंचाई भासल्याने अनुदानात वाढ करण्यात आली. त्यामुळे सुधारित तरतूद एक लाख ८६ हजार कोटी रुपयांवर गेली. त्या तुलनेत येत्या अर्थी वर्षासाठी एक लाख ७० हजार कोटीची प्रस्तावित तरतूद आहे. त्यामध्ये युरियासाठी एक लाख १६ हजार कोटी रुपयांची रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद आहे. इतर खतांसाठी केवळ चोपन्न हजार कोटी रुपये प्रस्तावित तरतूद करण्यात आली आहे.

### सार्वत्रिक निवडणुका

गेल्या दोन अर्थसंकल्पांच्या तुलनेत यंदा शेती क्षेत्राला अत्यंत कमी लेखण्यात आलेले आहे. दोन वर्षांपूर्वी देशभर सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या. त्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांना गोंजारण्याचे काम केले गेले. यंदा कृषी आणि संलग्न क्षेत्रासाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत केवळ सात टक्क्यांची वाढ आहे. २०२६-२७ च्या आर्थिक वर्षासाठी एक लाख ६२ हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. मागील प्रस्तावित तरतूद एक लाख ५८ हजार कोटी होती. मात्र प्रत्यक्षात एक लाख ५१ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले. केवढी प्रस्तावित रक्कम अपेक्षित होती तेवढी देखील खर्च झाली नाही.

गेल्या अर्थसंकल्पामध्ये कडधान्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी सहा वर्षांचा मिशन कार्यक्रम राबवण्यात येणार आहे असे जाहीर करण्यात आले होते. त्यासाठी फक्त एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. कडधान्यांचे उत्पादन कमी असल्यामुळे जवळपास आपल्या देशाची गरज भागवण्यासाठी कडधान्य आयात करावे लागते. सहा वर्षांचा हा मिशन कार्यक्रम होता. मात्र यावर्षी अर्थसंकल्पात यासाठी कोणतीही तरतूदच करण्यात आलेले नाही. ते मिशन विसरून गेले असेच दिसते. कापूस उत्पादन वाढवण्यासाठी कापूस तंत्रज्ञान मिशनसाठी म्हणून अर्थसंकल्पात काही तरतूद करण्यात आलेली नाही. तसेच भाजीपाला आणि फळे उत्पादन वाढ मिशन आणि संकरित बियाणे मिशन यांचा यावर्षीच्या अर्थसंकल्पात कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. पंतप्रधान कृषी सिंचन योजना ६,३७६ कोटीवरून ६,५८६ कोटी पर्यंत किरकोळ वाढ करण्यात आलेले आहे. पिक विमा योजनेसाठी कोणतीही वाढ केलेली नाही. पीएम किसान योजनेद्वारे शेतकऱ्यांना थेट पैसे देण्यात येतात त्यामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. डेअरी विकासासाठी केवळ ५५ कोटी रुपयांची वाढ करून १,०५५ कोटीची प्रस्तावित तरतूद करण्यात आली आहे. भारतासारख्या मोठ्या देशांमध्ये डेअरी विकासासाठी तुटपुंजी तरतूद करणे हे हास्य हास्यस्पद आहे.

### पायाभूत सुविधांसाठी

या सर्व तरतुदी पाहिल्यानंतर अर्थसंकल्पामध्ये शेती विषयी काही विशिष्ट धोरण घेतले आहे, असे अजिबात दिसत नाही. याउलट यावर्षीच्या ५३ कोटी लाख ४७ हजार कोटीचा अर्थसंकल्प मांडताना पायाभूत सुविधांचा साठी भांडवली खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आलेली आहे. गेल्या वर्षी पायाभूत सुविधांसाठी दहा लाख ९५ हजार कोटींची तरतूद केली होती. यंदाच्या अर्थसंकल्पात तब्बल १२ लाख २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये ही वाढ साडेअकरा टक्के आहे. मोदी सरकार सत्तेवर आले. त्यावर्षी पायाभूत सुविधांसाठीचा सरकारचा भांडवली खर्च दोन लाख कोटी होता. तो आता बारा लाख कोटीच्या पुढे गेला आहे. म्हणजे त्याच्यामध्ये सहा पटीने वाढ झाली आहे शेती साठीची तरतूद सात टक्क्याने वाढवलेले आहे मुळात ती ही वाढ एक लाख ६२ हजार कोटी वर करण्यात आली आहे पायाभूत सुविधांच्या दीक्षित करण्यासाठी विकसित करण्यासाठी भांडवली खर्च १२ लाख कोटींहून अधिक असताना देशातील निम्मी लोकसंख्या ज्या शेतीवर अवलंबून आहे तिच्यासाठी खूपच कमी तरतूद करण्यात आली आहे

बिहारने वारंवार गरीब राज्य म्हणून विशेष पॅकेजची मागणी केली होती. या संदर्भात पाच वर्षांपूर्वी दीड लाख कोटी रुपये रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. त्या दीड लाख कोटी पैकी ६० हजार कोटी रुपये रस्ते बांधणीवर खर्च करण्यात आले. २५ हजार कोटी रुपये गंगा नदीवर पूल बांधण्यावर खर्च करण्यात आले. विद्युतीकरणासाठी १७ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले. अशा प्रकारे या दीड लाख कोटीचा खर्च पायाभूत सुविधा निर्माण करण्यात केला. त्यामुळे बिहारमध्ये बदल झाल्याचे रस्त्यावरून जाताना दिसत असले तरी प्रत्यक्षात बिहारची समस्या रोजगार निर्माण ही काही सुटली नाही. त्यात काही सुधारणा झाले नाही त्यामुळे दीड लाख कोटीचे बिहारला दिलेले पॅकेज हे सर्व कंत्राटदारांना कामे देण्यासाठी वापरण्यात आले. त्यातून रस्ते उभारले, विद्युत पुरवठा सर्वांच्या घरी होऊ लागला. पूल बांधण्यात आल्याने वाहतूक सुलभ झाली. मात्र ही कामे संपल्यानंतर रोजगार निर्मितीला कोणताही हातभार लागला नाही. अशीच परिस्थिती कृषी क्षेत्राची यावर्षीचा अर्थसंकल्प पाहिल्यानंतर दिसते आहे.



### मूळ प्रश्नांना बगल

शेती क्षेत्राला भेडसावणाऱ्या मूळ प्रश्नांना बगल देत केवळ चालू योजनांसाठी जैसे थे आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात शेतीच्या वाटेला काही आलेले नाही. वर उल्लेख केल्याप्रमाणे तमिळनाडू किंवा केरळ राज्यामध्ये नारळ आणि काजू सारख्या उच्च मूल्य असलेल्या पिकांवर भर दिल्याचे दिसते. बंगाल आणि आसाममध्ये पशुधन तसेच मत्स्य व्यवसायासाठी भरीव तरतूद केल्याचे भासवण्यात आले आहे. प्रत्यक्षात त्यासाठी तुटपुंजी आर्थिक तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांच्या हातात नारळ देण्या व्यतिरिक्त काही करण्यात आलेले नाही हे स्पष्ट दिसते आहे.

भारत आर्थिक महासत्ता होईल असे स्वप्न केंद्र सरकारकडून रंगवले जात आहे. आत्मनिर्भरता आर्थिक महासत्तेचा महत्वाचा पाया मानला जातो. अशावेळी आपण सुमारे साठ टक्के खाद्यतेल आणि चाळीस टक्के डाळी आयात करतो. यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च केले जाते.

गेल्या वर्षी कडधान्य उत्पादन वाढवण्यासाठी सहा वर्षे चालणारा कडधान्य उत्पादन मिशन जाहीर करण्यात आले. पण त्याची सुरुवात काही नीट झाले नाही. यावर्षी तर त्यासाठी तरतुदी करण्यात आलेली नाही. अनेक शेती उत्पादनामध्ये आपण आत्मनिर्भर झालेलो नाही. केवळ तांदूळ, गहू आणि साखर या उत्पादनामध्ये आपण देशाची गरज भागवेल इतकी प्रगती केली आहे. शिवाय तांदूळ आणि गहू निर्यात देखील आपण करतो. साखर उद्योगासंदर्भात या अर्थसंकल्पात उल्लेख देखील करण्यात आलेला नाही.

गेली पाच – सहा वर्षे उसाचा उत्पादन खर्च वाढतो. म्हणून ऊसाची किमान आधारभूत किंमत वाढवण्यात आली. पण साखरेच्या बाजारपेठेवर पूर्ण नियंत्रण ठेवणाऱ्या केंद्र सरकारने साखरेचे दर वाढणार नाहीत याची पुरेपूर काळजी घेतली. ऊस कच्चामाल आहे. कच्च्या मालाचे भाव वाढत आहेत. त्या तुलनेत पक्क्या मालाचे (साखर) दर वाढवण्यास सरकार उत्सुक नाही. त्यांना साखर खाणाऱ्यांची चिंता आहे. वास्तविक घरगुती वापरासाठी साखर एकूण उत्पन्नापैकी एकूण ३५ टक्केच वापरली जाते.,उर्वरित साखर ही वेगवेगळ्या शीतपेय आणि मिठाईसाठी वापरली जाते. त्यामुळे साखरेचे दर वाढल्याने कोणतेही आकाश कोसळणार नसून देखील शहरी मध्यमवर्गीय लोकांसाठी साखरेचे दर वाढू दिले जात नाहीत. परिणामी यावर्षी संपूर्ण साखर उद्योगच संकटात आला आहे. उत्पादन खर्च वाढलेला आहे आणि उसाचे दर वाढवून दिल्याने त्यामध्ये आणखीन भर पडलेली आहे. हा खर्च भरून येण्यासाठी साखरेचा किमान आधारभूत दर ४५ ते ५० रुपये पर्यंत असणे अपेक्षित आहे यावर अर्थमंत्र्यांनी कोणताही निर्णय घेतलेला नाही. दरम्यान अर्थसंकल्पामध्ये शेती क्षेत्राची उपेक्षा होत असल्याची चर्चा होत असतानाच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत -अमेरिका करार एकतर्फी जाहीर करून टाकला. त्याचेसविस्तर तपशील अजून देण्यात आलेले नसले तरी जी काही माहिती समोर येते आहे. त्यानुसार अमेरिकेच्या शेतमालाला भारतात आयात करताना कोणतेही शुल्क लागणार नाही. हे निश्चित झाले आहे. शिवाय रशियाकडून भारताने तेल विकत घेऊ नये, अशी अट अमेरिकेने घातली होती. त्याविषयी भारताने कोणतीही भूमिका घेतली नसल्याने अमेरिकेने भारतातून आयात होणाऱ्या मालावर पन्नास टक्के टेरिफ तयारी लावला होता. हा टेरिफ कमी करून साडेअकरा टक्के करण्याचा निर्णय अमेरिकेनेच परस्पर जाहीर करून टाकला आहे. भारत अमेरिकेच्या या करारावर अमेरिकेच्या कृषी मंत्री ब्रुक रॉलीन्स यांनी आनंद व्यक्त केला आहे. भारताची प्रचंड लोकसंख्या असलेली बाजारपेठ या करारामुळे खुली होत असल्याने आणि त्यावर कोणत्याही प्रकारचा कर लादला जाणार नसल्यामुळे अमेरिकेतील शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल. शिवाय मोठ्या प्रमाणात अनुदान देऊन अमेरिकेच्या जगवलेल्या शेतकऱ्यांचे उत्पादन भारताच्या बाजारपेठेत विकता येईल याचा देखील त्यांना आनंद झालेला असणार आहे. या पार्श्वभूमीवर भारताचे कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आपली आपली प्रतिक्रिया स्पष्ट नोंदवलेली नाही. केवळ या कराराचे मी स्वागत करतो असे म्हटले आहे. जो करार भारतीय शेतकऱ्यांच्या हिताचा नाही त्याचे स्वागत करण्यात शिवराजसिंह चौहान यांना आनंद वाटतो, याचे आश्चर्य आहे. हा करार प्रत्यक्षात अंमलात येईल. तेव्हा सोयाबीन, मका, कापूस, इथेनॉल, दूध उत्पादन यासाठी भारताची बाजारपेठ खुली होणार आहे.

अमेरिकेत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अनुदान दिले जाते त्यामुळे त्यांना कमी दरात शेतीमाल विकणे परवडू शकते. एकीकडे भारतीय शेतकरी बदलत्या हवामानामुळे अडचणीत असताना अमेरिकेसाठी भारतीय बाजारपेठ खुली करून देणे म्हणजे स्वतःच्या पायावर दगड मारून घेणे, असेच म्हणावे लागेल. अमेरिकेच्या दबावापुढे भारताने मान झुकवली आहे, असेच त्याचे वर्णन करता येईल. तरीदेखील हा करार भारतासाठी सर्वोत्कृष्ट आहे असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत सत्कार करण्यात आला. किती मोठा विरोधाभास आहे. जो तपशील पुढे आला आहे. त्यानुसार भारत- अमेरिकेच्या कराराचा अर्थच या सरकारला कळला नाही असे समजायचे का?

भारत यापूर्वी अमेरिकेतून आयात होणाऱ्या वस्तूंवर १७ टक्के आयात शुल्क लावत होता. तो आता शून्य टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे, असे डोनाल्ड ट्रम्प यांनीच जाहीर करून टाकले आहे. याउलट भारतावर केवळ ३.३ टक्के आयात शुल्क अमेरिका लावत होते. ते आता १८ टक्के केले. याच्यामध्ये फार मोठा फायदा झाला अशा बाता मारण्यात येऊ लागल्या आहेत. आपण १७ टक्क्यांवरून शून्यावर आलो आणि अमेरिकेने ३.३ चे १८ टक्के केले यात आपल्याला समाधान आहे. एखाद्या वस्तूची भरमसाठ किंमत सांगायची आणि निम्मा दर कमी करायचा तेव्हा आपण दर कमी करून वस्तू खरेदी केली याचा आनंद मानायचा असा हा प्रकार. यातून आपल्या शेतीचे संरक्षण होईल असे वाटत नाही. भारतीय शेतीचे यातून कंबरडेच मोडेल असे स्पष्ट दिसते आहे.

**वसंत भोसले**

# शेतकऱ्यांच्या रक्ताने सिंचित भारतीय शेती

**शेहचाळीस, सत्तेचाळीस, एक्कावन्न, पंचावन्न, साठ, श्याहऐंशी, नव्वद, दोनहजार, दोन हजार चौदा आणि सहवीस ह्या नुसत्या सनावळी नाहीत, आकडे नाहीत, नुसत्या तारखा नाहीत. ह्या शेतकऱ्यांवर झालेल्या खोल जखमा आहेत. ह्या जखमांनी झालेल्या रक्तस्त्रावाने आलेल्या महापुरात भारताच्या शेतक ऱ्यांनी शेतीचे सिंचन केले. किसानपुत्रांच्या पिढ्या त्यात बरबाद झाल्या. ह्याच तारखा नव्हे तर येणारा प्रत्येक दिवस शेतकऱ्यांसाठी रक्तरंजित राहिला. सगळ्यांनाचे तपशील एका लेखात देणे शक्य नसल्यामुळे ह्या तारखा नमुनादाखल घेतल्या आहेत.**

१९४६ साली दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिश सरकारने आवश्यक वस्तूंचा अध्यादेश काढला. हा आदेश शेतकऱ्यांच्या नरड्याला बांधलेला कासरा होता. लगाम घाटलेली घातलेली बेडी.

१९४७ ला देश स्वातंत्र्य झाला. या स्वातंत्र्यासाठी शेतकऱ्यांनी मोठा लढा दिला होता. शेतकऱ्यांच्या मुलांनी हौतात्म्य पत्करले होते. आता गुलामी संपली असे त्यांना काही क्षण वाटले. पण तसे झाले नाही. आवश्यक वस्तू अध्यादेशाचा कासरा गळ्यांत तसाच राहिला. स्वातंत्र्याच्या सूर्याचा प्रकाश शेतकऱ्यांच्या घरात आलाच नाही.

१९४८ साली मुंबई कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम आला. 'कसेल त्याची जमीन' अशी घोषणा देण्यात आली. ('काम करेल त्याचा कारखाना' किंवा 'राहील त्याचे घर' अशी घोषणा कोणी दिली नाही) या कायद्याने भूमिहीन कुळाना जमिनी मिळाल्या.

१९५० च्या २६ जानेवारीला संविधान स्वीकारले गेले. यां लिखित संविधानात स्वातंत्र्याची म्हणजेच मूलभूत अधिकारांची हमी देण्यात आली होती. पुन्हा आशेची पालवी फुटली. पण अवघ्या दीड वर्षात ती पालवी देखील सुकून गेली.

१९५१ ला पहिली घटनादुरुस्ती (बिघाड) करण्यात आली. त्यातून परिशिष्ट ९ संविधानात समाविष्ट करण्यात आले. या परिशिष्टात टाकलेल्या कोणत्याही (मूलभूत अधिकाराचे उलघन करणाऱ्यासुद्धा) कायद्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही, अशी तजवीज करण्यात आली. शेतकऱ्यांना गुलाम करणारा एक पिंजरा संविधानात बसविण्यात आला. आज त्याटील २८४ पैकी २५० कायदे शेतकऱ्यांशी निगडित आहेत. ही शेतकऱ्यांना गुलाम करनारी व्यवस्था अस्तित्वात आली.

१९५५ साली पुन्हा एक घटनादुरुस्ती (बिघाड) करून आवश्यक वस्तू आध्यादेशाचे कायद्यात्त रूपांतर करण्यात आले. शेतीमालावर केंद्र सरकारचे नियंत्रण आले. शेतकरी अजून दुबळा झाला.

१९६० साली कमाल शेतजमीन धारणा कायदा आला. हाच सीलिंग कायदा. १९४८चा कूळ कायद्याने भूमीहीनाना जमिनी दिल्या होत्या तरी ६०ला पुन्हा नवा कायदा करून शेतकऱ्यांवर शेतजमीन मालकीची मर्यादा टाकण्यात आली. या कायद्याने जमिनीचे विखंडन झाले. लहान लहान तुकड्यात जमीनीचे तुकडे झाले. शेतकऱ्यांच्या कंपन्या निर्माण होऊ शकल्या नाहीत, नवी गुंतवणूक थांबली. शेतकरी देशोधडीला लागले. आज सरांसरी होल्डिंग २ एकरच्या आत आली आहे. एवढ्याश्या जमिनीवर जगणे अशक्य झाले आहे.

१९ मार्च १९८६ रोजी साहेबराव करपे कुटुंबाने सामूहिक प्राणत्याग केला. त्या आधीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच होत्या, त्यांची वेगळी नोंद सरकार ठेवत नसे. पण या घटनेने महाराष्ट्र प्रचंड हादरला होता. न्यायालयाच्या आदेशानुसार शेतकरी आत्महत्यांची वेगळी नोंद ठेवली जाऊ लागली. शेतकरी आत्महत्यांचा आकडा पाच लाखापर्यंत गेला. एवढ्या आत्महत्या कोणत्याचं अन्य क्षेत्रात झाल्या नाहीत. ना महामारीत एवढी माणसे मेली, ना महायुद्धात मारली गेली. शेतकरी आत्महत्यांना सरकारने राष्ट्रीय आपत्ती मानलेली नाही. हे केवढे मोठे दुर्दैव आहे.

१९९० नंतर सरकारने अर्धवट खुलीकरण (उदारीकरण) स्वीकारले. अर्धवट यासाठी की शेती क्षेत्रात खुलीकरण आलेच नाही. काही प्रमाणात 'इंडिया'त आले. या काळात संगणक आले. नवे तंत्रज्ञात आले. रोजगाराचे नवे क्षेत्र खुले झाले. शेतकऱ्यांनी आपली मुले शेतीतून बाहेर काढायला सुरुवात केली. शेतीत आता राम राहिला नाही ही भावना दृढ झाली. मोठे स्थलांतर सुरु झाले. याच काळात बाबरी मशीद-राम मंदिर यावरून बातावरण तापवण्यात आले. हिंदू मुस्लिम द्वेषाग्नी भडकाविण्यात आला. मंडल आयोगाच्या निमित्ताने जाती जातीत तणावं निर्माण करण्यात आले. राजकीय अस्थिरता निर्माण झाली.

२०१४ साठी नरेंद्र मोदी व अमित शहा यांचे भारतीय जनता पक्षाचे सरकार आले. हे सरकार उठता बसता काँग्रेस आणि नेहरुंना शिव्या घालणारे. मोदी म्हणाले 'मी कायदे रद्द करेन.' शेतकऱ्यांना पुन्हा आशा वाटली. त्यांनी मेलेल्या कायद्यांचा तेवढा दफनविधी केला. पण ज्या कायद्यांमुळे माणसे मरत होती, त्या कायद्यांना मात्र हात लावला नाही. उलट मिटक्या मारीत त्यांची अंमलबजावणी केली. १९ला पुन्हा सरकार आले. यां काळात करोना आला. जिडीपी कोसळला. तिजोरीत खळखळाट झाला. तेंव्हा तीन नवे कायदे आणले. जुने तीन कायदे तेंव्हाही रद्द केले नाही. जे तीन कायदे आणले होते ते मनमोहन सरकारने सुचवलेले. अनेक राज्यात लागू असलेले. देशभक्तीचा गवगवा करणाऱ्या, पूर्ण बहुमतात असलेल्या, मोदी-शहा सरकारने उत्तर प्रदेशची निवडणूक येताच शेपूट घातली. तीनही कायदे परत घेतले.

१९२६ पाण्याचा जसा उताराकडे वाहण्याचा स्वभाव आहे तसाच माणसाचा स्वातंत्र्यांकडे जाण्याचा. आत्महत्या की स्थलांतर असे दोनच पर्याय समोर असताना बहुसंख्य शेतकऱ्यांनी आपल्या मुला-मुलींसाठी दुसरा पर्याय निवडला. शेतीक्षेत्रात ऐतिहासिक संक्रमाण झाले. आता शेतीक्षेत्रात निव्वळ शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या केवल १५ टक्के राहिली आहे. शेतीबाह्य पैसा घरात आला आणि आत्महत्या तळली. जे १५-२० टक्के लोक शेतीत अडकले आहेत, त्यांच्या घरातच आज आत्महत्या घोगावात आहे. भारत देश 'बलसागर' करायचा असेल तर शेतीक्षेत्र बलवान करणे नितांत गरजे आहे. त्यासाठी शेतकरीविरोधी कायदे रद्द करावे लागतील. जोपर्यंत शेतकरीविरोधी कायदे रद्द होत नाहीत, तोपर्यंत शेतीची दुर्दशा थांबणार नाही.

१९ मार्च रोजी आपण एक दिवस उपवास/अन्नत्याग करून आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करू व शेतकरी स्वातंत्र्यासाठी पुन्हा संकल्पबद्ध होऊ! ही छोटीसी कृती कदाचित शेतकऱ्यांचा रक्तपत थांबवेल.

किसानपुत्रांनो, तुम्ही शेतीच्या जोखडातून बाहेर पडला असलात तरी हे काम आपल्यालाच करावे लागेल. दुसरे कोणी करेल याची वाट पाहू नका.

व्यक्तिगत उपवास करा, सामूहिक उपोषण करा पण १९ मार्च रोजी एक दिवस शेतकऱ्यांना विसरू नका! कारण आजही अन्ना शिवाय हे जग चालू शकत नाही. अन्न आहे म्हणून जग तिले आहे. रक्तरंजित किसानानीच हे जग टिकवले आहे.

**अमर हबीब,** आंबाजोगाई
किसानपुत्र आंदोलन
मो.८४११९०९९०९

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# नीती आयोगाच्या केंद्रीय अधिकाऱ्यांकडून झरी जामणी येथील योजनांचा आढावा

## पुसद व झरी जामणीचा आकांक्षित तालुक्यात समावेश
## केंद्रीय प्रभारी अधिकारी म्हणून पल्लवी होळकर यांची नियुक्ती

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील आकांक्षित तालुका झरी जामणी येथे सांस्कृतिक मंत्रालयाच्या केंद्रीय प्रभारी अधिकारी तथा संचालक पल्लवी होळकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला.

जिल्ह्यातील आकांक्षित तालुक्यांसाठी नीती आयोगाने पल्लवी होळकर यांची केंद्रीय प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली असून त्यांनी नुकताच जिल्ह्याचा दौरा केला होता. या दौऱ्यादरम्यान त्यांनी आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी, प्रगती, अडचणी व पुढील संधी यांचा अभ्यास केला. तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व भागधारक यांना आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले. नीती आयोगाच्या निर्देशानुसार यवतमाळ जिल्ह्यातील पुसद व झरी जामणी आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून तालुक्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी नीती आयोग व राज्य शासनामार्फत आरोग्य व पोषण, शिक्षण, आर्थिक समावेशन, मूलभूत सुविधा, सामाजिक विकास, कृषी व संलग्नित सेवा या क्षेत्रांतील 40 निर्देशकांची निवड करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने केंद्रीय प्रभारी अधिकारी पल्लवी होळकर यांनी 5 फेब्रुवारी रोजी झरी जामणी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, शिबला, अंगणवाडी केंद्र, शिबला चौफुली, सार्वजनिक वाचनालय, ग्रामपंचायत शिबला तसेच महिला बचत गट, पाटण येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. या ठिकाणी सुरू असलेल्या सेवा, लाभार्थ्यांना मिळणारे लाभ व कामकाजाची गुणवत्ता याबाबत आढावा घेऊन त्यांनी आवश्यक त्या सुधारात्मक उपाययोजना सुचविल्या. या पाहणी दरम्यान तहसीलदार अक्षय रासने, गटविकास अधिकारी र. वि. सांगळे, आकांक्षित तालुका फेलो अनिल नरवाडे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आढावा बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे, गटविकास अधिकारी अमोल आंदेलवाड, रवी सांगळे, प्रकल्प संचालक (उमेद व प्रधानमंत्री आवास योजना) पिंगळे, स्वाती आस्थाना, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत युवराज मेहत्रे, आकांक्षित तालुका फेलो अनिल नरवाडे तसेच अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### महिला सक्षमीकरणावर भर

ग्राम व तालुका स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत केंद्रीय प्रभारी अधिकारी पल्लवी होळकर यांनी विकास प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, उपलब्ध संधी आणि त्यावरील उपायांबाबत सविस्तर चर्चा केली. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती कशी सुधारत आहे, याची माहिती त्यांनी घेतली. महिलांनी नवीन उद्योग, स्वयंरोजगार उपक्रम सुरू करावेत, असे आवाहन करून महिला सक्षमीकरणावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच कृषी व संलग्नित सेवा, पर्यटन, शिक्षण, आरोग्य, आजीविका व अंगणवाडी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले. शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवून झरी जामणी हा प्रेरणादायी आकांक्षित तालुका व्हावा, असे त्यांनी नमूद केले.

### जिल्हाधिकारी कार्यालयात कृती आराखड्यावर चर्चा

केंद्रीय प्रभारी अधिकारी पल्लवी होळकर यांच्या अध्यक्षतेखाली 6 फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा व तालुका स्तरावरील सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत विविध विभागांना भेडसावणाऱ्या अडचणी, विकासातील संधी आणि पुढील कृती आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

---

## २.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त, यवतमाळ जिल्ह्यातील चार गुन्हे उघड

# चारचाकी वाहनांच्या बॅटरी चोरीप्रकरणी तिघांना अटक !

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - चारचाकी वाहनांच्या बॅटऱ्या चोरणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी धडक कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून २ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे यवतमाळ जिल्ह्यातील चार चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

९ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की काही इसम चारचाकी वाहनांच्या बॅटऱ्या चोरी करून त्या विक्रीसाठी अँपे वाहनातून यवतमाळ परिसरात फिरत आहेत. या माहितीनुसार पोबारू ले-आऊट परिसरात सापळा रचून अँपे (क्रमांक MH-29-BD-1689) थांबवण्यात आले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात बॅटऱ्या आढळून आल्या.

चौकशीत आरोपींनी आपली नावे शेख रब्बु शेख नवाब (वय २६), परमेश्वर सुनील राठोड (वय २५) व साहील शंकरराव खवासे (वय २१) अशी सांगितली. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिल्यानंतर पंचासमक्ष चौकशीत त्यांनी दारव्हा, यवतमाळ ग्रामीण व अवधुतवाडी हद्दीतून बॅटऱ्या चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून २० बॅटऱ्या व गुन्ह्यात वापरलेले अँपे वाहन असा एकूण २.१५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर मुद्देमाल दारव्हा, यवतमाळ ग्रामीण व अवधुतवाडी पोलीस ठाण्यात दाखल चार गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

---

## • वेचक




### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समितीतर्फे मल्लखांब योगापटुंचा गौरव

यवतमाळ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या दुसऱ्या पर्वातील छत्तीसावे पूजन रविवार दि.८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पुजन व स्मारकाची साफसफाई करण्यात आली यावेळेस मल्लखांब व योगापटुंचा गौरव आयोजित करण्यात आली होता. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील यशस्वी वडतकर, रुतीका तगडपल्लेवार, पद्मजा इंगळे, मिहिरा राऊत, उन्नती वंदेकर, प्रिन्स मडवे, गार्गी पवार, देवांश बिडवे, आयुष गावंडे, शंतनू भारस्कर, सोहंम पेंडसे, गार्गी राऊत, तनय वानखेडे, अर्णव कोठारी, श्रीनित शहाडे, मल्हार कुथे, द्यानंदी ढोबळे या खेळाडूंचा तसेच प्रशिक्षक डॉ. सुभाष डोंगरे, सुभाष भनक यांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीतर्फे छोटेखानी गौरव सोहळ्याचे आयोजन म.फुले चौक, आझाद मैदान समोर, यवतमाळ येथे करण्यात आले होते. या सोहळ्याला शोभा पुनसे, लतिका शेळके, पवन थोटे, सुरेश भावेकर, सुनील सोडगीर, विजय शिंदे, किशोर शेळके, विष्णुपंत गाडेकर समाज बांधव भांगिनीं मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

### ढाणकी शहरात दोन नवीन आधार केंद्र सुरू करण्याचा ठराव मंजूर




ढाणकी : शहराची वाढती लोकसंख्या आणि परिसरातील गावांसाठी बाजारपेठेचे महत्त्वाचे ठिकाण लक्षात घेता, शहरात नवीन दोन आधार केंद्र सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव नगरपंचायत प्रशासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी पुढाकार सध्याच्या काळात सर्व शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड अनिवार्य झाले आहे. मात्र, शहरात पुरेशी आधार केंद्रे उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना वेळेचा अपव्यय आणि आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत होता. ही अडचण ओळखून नगरपंचायत अध्यक्ष सौ. अर्चना सुंदरकांता वासमवार यांनी हा प्रस्ताव मांडला, ज्याला उपनगर अध्यक्ष श्री. दत्तदिगांबर श्रीकृष्ण वानखेडे यांनी अनुमोदन दिले. प्रस्ताव वरिष्ठांकडे रवाना : या ठरावाद्वारे शासनाला विनंती करण्यात आली आहे की, ढाणकी शहरात तातडीने दोन नवीन आधार केंद्र सुरू करण्यात यावेत. नगरपंचायतीच्या या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांसह आजूबाजूच्या ग्रामीण भागातील लोकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे. सभेने या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी दिली असून, पुढील कार्यवाहीसाठी हा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकाऱ्यांनी दिली आहे.



### महागाव येथे माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंती साजरी

महागाव - ७ फेब्रुवारी रोजी माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक माधवजी वाढवे साहेब यांचा भीम गीतांचा दणदणीत कार्यक्रम करण्यात आला व श्रावस्ती बौद्ध विहारात विविध कार्यक्रम घेण्यात आले काही महिलांनी रमाबाई यांच्या जीवनावर भाषन प्रबोधन केले तर काही महिलांनी रमाबाई यांचे गीत गायले छोट्या छोट्या बालीकांनी डान्स मध्ये भाग घेतला मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. आयोजन रमाबाई महिला मंडळ व समता सैनिक दल महीला आणि सर्व उपासक उपासिका उपस्थित श्रावस्ती बौद्ध विहार महागाव येथे.

---

# पुसद येथे अखिल भारतीय फुटबॉल सामन्याचे नगर अध्यक्षा मोहीनी नाईक यांच्याहस्ते उद्घाटन!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

## पहिल्या सामना दारव्हा विरुद्ध वर्धा चुरशीचा ठरला



पुसद - चेतना किडा मंडळ पुसद च्या वतीने कै भैयासाहेब राजे व माजी मुख्यमंत्री सुधाकररावजी नाईक यांच्या स्मृती प्रित्यर्थ अखील भारतीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन हे दिनांक १० फेबृवारी २०२६ ते १७ फेब्रुवारी २०२६ पावेतो करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उदघाटन आज १० फेब्रुवारी २०२६ रोजी यशवंत रंग मंदिर तालुका किडा संकुल पुसद येथे नगराध्यक्षा पुसद न.प.ॲड.सौ मोहीनीताई इंद्रनील नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती एस.जे. रामगढीया मॅडम जिल्हा न्यायाधिश-१ पुसद हया होत्या तर प्रमुख उपस्थिती श्रीमती शहा मॅडम जिल्हा न्यायाधिश-२ हया प्रामुख्याने उपस्थीत होत्या. त्यावेळी शहरातील मान्यवर माजी बांधकाम सभापती ॲड. उमाकांत पापीनवार,डॉ. संजय भांगडे, निशांत बयास नगरसेवक, बांधकाम सभापती अभिजीत पानपट्टे, आरोग्य सभापती मजहर खान, नगर सेवक दिपक काळे, शेख कयुम, पत्रकार संघाचे अध्यक्ष ललीत सेता, मंडळाचे आश्रयदाते परमेश्वर जयस्वाल, पत्रकार मारोती भस्मे, इस्त्याकभाई, अब्बासभाई, कौस्तुभ धुमाळे सर, ॲड पंकज वटट्मवार, सागर जोशी, इत्यादि मान्यवर हजर होते. मंडळाच्या वतीने जेष्ठ सदस्य तथा उपाध्यक्ष इद्रीसखान सर, अध्यक्ष ॲड विरेंद्र राजे, सचिव सुशिल दिक्षीत, शेख मकसुद, बलराम मुराडी सर, विजय चंदन, बबलु खान, भगवान पवार, नंदकुमार चौधरी, नंदु पांडे, पाशाभाई, लतीफ गौरी, ॲड शंकर गि-हे, सरफराज जाटु, सनी मांजरे, कामरान सेठ, शाहरुखभाई, अजहर खतीब राजीकभाई, रशिद पेले, गजेंद्र चापके, अजय पोंगाडे, संकेत मोगरे, राहुल कोरडे, अजय चंदन, गणेश भिसे, राजु भिसे, राजु श्रीवास, परशुराम इंगोले, सुधीर राठोड सर, गजानन कोरडे, विक्की राठोड, रवि राय, अक्षय गौड, इत्यादि चेतना किडा मंडळ पुसद चे सदस्य तसेच हितचिंतक व प्रेक्षक हजर होते. उदघाटनाच्या कार्यक्रमाचे दिवशी वाघापुर यवतमाळ - विरुध्द वर्धा जिल्हा फुटबॉल क्लब हा सामना रंगला या सामन्यात वर्धा जिल्हा फुटबॉल क्लब हा ४-० ने विजयी झाला.

---

# मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण : तात्काळ बंदोबस्ताची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ शहरातील वडगाव रोड परिसरातील सहकारनगर, महादेवनगर, राणाप्रताप नगर तसेच परिसरात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास वाढला असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या भागात मोकाट कुत्र्यांकडून अबालवृद्धांवर सातत्याने हल्ले होत असून दररोज दोन ते तीन नागरिकांना कुत्रे चावत असल्याच्या घटना घडत आहेत. या घटनांमुळे अनेकांना गंभीर दुखापत होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आज घडलेल्या एका गंभीर घटनेत अंजली चौधरी (निवृत्त शिक्षिका) यांच्यावर गुलशन प्रोव्हिजन दुकानाजवळ, तसेच यवतमाळ नगराध्यक्षांच्या निवासस्थानाजवळ मोकाट कुत्र्यांनी अचानक हल्ला चढविला. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. त्यांना भोवळ आल्यामुळे नागरिकांच्या मदतीने तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागात अशा प्रकारच्या घटना सातत्याने घडत असून नागरिकांना रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. विशेषतः लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांना या कुत्र्यांचा मोठा धोका निर्माण झाला आहे. शाळेत जाणारी मुले तसेच नागरिक भीतीपोटी घराबाहेर पडण्यास घाबरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील नागरिकांनी यवतमाळ नगरपालिकेकडे मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. संबंधित विभागाने या समस्येची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, यवतमाळच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रियदर्शिनी उईके यांच्या निवासस्थानाच्या परिसरातच सदर घटना घडत असल्याने नगरपालिकेने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन प्रभावी उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

---

# शिक्षण उपसंचालकांकडून बारावीच्या परीक्षा केंद्राची पाहणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - उच्च माध्यमिक शालांत (इयत्ता बारावी) परीक्षेला आजपासून सुरुवात झाली असून, परीक्षेच्या पहिल्याच दिवशी शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती येथील उपसंचालक श्रीमती नीलिमा टाके यांनी यवतमाळ येथील जि.प. (मा.शा.) माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, गोधनी रोड येथील परीक्षा केंद्राला भेट देत पाहणी केली.

यवतमाळ जिल्ह्यात यावर्षी बारावीची परीक्षा देणाऱ्या ३५ हजार ३५२ विद्यार्थ्यांसाठी १२७ परीक्षा केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. परीक्षेची प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध व कॉपीमुक्त पार पडावी, यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यासोबतच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती देखील करण्यात आली आहे. या सर्व तयारीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी उपसंचालक नीलिमा टाके यांनी आज गोधनी रोड येथील जि.प. (मा.शा.) माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रास भेट दिली. त्यांनी परीक्षा केंद्रावरील व्यवस्थापन, बैठक व्यवस्था, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, सुरक्षा उपाययोजना तसेच पर्यवेक्षकांची कार्यपद्धती यांची सविस्तर पाहणी केली. पाहणीनंतर त्यांनी एकूणच परीक्षा व्यवस्थेवर समाधान व्यक्त केले. या पाहणीदरम्यान जिल्हा परिषद माध्यमिकचे शिक्षण अधिकारी किशोर पागोरे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला येथील प्राचार्य रत्नमाला खडके, यवतमाळ पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर, शाळेचे प्राचार्य साहेबराव पवार, शिक्षण उपनिरीक्षक राजेश मनवर (अमरावती) यांच्यासह अन्वर अहमद मोहम्मद निसार, गणेश गोडबोले, अरुण नांदेकर आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

---

# "पर्यावरण संवर्धनासाठी युवकांचा सक्रीय सहभाग आवश्यक" : रुपेश रेंगे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - कला, वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे दत्तक ग्राम वरूड जहागीर येथे २ ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत "शाश्वत विकासासाठी युवा : पाणलोट व्यवस्थापन आणि पडिक जमीन विकास" या थिमवर आधारित विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरादरम्यान दिनांक ८ फेब्रुवारी रोजी "जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धन" या विषयावर बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. विशाल दौलतकर यांनी केले. त्यांनी जलसंधारण व पर्यावरण यांचा निकटचा संबंध अधोरेखित करत पर्यावरण संवर्धनासाठी जलसंधारणावर कार्य करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. मुख्य वक्ते मा. रुपेश रेंगे (पाणी फाउंडेशन पुरस्कार विजेता) यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून संवाद साधला. त्यांनी पावसाचे पाणी वाहून न जाता चंद्राकार चर, रेनवॉटर हार्वेस्टिंग, शोषखड्डे, वृक्षारोपण, ठाळीचे बांध, शेततळे, नदीनाल्यावर बंधारे अशा उपाययोजनांची माहिती दिली. युवकांमध्ये जलसंधारण व पर्यावरण संवर्धनाची आवड निर्माण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा. अनिल दौलतकर यांनी गावातील युवकांनी जलसंधारण व पर्यावरण संवर्धनासाठी सक्रीय सहभाग घेण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे संचालन दिव्या वाकुलकर (बी.ए. भाग २) हिने केले तर आभार प्रदर्शन संदीप खंदारे (बी.ए. भाग १) यांनी केले. या कार्यक्रमाला महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. शालिनी हटवार, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. धीरज गोबरे, माजी विद्यार्थी सुशील दांदडे, पंकज आत्राम, रासेयो स्वयंसेवक व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे प्राथमिक शाळेतील लहान मुले व त्यांच्या पालकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. अशा प्रकारे हे बौद्धिक सत्र रासेयो स्वयंसेवकांसाठी मार्गदर्शक ठरलेच, पण गावातील लहान मुलांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देणारे ठरले.

---

# पांढरकवडा डायलेसिस युनिटमध्ये वैद्यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांच्या जीविताला धोका

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - उपजिल्हा रुग्णालय पांढरकवडा येथे सुरू करण्यात आलेल्या महा-डायलेसिस युनिटमध्ये आजतागायत एकही वैद्यकीय अधिकारी नियुक्त न करण्यात आल्याने रुग्णांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. सदर डायलेसिस युनिट दिनांक २१ जुलै २०२५ रोजी सुरू झाले असले, तरी उपचारापूर्वी आवश्यक असलेले प्रथमोपचार व तात्काळ वैद्यकीय निर्णय घेण्यासाठी कोणताही वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

डायलेसिससाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, वैद्यकीय अधिकाऱ्याअभावी अनेक रुग्णांना उपचारासाठी यवतमाळ किंवा वर्धा येथे पाठवावे लागत आहे. प्रवासादरम्यान काही रुग्णांचा मृत्यू झाल्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी मो.वाजीद मजीद कुरेश्शी (वार्डन/ रुग्णसेवक) यांनी वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय पांढरकवडा यांना लेखी निवेदन सादर करून महा-डायलेसिस युनिटमध्ये तात्काळ एक वैद्यकीय अधिकारी (कायमस्वरूपी) नियुक्त करण्याची मागणी केली आहे.

जर तात्काळ कार्यवाही करण्यात आली नाही, तर रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आंदोलन, उपोषण तसेच वरिष्ठ पातळीवर तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. आरोग्य विभागाने या गंभीर प्रश्नाकडे तात्काळ लक्ष देऊन आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

# माजी आमदार केसरी दंगल कुस्तीचे आयोजन



## १६ वर्षांनंतर वणीत महिला व पुरुषांची भव्य दंगल कुस्ती

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - शहरात दरवर्षी फेब्रुवारी ते मार्च या कालावधीत जत्रा मैदानावर श्री रंगनाथ स्वामी यांच्या नावाने तब्बल ३७ दिवसांची यात्रा भरते. या जत्रोत्सवानिमित्त पारंपरिक कुस्त्यांचे आयोजन करण्यात येते. मात्र दंगल कुस्तीचे आयोजन तब्बल १६ वर्षांपूर्वी करण्यात आले होते. त्यानंतर काही कारणास्तव दंगल कुस्ती बंद पडली होती.

यावर्षी मात्र दंगल कुस्ती पुन्हा सुरू करण्यासाठी पैलवान पांडुरंग लांजेवार यांनी पुढाकार घेतला असून, या उपक्रमाला सर्व स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यासंदर्भात शनिवारी (दि. ७ फेब्रुवारी) सायंकाळी ५ वाजता श्री रंगनाथ स्वामी मंदिरात बैठक घेण्यात आली. या बैठकीत यावर्षी दंगल कुस्तीचे आयोजन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. या बैठकीत दंगल कुस्तीची तारीख व ठिकाण निश्चित करण्यात आले नसून, पुढील बैठकीत याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार पुरस्कृत 'माजी आमदार केसरी दंगल कुस्ती' भरविण्यास बैठकीत एकमताने मंजुरी देण्यात आली आहे.

---

# प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा वांजरी येथे दोन दिवसीय क्रीडास्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - महाकाली आदिवासी विकास संस्थाद्वारा संचालित, प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा वांजरी येथे दोन दिवसीय क्रीडास्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाकाली आदिवासी विकास संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती प्रमिलाताई देवरावजी गेडाम या होत्या तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव आशिष गेडाम उपस्थित होते.

प्रमुख पाहूणे म्हणून पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष बोडेवार, वांजरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच विनोद बोडेवार,संस्थेच्या उपाध्यक्ष तुरपाताई पुसनाके,संस्थेच्या संचालिका सौ.रेणुकाताई गेडाम,संस्थेचे सर्व संचालक मंडळ,कु.कनिष्का गेडाम,बोडेवार काका,पोलीस पाटील अशोक कुमरे,झटाळा येथील प्रतिष्ठित कमर खा पठाण,वाघोली येथील माध्यमिक मुख्याध्यापक साखरकर सर,सेवानिवृत्त शिक्षक मोहुर्ले सर गावातील व पोडावरील गणमान्य नागरिक यांच्यासह प्राथमिक, माध्यमिक मुख्याध्यापक राऊत सर,वानखेडे सर,मोगरकर सर सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्ग उपस्थित होते.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# दाखल प्रकरणांवर अंतिम अहवाल सादर करा-विभागीय आयुक्त

## विभागीय लोकशाही दिनात दहा प्रकरणांवर सुनावणी

**अमरावती/का.प्र.**

विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, पुढच्या लोकशाही दिनाच्या अगोदरच शेवटचे निराकरण करुन प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण दहा प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.



विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त संजय जाधव, उपायुक्त संतोष कवडे, उपायुक्त राजू फडके, यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते. यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण दहा प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना केल्या.

विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे एकूण १० प्रकरणांवर लोकशाही दिनात चर्चा करण्यात आली. ही प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत एकही प्रकरण दाखल झाली नाही, अशी माहिती महिला व बालविकास विभागाव्दारे देण्यात आली. यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना सिंघल यांनी यावेळी केल्या.

## ग्रामपंचायतींवर सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्ती करा

### खा.वानखडे यांना संरपंच संघटनेचे निवेदन

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

राज्यातील बहुसंख्य ग्रामपंचायतीचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२६ मध्ये संपत आहे. सदर ग्राम पंचायतवर प्रशासक म्हणून सरकारी कर्मचारी, अधिकारी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात मागणी सरपंच संघटनेने केली आहे. खासदार बळवंत वानखडे यांना सरपंच संघटनेचे वतीने ज्या ग्रामपंचायतींचा पाच वर्षाचा कालावधी संपत आहे अशा ग्रामपंचायतला विद्यमान कार्यरत असलेले सरपंच प्रशासक म्हणून नेमावे किंवा विद्यमान बॉडीचा कार्यकाळ पुढील निवडणूक होईपर्यंत वाढवावी याकरिता जिल्हाध्यक्ष गुलाम नबी इंदलेकर, सरपंच संघटनेचे विदर्भ संपर्कप्रमुख मोहन चव्हाण,सरपंच संघटनेच्या महिला आघाडी जिल्हाप्रमुख रक्षणा सरदार यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.यावेळी चांदुर बाजार तालुक्यातील सरपंच श्रद्धा बोराळे, सरिता पाथरे, मनीषा इंगळे तथा संघटनेचे सर्व पदाधिकारी तथा ग्रामपंचायतचे सरपंच,उपसरपंच, सदस्य उपस्थित होते.

## विदर्भस्तरीय कराओके गीत गायन स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

संक्रांतीनिमित्त दरवर्षी प्रमाणे धनश्री सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने कराओके गीत गायन स्पर्धा जिजाऊ प्रतिष्ठान स्मृतीशेष सचिन चौधरी सभागृह मराठा नगरी अमरावती येथे यशस्वी संपन्न झाली. या स्पर्धेत अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.स्पर्धकांना हजारो रुपयांची रोख पारितोषिक वितरण करण्यात आले.

स्पर्धेत वय गट ६ ते १५ गटात प्रथम क्रमांक ओमिका ढगे, द्वितीय गार्गी देशमुख तर तृतीय श्रद्धा जुमडे यांनी पटकाविला वय गट १६ ते पुढील मध्ये प्रथम क्रमांक देव कुमार मुधोळकर मोझरी, द्वितीय क्रमांक अनुक्रमे सौरभ पाचडे , गणेश डाखोरे , तृतीय क्रमांक कोमल ढोके यांना देण्यात आला. दिवसभर चालेल्या या स्पर्धेत हिंदी,मराठी सुमधूर गीतांनी कलाकारांनी आपली कला सादर केली. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून डॉ.मनीषा कोडापे अध्यक्ष पदी अश्विन चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.प्रफुल्ल गुडधे प्रा.डॉ सुवर्णा तायडे दिलीप हटवार, आशा शेट्टी, ॲड.आशिष हाडके यांची उपस्थिती होती तर परीक्षक म्हणून गजेंद्र पाखरे, सरिता हनवंते यांनी परीक्षण केले. या स्पर्धेत शेकडो स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. संचालन अबोली वानखडे तर प्रास्ताविक धनश्री प्रतिष्ठानच्या सचिव आरती बोंदरकर यांनी व आभार प्रदर्शन धनश्री प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष मंजू संजय ठाकरे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सुचित्रा लहाने, कुंदा पुसदकर, पल्लवी बावस्कर, शारदा विधडे, ज्योती हजारे,उज्वला जुमळे, अभिजित शेट्टी, पूजा रडके यांनी परिश्रम घेतले.



## शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन युवकांनी रोजगार देणारे व्हावे-जिल्हाधिकारी

### पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार व स्नेहमेळावा;४२ उमेदवारांची प्राथमिक निवड

**अमरावती/का.प्र.**

सध्याच्या स्पर्धात्मक युगात युवकांनी केवळ नोकरीच्या शोधात राहू नये. आपल्यामधील कौशल्यांनी युवकांनी रोजगार देणारे व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा व स्नेहमेळावा पार पडला. या मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी येरेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, उमेदवारांनी केवळ पदवीवर अवलंबून राहू नये. युवकांनी आता कौशल्यावर भर देणे आवश्यक आहे. सुरुवातीला पगारापेक्षा अनुभवाचा विचार करावा. आपल्यातील कौशल्य वाढवून युवकांनी स्वत:चा रोजगार उभारावा. तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेऊन उद्योगाचे स्वरूप वाढावे, असे आवाहन केले.आजच्या रोजगार मेळाव्यात लेक्साकेम ओर्गानिक, जाधव गियर्स, अर्थ वे टेक्नॉलॉजी यांसारख्या ६ नामांकित कंपन्यांचा सहभाग होता. यात ६३ रिक्त पदांसाठी १२६ उमेदवारांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्ष मुलाखतीनंतर ४२ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. यातील ८ उमेदवारांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते तात्काळ नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. स्नेहमेळाव्यात १०३ उमेदवारांनी सहभाग नोंदविला.



जागतिक कौशल्य स्पर्धेच्या राज्यस्तरीय फेरीमध्ये यश मिळवणारे आदर्श लिहारे, निशा बंड, शशांक लोखंडे आणि विराज पुसदकर यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात कंपन्यांमध्ये रुजू झालेल्या उमेदवारांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त द. ल. ठाकरे, सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, रेडियंट हॉस्पिटलच्या संचालक डॉ. माधुरी अग्रवाल, ईसीईचे संचालक समीर काळे, गोल्डन फायबरचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एन. प्रसाद आदी उपस्थित होते. ठाकरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रांजली बारस्कर यांनी प्रास्ताविक प्राजक्ता राऊत यांनी संचालन करून आभार मानले.

## कर्ज निवारण योजनेची माहिती संकलित करण्याचे काम सुरू

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील सेवा सहकारी संस्थांचे थकीत कर्जदार शेतकरी सभासदांनी अद्यापही आधार कार्ड, फार्मर आयडी आणि इतर आवश्यक असलेली माहिती संबंधित सेवा सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँक शाखेला उपलब्ध करून दिलेली नसल्यास या सर्व शेतकरी सभासदांनी तातडीने उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.शासनाने शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने प्रस्तावित कर्ज निवारण योजनेसंदर्भात माहिती मागविली आहे. याअनुषंगाने थकीत कर्जदार सभासदांची माहिती संकलित करुन विहीत नमुना प्रपत्र अ व ब मध्ये तयार करण्याचे काम संबंधित प्राथमिक कृषी पतपुरवठा सेवा सहकारी संस्था, तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा स्तरावर सुरु आहे.त्यानुसार सेवा सहकारी संस्थांचे थकीत सभासदांचे कर्ज खाते आणि इतर अनुषांगिक माहिती संकलित करण्याचे काम संस्था पातळीवर सुरु आहे. सेवा सहकारी संस्थांचे थकीत कर्ज असलेल्या सभासदांनी संबंधित सहकारी संस्थेच्या सचिवाशी संपर्क करुन त्यांचे आधार कार्ड, फार्मर आयडी आणि इतर आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, त्यामुळे सदर माहितीचे संकलन संस्था पातळीवर करता आले नाही.

## अपार आयडीसाठी शाळांना येत आहे अडचणी

### जिल्ह्यात ८५.९० टक्क्यांच्या वर नोंदणी

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत विद्यार्थ्यांचे 'अपार' (ऑटोमेटेड परमनंट अकॅडेमिक अकाऊंट रजिस्ट्री) आयडीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. विद्यार्थ्यांसाठी 'अपार' ओळखपत्र तयार करण्याची अंतिम मुदत ३१ जानेवारीपर्यंत निश्चित करण्यात आली होती. जिल्ह्यात ८५.९० टक्क्यांच्या वर नोंदणी पूर्ण झाली आहे. मात्र अद्याप ६४ हजारांहून अधिक विद्यार्थी अपार आयडीपासून वंचित आहेत.

शैक्षणिक नोंदी सुरक्षित ठेवण्यासाठी आणि भविष्यातील प्रवेश प्रक्रियेसाठी अपार आयडी अनिवार्य ठरणार आहे. विद्यार्थ्यांना 'अपार' ओळखपत्र तयार करण्यासाठी केंद्र शासनाने ३१ जानेवारीपर्यंत अंतिम मुदत दिली आहे. या मुदतीत विद्यार्थ्यांच्या आधार कार्डवरील नाव व शैक्षणिक नोंदीतील नाव ओळखपत्र एकसमान करून निर्मिती पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यात अपार आयडीचे काम ८५.९० टक्के झाले आहे. यामध्ये ४ लाख ८३ हजार ८२७ पैकी ४ लाख १५ हजार ५८८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. शिक्षण विभागाने केंद्र प्रमुख, मुख्याध्यापकांकडून अधिक गतीने काम करून घेतले. परंतु पालकांच्या संमतीमुळे काही ठिकाणी अडचणी येत आहेत.

इयत्ता १० वी १२ वी बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना व टीईटी परीक्षेसाठी शिक्षकांना अपार आयडी बंधनकारक केला आहे. शाळा स्तरावर केवळ एकदाच दुरुस्तीच्या संधीमुळे अपार आयडीसाठी शाळांना अडचणी येत आहेत. यू-डायस पोर्टलवर विद्यार्थ्यांची माहिती भरल्यावर अपार आयडी तयार होतो. परंतु आधार कार्डवरील विद्यार्थ्याच्या नावातील स्पेलिंग दुरुस्ती होत नसल्याने, जन्मतारीख, शाळेच्या नोंदीतील माहिती जुळत नसल्याने अनेक ठिकाणी अडथळे येत आहेत. काही विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत नसल्याने अपार आयडीला शाळांना अडचणी येत आहेत.

## जिल्ह्यात महारेशीम अभियानाचा शुभारंभ


### ८०० एकरवर रेशीम लागवडीचे उद्दिष्ट

**अमरावती/का.प्र.**

जिल्हाधिकारी आशिष येरेकार यांच्या हस्ते 'महारेशीम अभियान २०२६'चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी रेशीम रथाला हिरवी झेंडी दाखविली. तसेच रेशीम उद्योगाची माहिती जाणून घेतली. कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, सहसंचालक गणेश घोरपडे, जिल्हा कृषी अधीक्षक राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

सन २०२६-२७ या वर्षात जिल्ह्यात एकूण ८०० एकर क्षेत्रावर रेशीम शेती लागवडीचे उद्दीष्ट आहे. यात कृषि विभागातर्फे ३०० एकर, रेशीमतर्फे विभाग: २५० एकर, आणि जिल्हा परिषदेतर्फे २५० एकर रेशीम लागवड करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी जून २०२६ मध्ये तुती लागवडीसाठी ४ फेब्रुवारी ते ५ मार्चपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी 'आपले सरकार' पोर्टलवरून ऑनलाईन पद्धतीने करून त्याची प्रत जिल्हा रेशीम कार्यालयात जमा करावी लागणार आहे. यासाठी प्रति एकर ५०० रुपये नोंदणी शुल्क आकारले जाणार आहे.

शेतकरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) अंतर्गत जॉब कार्डधारक असावा आणि त्याच्याकडे सिंचनाची सोय असावी. एका गावातून किमान पाच लाभार्थी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने सातबारा, ८-अ उतारा, चतुःसिमा नकाशा, आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.मग्रारोहयो अंतर्गत या योजनेतून शेतकऱ्यांना तीन वर्षांसाठी मजुरी आणि साहित्यासाठी एकूण ४ लाख ३२ हजार २४० रुपये दिले जाणार आहे. सिल्क समग्र-२ योजनेतून जे शेतकरी अल्पभूधारक नाहीत, त्यांच्यासाठी ही योजना असून यात प्रवर्गांनुसार अनुदान दिले जाणार आहे. यात १ एकरसाठी ३ लाख ७५ हजार रुपये इमावसाठी ते ४ लाख ५० हजार रुपये अनुसूचित जाती, जमातीसाठी दिले जाणार आहे. २ एकरसाठी ५ लाख ६२ हजार ५०० रुपये इमावसाठी ते ६ लाख ७५ हजार रुपये अनुसूचित जाती, जमातीसाठी दिले जाणार अहो.नोंदणी, तसेच अधिक माहितीसाठी अमरावती, तिवसा, अचलपूर, अंजनगाव सुर्जीसाठी डी. एच. नागोलकर, संपर्क ९५२७९३४५७३, मोर्शी, वरूड, चांदूरबाजार, धामणगाव रेल्वेसाठी एस. बी. भोयर, संपर्क ९३७२७९१६२६, तर नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, भातकुली, चिखलदरा, धारणीसाठी एस. एम. देठे ८८३०५९३४५९ या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## संक्षिप्त

### विद्यापीठात वाङ्.वनिता संस्कृत साहित्य संमेलन

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संस्कृत विभाग व महाराष्ट्र राज्य संस्कृत साहित्य अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्या सभागृहामध्ये वाङ्.वनिता संस्कृत साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.संमेलनाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित होत आहे. संमेलनामध्ये कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेकचे माजी अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथील संस्कृत विभागाच्या डॉ. रुपाली कविश्वर, भारतीय धर्म तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेकचे अधिष्ठाता डॉ. कलापिनी अगस्ती, विश्व संस्कृत प्रतिष्ठान, वाराणसी च्या विदर्भ प्रदेश समिती, अमरावतीचे अध्यक्ष डॉ. कीर्ती राम पिंजरकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### संत गजानन महाराज प्रकटदिन साजरा



**लेहेगाव-**दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नजीकच्या सावरखेड पिंगळाई येथे श्री संत गजानन महाराज यांचा प्रगट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.दोन दिवशीय चाललेल्या या कार्यक्रमात ग्रामसफाई, रामधुन आणि प्रार्थना, हरिपाठ संध्याकाळी श्रीची पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावातील भजनी मंडळ, महिला भजनी मंडळ,दत्तकृपा भजनी मंडळ यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. किर्तनकार हभप माऊली महाराज जाहूरकर (आळंदीकर) यांच्या सुमधुर बाल वाणीतून श्रोत्यांची मने हेलावून टाकणारा कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन संत गजानन महाराज उत्सव समितीने केले होते. सदर कार्यक्रमाचा हजारो भाविक भक्तांनी लाभ घेतला.

### 'दि डेफ ॲन्ड डम्ब रिलिफ असोसिएशन'च्या कार्यकारिणीची बिनविरोध



**अमरावती-**स्थानीक दि डेफ ॲन्ड डम्ब रिलिफ असोसिएशन, साई नगर या संस्थेचे वर्ष २०२६-२०३१ या कार्यकारीणी निवडणूक कार्यक्रम घोषित आला होता. ९ कार्यकारीणी सदस्यांची निवड बिन विरोध अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यासाठी संस्थेचे माजी सचिव डॉ. सत्यनारायण कासट यांनी भगीरथ प्रयत्न केले. संस्थेच्या हितासाठी गेल्या ५० वर्षा पासुन स्व. डॉ. गणेशजी बुब यांच्या खांद्याला खांदा लावून विद्यालयासाठी कासट परिवाराची इमारत दान स्वरुपात संस्थेला देवून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा केला. केवळ८ विद्यार्थ्यांची शिक्षणाची सुविधा सुरु झाली.त्याचे वटवृक्षात रुपांतर करून त्यांच्या कारकिरदीत हि संख्या २०० च्या वर निवासी विद्यार्थी बालवर्ग ते १२ वी पर्यंत नेवुन ठेवण्यात ते यशस्वी झाले. ह्या भल्या मोठ्या खर्चाचा बोझा त्यांनी समर्थ पणे उचलुन व दानदात्यांची मदत घेवुन संस्थेला नावारुपास आणले. सतत तन-मन-धन अपर्ण करुन व श्री बुलिदान राठी मुकबधीर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकरीता निवासी व्यवस्थेपासुन ते विवाह व पुनर्वसना पर्यंत विद्यालयाला भरघोस मदत केली. त्याच बरोबर वर्ष २०२६-२०३१ या कार्यकारिणी करीता संस्थेच्या हिता साठी त्यांनी केलेल्या ह्या प्रयत्नासाठी त्यांचे संस्थेच्या सदस्य व प्रत्येक घटका तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

### धिरज घायवट यांची निवड

**आसेगाव पूर्णा-**पावनभूमी इंद्रायणी काठी संत श्री ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पावन भूमी आळंदी, पुणे येथे तांत्रिक कामगार युनियन चे दुसरे द्विवार्षिक महाअधिवेशन झाले.या महाधिवेशनात तांत्रिक कामगार युनियन चे युवा सांसद म्हणून सर्वानुमते आसेगाव वीज वितरण केंद्र चे प्रधान तंत्रज्ञ श्री. धिरज घायवट यांची तांत्रिक कामगार युनियन मध्ये युवा सांसद म्हणून निवड करण्यात आली.महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मध्ये २०१० ला कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणून रुजू झालेले श्री. धिरज घायवट आता आसेगाव वीज वितरण केंद्र येथे प्रधान तंत्रज्ञ या पदावर कार्यरत आहे. महावितरण मध्ये ग्राहक सेवे सोबतच शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, मनोरंजन यात सुद्धा प्रविण्य मिळविलेले आहे. तांत्रिक कामगार युनियन मध्ये तांत्रिक कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या संघटनामध्ये सर्कल सचिव या पदाचा, तसेच तांत्रिक अप्रेंटीस, कंत्राटी कामगार असोसिएशन मध्ये राज्य उपाध्यक्ष पदाचा कार्यभार ते सांभाळत आहे.



### पी.आर. पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालयात शिबीर

**अमरावती-**पी.आर. पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालय, अमरावती यांच्या वतीने विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . सकाळी १०.०० ते १.०० या वेळेत या विशेष शिबिरात मुळव्याध ,फिशर ,भगंदर,पोटाचे आजार , मुत्रमार्गाचे विकार ,पायलोनाईडल सायनस,हर्निया,हायड्रोसिल,इतर शरीरावर कुठलीही चरबीची,घामाची गाठ, स्तनाच्या गाठी, कान शिवणे, (फाटलेले कान शिवणे), कुरुप काढणे, जखमेवर टाके मारणे, त्वचा विकार या व्याधी वर उपचार करून मार्गदर्शन केले. शिबिराला ९८ पेशंटनी सहभाग घेतला.शिबिराचे उद्घाटक म्हणून आयुर्वेद हॉस्पिटल चे प्राचार्य डॉ रणजित देशमुख हे उपस्थित होते. शिबिराला लाभलेले अमरावती येथील तज्ञ चिकित्सक डॉ. नितेश ना. सानप ,डॉ. अश्विनी अं खार्डे उपस्थित राहून रुग्णांची तपासणी, उपचार आणि आजाराविषयी मार्गदर्शन केले .तसेच शिबीर चे सूत्र संचालन आणि आभार डॉ. निकिता लांडे यांनी केले.

# एल्गार:गझलेश्वर निष्ठांची मांदियाळी!

सुरेश भट स्मृती प्रतिष्ठान आणि वसंतराव पालेकर स्मृती प्रतिष्ठान अमरावती, आयोजित 'एल्गार' हे ३ रे अखिल भारतीय मराठी गझल संमेलन ७ आणि ८ फेब्रुवारीला संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे आयोजित करण्यात आले होते. गझलप्रेमी आणि गझलकार या दोघांसाठी ही एक पर्वणी होती. रसिक आणि विचारी मनांचा हा मेळावा होता. आयुष्यातल्या काही गोष्टी आपल्याला समृद्ध करत असतात, आनंद तर देतातच शिवाय जबाबदारीची जाणीवही करून देतात. असेच काहीसे वर्णन या संमेलनाचे करता येईल.

तब्बल १४ मुशायरे, संवादिका, गझल गायन, सोबतीचा करार अशी ही एकंदरीत मेजवानी ! आणि त्यातही मराठमोळ्या भोजनाचा आस्वादक थाट, यामुळे हे संमेलन ऐतिहासिक न ठरले तर नवलच.आमचा मित्र आणि गझलेवर नितांत प्रेम करणारा, प्रसंगी कुठलीही तमा न बाळगणारा अवलिया नाना लोडम हे एक अजबच रसायन आहे. गझलेसाठी हा माणूस इतर कुठलंही लोड घेऊ इच्छित नाही. सहजता काय असते, हे या निमित्ताने त्यांच्या देहबोलीतून अनुभवता आले. त्यांच्या सोबतीला अनंत नांदुरकर, नितीन भट, नितीन देशमुख, रेणुका पुरोहित ही मंडळी भक्कमपणे साथ देणारी !

या सोहळ्यातील नाविन्यपूर्ण काय असेल तर आजवर गझल प्रांतात आपला ठसा ज्या गझलकारांनी उमटवला पण जे हयात नाहीत अशा गझलकारांची मुशायऱ्यांना दिलेली नावे ! या माध्यमातून दिवंगतांचे स्मरणही करण्यात आले.। सोहळ्याला गझलकारांचा महाराष्ट्रातून उस्फुर्त प्रतिसाद लाभला. एक झपाटलेपण अनुभवता आले. महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातून जवळपास पाचशे गझलांमधून पावणे दोनशे गझलकारांच्या गझलांची निवड करणे म्हणजे काही थट्टा नव्हे. बहुतांश गझलकारांनी आपल्या गझला




**अमरावती शहराच्या सांस्कृतिक श्रीमंतीत भर घालणारा सोहळा**

आपापल्या कुवतीनुसार सादर केल्यात. सातहून अधिक गझल संग्रहाचे यथोचित प्रकाशनही करण्यात आले. हे सर्व संमेलनाध्यक्ष कवी वैभव जोशी यांच्या साक्षीने पार पडले.

ज्यांना नवोदित.. नवोदित म्हणतो ते गझलकार बाकी भन्नाटच ! काय लिहितात ही पोरं... अफलातूनच!भल्याभल्यांनी थक्क व्हावे या सोहळ्याच्या निमित्ताने स्वागताध्यक्ष नाना लोडम यांनी सर्व गझलकारांच्या साक्षीने अखिल भारतीय मराठी गझल परिषदेची घोषणा केली. लोगोचे प्रकाशनही करण्यात आले. मराठी गझलेवरील विश्वास आणि निष्ठेचे हे एक प्रतिक असल्याची भावना याद्वारे जनमनात रुजणार आहे.या दोन दिवसात काही गझलकारांच्या भेटी झाल्यात. काही भेटी भेट घ्यायच्या राहून गेल्यात. ही एक खंत आहेच. इच्छा असूनही संबंधितांच्या भेटी घेण्यामधे मी कमी पडलो, हे नक्की ! असो.

ऐनवेळी घेण्यात आलेला प्रश्नोत्तरी परिसंवाद, ज्याने अनेकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. आयत्या वेळी अनंत नांदुरकरांनी गझले संदर्भात जे विवेचन केले, त्याला तोड नाही. कुठलीही तयारी नसतांना उस्फुर्तपणे जे मुद्दे अनंताने मांडलेत ते खरेच चिंतनीय होते. त्यांना पुर्व कल्पना दिली असती तर, संवादातील संवेदनशीलता रसिकांना टिपता आली असती.मराठीसमवेतच उर्दू शायरीचा त्यांचा अभ्यास वाखाणण्याजोगा आहे.

कवी मित्र शिवाजी जवरेंनी तर कमालच केली.गझलेबाबत संवादात्मक मांडणीमुळे आपली गझल कशी असायला हवी, आशय कसा मांडायला हवा, या बाबतीत केलेले मंथन ,लिहित्या हाताला विचार करायला प्रवृत्त करणारे होते.संगीतकार आशीष मुजुमदार यांचे गझलेवरील टिपीकल भाष्यही सुखावणारे होते.पुरस्कार, सत्कार, फोटो सेशन हे ही ओघाने आलेच! एकंदरीत या दोन दिवसांनी जी उर्जा मिळाली..ती लाखमोलाची !

**अरुण सांगोळे**,
अमरावती
मो.९४२३४२७८३१

# डेज संस्कृतीमुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा !

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरे करण्याचे. त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोझ डे पासून सुरू झालेला डेजचा हा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, टेडी डे, प्रॉमिस डे , चॉकलेट डे, टेडी डे, हग डे, किस डे असे विविध प्रकाराचे डे येतात. डेजचा हा माहोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्या आवडत्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाच्या फुलाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण आलेले असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेजच्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेन्टाईन डेजचाच मुहूर्त का लागतो? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील स्मितहास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेन्टाईन डेजचाच मुहूर्त असावा असे काही नाही.

मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत.




माझ्यामते आपल्या आवडत्या व्यक्तीवर प्रेम करण्यासाठी, आपल्या आवड त्या व्यक्तीला भेटवस्तू वस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्य चकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डेची गरज नसते. बरे हे डेज पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात डेजचे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, ब्रदर डे, सिस्टर डे, डॉक्टर्स डे, वकील डे, इंजिनियर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अती झाले नि हसू आले अशी गत या डेजची झाली आहे. सोशल मिडीयावर ॲक्टिव्ह राहणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांच्या पोस्टवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडत असतो. वर्षभर कधी आई वडिलांप्रती प्रेम, आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप एक्टिव असतात. जन्मदात्या आई वडिलांसाठी, त्यांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डेची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमुल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेजची आवश्यकता आहे का ? असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

**श्याम ठाणेदार**

# प्रेमाचा खरा अर्थ शोधताना...

दरवर्षी फेब्रुवारी उजाडला की मनाच्या कोपऱ्यात एक जुना, पण तितकाच जिव्हाळ्याचा प्रश्न पुन्हा डोकं वर काढतो, 'प्रेम म्हणजे नेमकं काय?' फक्त गुलाबांची देवाणघेवाण? चॉकलेट्सची गोडी? की महागड्या भेटवस्तूंचा झगमगाट? की न सांगताही समजून घेणं, अडचणीच्या क्षणी दिलासा देणारा हात, मनापासून दिलेला वेळ आणि निखळ आपुलकी? प्रेमाची व्याख्या प्रत्येक पिढीने आपल्या अनुभवांच्या चष्म्यातून वेगवेगळी केली आहे. पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावामुळे भारतात व्हॅलेंटाईन डे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मात्र, हा दिवस केवळ प्रेमी युगुलांपुरता मर्यादित ठेवणं म्हणजे प्रेमाच्या विशाल संकल्पनेलाच संकुचित करणं ठरेल. प्रेम म्हणजे दिखावा नव्हे, तर निस्वार्थ भावना, परस्पर आदर, समजूतदारपणा आणि मनापासून जपलेली आपुलकी होय.

व्हॅलेंटाईन डे ही केवळ आधुनिक काळातील संकल्पना नाही. संत व्हॅलेंटाईन यांच्या त्यागातून या दिवसाचा जन्म झाला. प्रेम, करुणा आणि बलिदान हीच या दिवसाची खरी ओळख.मात्र काळाच्या ओघात या उत्सवाचं स्वरूप बदलत गेलं. आज बाजारपेठेने प्रेमालाच किंमत लावण्याचा प्रयत्न केला आहे. परिणामी, प्रेमाचा खरा अर्थ अनेकदा जाहिरातींच्या झगमगाटात हरवलेला दिसतो.खरं तर व्हॅलेंटाईन डे हा फक्त प्रियकर-प्रेयसी किंवा नवरा-



बायकोसाठीचा दिवस नाही. तो कुटुंबासाठी आहे, मित्रांसाठी आहे, सहकाऱ्यांसाठी आहे आणि समाजातील दुर्लक्षित, गरजू घटकांसाठीही आहे.

आई-वडील, आजी-आजोबा, भाऊ-बहीण यांच्यासोबत मनमोकळा वेळ घालवणं, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणं..हेच तर प्रेमाचं खरं आणि शाश्वत रूप आहे.भारतात प्रेमाची संकल्पना हळूहळू बदलते आहे. जुनी पिढी प्रेमाकडे जबाबदारी, त्याग आणि कुटुंबाच्या चौकटीत पाहते, तर नवी पिढी व्यक्तिस्वातंत्र्य, परस्पर सहमती आणि समर्पणाला अधिक महत्त्व देते.

शहरांमध्ये प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह आणि लिव्ह-इन रिलेशनशिप स्वीकारल्या जात असल्या, तरी ग्रामीण भागात अजूनही परंपरांची घट्ट पकड आहे. संकुचित विचारसरणीमुळे अनेक प्रेमकथा अर्ध्यावरच थांबतात..हे वास्तव बदलण्याची गरज आज अधिक तीव्रतेने जाणवते.

व्हॅलेंटाईन डे सामाजिक जाणिवेतूनही साजरा करता येतो. अनाथालयातील मुलांसोबत हसत-खेळत वेळ घालवणं, वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या आठवणी ऐकणं, रक्तदान करणं किंवा गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावणं..हे सगळं प्रेमच आहे. प्रेम जर एका व्यक्तीपुरतं सीमित न राहता समाजापर्यंत पोहोचलं, तरच त्याला खरा अर्थ प्राप्त होतो.

काही जण व्हॅलेंटाईन डे ला विरोध करतात. हा दिवस पाश्चात्त्य संस्कृतीचा असल्याचा आक्षेप घेतला जातो. पण प्रेम ही भावना पाश्चात्त्य नाही..ती मुळातच भारतीय आहे. राधा-कृष्ण, सावित्री-सत्यवान, शकुंतला-दुष्यंत यांसारख्या अमर प्रेमकथा याची साक्ष देतात. प्रेम भारतीय संस्कृतीच्या मुळाशी खोलवर रुजलेलं आहे.

आज प्रेम महागड्या भेटवस्तूंमध्ये अडकलेले दिसतं. पण खरंच, फुलं आणि चॉकलेट्सशिवाय प्रेम व्यक्त होऊ शकत नाही का? एक प्रेमळ शब्द, थोडा वेळ, मनापासून ऐकून घेणं किंवा एखादी जुनी आठवण जागवणं..इतकंच पुरेसं असतं.खर्च नाही, तर भावना महत्त्वाची असते.व्हॅलेंटाईन डे हा केवळ १४ फेब्रुवारीपुरता मर्यादित नसावा. प्रेम हा एका दिवसाचा सोहळा नाही, तर रोज जगायची जीवनशैली आहे. आपल्या माणसांसाठी वेळ देणं, त्यांना समजून घेणं आणि अडचणीच्या वेळी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहणे..हीच प्रेमाची खरी ओळख आहे.

चला तर...या व्हॅलेंटाईन डेला फक्त गिफ्ट्सवर भर न देता समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी काहीतरी करूया. पर्यावरणासाठी एक सकारात्मक पाऊल उचलूया आणि कुटुंबासोबत आनंदाचे क्षण जपूया. प्रेमाचा अर्थ केवळ 'स्वतः' पुरता न ठेवता तो संपूर्ण समाजापर्यंत पोहोचवू या..आणि या दिवसाला खऱ्या अर्थाने प्रेममय बनवूया.

**विलास गोहणे**,
नाशिक

# समर्थ रामदास स्वामींचे अमराठी वाङ्मय!

आज दासनवमी म्हणजे समर्थ रामदास स्वामींच्या पुण्यस्मरणाचा दिवस त्यानिमित्ताने त्यांना शब्दप्रणाम.समर्थ रामदासस्वामींचा दासबोध नावाचा मराठी ग्रंथ सर्वश्रूत असून रामदासी संप्रदायामधील तो पंचम वेद आहे.समर्थांचे इतरही मराठी वाङ्मय बहुतेकांना माहीत आहे.पण त्यांचे मराठी भाषेव्यतिरिक्त अमराठी वाङ्मयही आहे.हे बहुतेकांना माहीत नाही.

डोंबिवलीला मी व्याख्यानासाठी गेलो असता संघ स्वयंसेवक दिपक कुलकर्णी यांनी मनीषा बाठे यांचे समर्थ रामदास कृत अमराठी पदावल्यांचे पुस्तक भेट दिले.ते वाचल्यावर लक्षात आले की समर्थांच्या अमराठी पदावल्या देखिल खूपच प्रेरक ,सकारात्मक ,परिवर्तक आणि राष्ट्रहीतैशी आहेत.राष्ट्रप्रेरक आणि अध्यात्म विज्ञान असलेले अमराठी वाङ्मय बहुतेकांना माहीत नाही.त्याबाबत थोडी माहिती घेऊ.

समर्थांनी रचलेली पदे विविध भाषेत उपलब्ध आहेत.ढोबळमानाने समर्थांनी रचिलेले वाङ्मय दखनी भाषा प्रभावित आहे.ज्या भाषेवर मराठीसह गुजराथी, पंजाबी, कानडी, तेलगू, राजस्थानी, संस्कृत, फारशी, अरबी आणि उर्दू अशा एकूण अठरा बोलीभाषांचा प्रभाव असलेली भाषा म्हणजे दखनी भाषा होय.काहींच्या मते दखनीभाषा म्हणजे व्रज, अवधी ,बुंदेली, भोजपुरी, मैथिली, मालवी, पहाडी, मारवाडी, गौडी, हैद्राबादी अशा बोलीभाषांच्या शब्दांचा यादृच्छिक वापर असलेली भाषा म्हणजे दखनी भाषा.दक्खन प्रांताची भाषा म्हणूनही दखनी भाषा ज्यात फारसी, अरबी, उर्दू शब्दांचाही अग्रक्रमाने प्रभाव आहे.ही भाषा कच्छ ते कर्नाटक या भूप्रदेशात मुख्यतः वापरली गेली.

समर्थांचे अमराठी वाङ्मय भारतातील बहुतेक सर्व भाषांचे संमिश्रण असलेल्या भाषाशैलीत उपलब्ध आहे.

समर्थांचा कालावधी इ.स.१६०८ ते इ.स.१६८१ असा एकूण ७४ वर्षांचा आहे.त्यातील बालपण आणि तपश्चर्या कालावधी इ.स.१९३१ म्हणजे वयाच्या २४ वर्षापर्यंत आहे.त्यानंतर देशातील सुलतानी संकटाने समर्थ अस्वस्थ झाले आणि त्यांनी मराठी युवकांमध्ये जागोजागी मारुती मंदिरे ,आखाडे याद्वारे बलोपासनेने स्फुलिंग जागरणाचा प्रयत्न सुरु केलेलाच होता.तो प्रयत्न संपूर्ण हिंदुस्थानात करावा म्हणून ते इ.स.१६३२ साली पर्यटनाला निघाले.हा महाराष्ट्राबाहेरील त्यांचा प्रवास इ.स.१६३२ ते इ.स. १६४४ पर्यंत होता.इ.स.१६४५ ला ते पुन्हा महाराष्ट्रात आले.म्हणजे त्यांनी वयाची वय वर्षे २५ ते ३८ अशी बारा वर्षे देशाटन केले.त्या त्या प्रदेशात तरुणाई एकत्र करुन समर्थांनी उर्जाजागरण केले.त्यांनी अभंग, अष्टके ,श्लोक यातून राष्ट्रजागृती आणि आखाडे स्थापून बलोपासना शिकविली.या माध्यमातून देव, देश आणि धर्मजागरण केले.

पर्यटन कालावधीत समर्थ अयोध्या, काशी, पंजाबात आनंदपूर ते पार अफगाणीस्थान पर्यंत गेले.आनंदपुरात ते सिख्ख धर्मगुरु हरगोविंदजी यांनाही भेटल्याचे उल्लेख आहेत.तेथून ते दक्षिण भारतात गोकर्ण क्षेत्र, श्रवणबेळगोल, म्हैसूर, श्रीरंगपट्टनम्, बेंगळूरू, मद्रास, तंजावर, हैद्राबाद ते थेट श्रीलंकेपर्यंत विविध ठिकाणी गेलेत.त्या काळातील उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बंगाल, गुजराथ, आंध्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, महाराष्ट्र ,पंजाब अशा विविध राज्यात जाऊन एकूण ४७ मठपती आणि त्यांच्या अखत्यारीत असलेले ११०० मठांची स्थापना केली .त्या मठांची यादी उपलब्ध आहे.त्यातील महाराष्ट्राबाहेरील १८ आणि महाराष्ट्रातील ९२ असे एकूण ११० मठ आजही अस्तित्वात आहेत.



देशभर पर्यटन करुन त्या त्या प्रदेशातील बोलीभाषा वापरुन सर्वांना समजेल अशा भाषेतून श्रीरामनाम महात्म्य, भवसागर पार करण्यासाठीची तत्वे, आदर्श आचारविचार ,राष्ट्राप्रतिची कर्तव्ये आपल्या वाडमयातून समर्थांनी मांडली.समर्थांच्या अमराठी वाङ्मयाच्या काही पदावल्यातून आपल्याला हे लक्षात येईल.संपूर्ण पदावली घेणे शक्य नसले तरी त्यातील

## दासनवमी विशेष

काही पदभाग पाहिल्यावर त्यातील अध्यात्म विज्ञान आपल्या लक्षात येईल.

**रामदास कहे एक रामबिन।**
**कोन पार उतारे।।**
**ऐसी जानी के सुचित रही ।**
**रोसन करी ये दुनिया रे ।।**

यात समर्थ सांगतात हा तुझा भवसागर एका श्रीराम भगवंताशिवाय कोणीही पार करणार नाही.ही बाब चित्तात पक्की धारण कर आणि ते लक्षात ठेवून तुझे हे विश्व दैदीप्यमान कर.अजून एक श्लोक पाहू .

**मोहन तन मन ले गयो री।**
**भली न सूचे बुरी न सुचे। मै तो भया बाउरो।**
**अंतरज्यामी अंतर ज्याने।**
**रामदास देखत मोहन री।।**

या मोहनाने तनमन हरविले.चांगलेही आणि वाईटही सुचत नाही.तो अंतर्यामी माझे अंतरंग जाणतो म्हणूनच हा रामदास त्या मोहनकृष्णाला पाहू शकतो.मारवाडी, गुजराथी मिश्रित असलेली ही पदावली आहे.

उर्दू प्रभाव असलेले हे अजुन एक पद.

***सबों छोड देना बुरा कुफराना ।***
***कुकर्मो नहीं फायदा सो सज्माना ।।***
***आछया पंद है रे , धरो दिल्ल मोही ।***
***कहे रामदासो नहीं छूट भाई ।।***

आपण जे कुकर्म करतो ते सोडून द्या.या कर्मांनी कोणाचाच फायदा नाही.रामदास म्हणतात आता तरी चांगला उपदेश लक्षात घ्या.हे भावा हे असत्य नाही.आता हे एक पद पहा.

चतुरा राम ही साच्या, राम हि साच्या केवळ राम।

जुठी काया जुठी माया, झुठा मीठा काम।।

चतुर आणि खरा फक्त श्रीरामच आहे.काया, माया आणि कर्म सारे खोटे आहे.अवधी आणि व्रज मिश्रित बोलीभाषा या पदात आहे.
गौडी बोलीभाषेचा प्रभाव असणारा हा एक अनुप्रास पहा .

**सार सार सार सार**
**राम यक संसार।**
**बार बार बार बार सुख**
**देत सो उदार ।**
**दार दार दार दार**
**उद्धार मुनी का उद्धार ।**
**हार हार हार हार दास**
**दुख दोष हार ।**
**धीर धीर धीर धीर**
**राम रंग गंभीर धीर ।**
**बीर बीर बीर बीर**
**जो जगत्रयी कबीर ।**
**धीर धीर धीर धीर**
**रामदास होय धीर ।**

या अशाश्वत संसारात केवळ राम हेच सार म्हणजे शाश्वत आहेत.नेहमी सुख देणारे, उद्धाराचे दार असणारे, सर्व दोष हरण करणारे, धीरगंभीर असणारे, विरत्व असणारे ते श्रीराम रामदासाला धीर देत आहेत.समर्थांच्या अमराठी पदांची संख्या शेकडोत आहे.या त्यांच्या अभंगातुन त्यांनी देशातील नागरिकांना विशेषतः युवकांना जागे करण्याचा प्रयत्न केला.त्यांची भ्रमंती पार वर अफगाणीस्थान ते खाली श्रीलंकेपर्यंत झाली.बारा वर्षाच्या भ्रमंतीत त्यांनी जागोजागी मठ, मारुतीची मंदिरे आणि आखाडे स्थापन करुन हिंदवी स्वराज्याला पुरक वातावरण निर्माण केले.समर्थांना विनाकारण पिंजऱ्यात उभे करणारांनी त्यांचे चौफेर साहित्य वाचल्यास त्यांच्या सकारात्मक कार्याचा परिचय होण्यास मदत होईल असे वाटते.

समर्थांनी भगवान श्रीकृष्ण वर्णन व्रज भाषेत, संपूर्ण रामायण विशेषतः जनजागरणासाठी युध्दकांड अवधी आणि भोजपुरीतून, नवनाथ कथा खडीबोली भाषेतून, भगवान महादेवचरित्र पहाडी भाषेतून, स्फुट रचना उर्दू, अरबी ,फारशी शब्द प्रभाव असलेल्या भाषेत रचिलेले आहेत.समर्थांनी श्रीराम कार्य आणि देशकार्य यांची गुंफण घालत राष्ट्रजागरण केले.आग्र्याहून सुटल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांना सुखरुप पोचण्यासाठी विविध ठिकाणी असलेल्या समर्थांच्या अमराठी मठांचे सहकार्य झाल्याचे काहींचे मत आहे.मोगली सत्ता नष्ट होऊन संपूर्ण हिंदुस्थानात हिंदवी स्वराज्य शिघ्रातिशिघ्र स्थापन व्हावे ही त्यांची आंतरिक इच्छा असल्याचे त्यांच्या साहित्यातून लक्षात येते.

शिव छत्रपतींचे स्वराज्य शिघ्र वाढावे यासाठी समर्थांनी तुळजाभवानीला मागितलेले मागणे सारे काही स्पष्ट करते.

**मागणे एकची आता, द्यावे ते मजकारणे।**
**तुझा तू वाढवी राजा, शिघ्र आम्हाची देखतां !**
**मर्द संहारिले मागे, ऐसे उदंड एकतो ।**
**परंतु आता काही, रोकडे मुळ सामर्थ्य दाखवी ।**
**दास म्हणे माझे, सर्व आतुर बोलणे !**
**क्षमावे तुळजा माते, इच्छा ते पूर्णची करी।**

थोडक्यात समर्थांचे मराठी आणि अमराठी वांडमय 'ततो राष्ट्रम् बलमोजश्च जातम्' म्हणजे हे राष्ट्र बलसंपन्न होऊन परम् वैभवाला जावे हे त्यांचे स्वप्न होते.त्यांचे साहित्य हिंदुस्थान 'मोगली सुलतानी' संकटातून सुटून आसेतू हिमाचल 'रामराज्य आणि शिवराज्य' व्हावे यासाठीची प्रेरणा देणारे आहे.दासनवमीचे औचित्य साधून समर्थांचे अमराठी वांडमय वाचण्याची इच्छा सर्वांना व्हावी हा या लेखाचा प्रांजळ हेतू .तस्मात् असा प्रयत्न अभ्यासकांनी करावा ही विनंती !

**विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी, वाशिम.**
मो.९८२२२६२७३५

# विहिरी सर्वेक्षणात घोळ; चौकशीवरही संशय

## - सावरगाव प्रकरणी उच्चस्तरीय समिती गठीत
## - सीईओंकडून सखोल अहवालाची मागणी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

*पातूर तालुक्यातील सावरगाव परिसरातील गाळलेल्या विहिरींच्या सर्वेक्षणात गंभीर घोळ झाल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या गैरप्रकाराच्या चौकशीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणात आत्मदहनाचा इशारा देण्यात आल्यानंतर अखेर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत केली आहे.*



महादेव पायगन यांनी विहिरींच्या सर्वेक्षणात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचा आरोप करत २१ जानेवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले होते. तसेच १० फेब्रुवारी रोजी सीईओंच्या दालनात आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. या गंभीर इशाऱ्याची दखल घेत ६ फेब्रुवारी रोजी चौकशीसाठी स्वतंत्र उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली.

पायगन यांनी ७ जानेवारी रोजी गटविकास अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीत सावरगाव येथील विहिरींच्या सर्वेक्षणात ग्रामसेवक समाधान साळोकार व कृषी सहाय्यक अरुण ताले यांनी गैरप्रकार केल्याचा आरोप केला होता. मात्र, १२ जानेवारी रोजी झालेल्या प्राथमिक चौकशीत संबंधितांना वाचवण्यासाठी खोटा अहवाल सादर करण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मुर्तीजापूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी सुभाष काळे, कृषी अधिकारी संजय चांदुरकर आणि विस्तार अधिकारी कीर्तने यांची चौकशी समिती गठीत केली आहे. समितीला सखोल चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या प्रकरणाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, दोषींवर कारवाई होणार का, याकडे नागरिक उत्सुकतेने पाहत आहेत.

# महाराणा प्रताप बागेत नवा पुतळा व सभागृह उभारणार

## उपमहापौर अमोल गोगे यांची पाहणी; प्रशासनाला तातडीचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

सिटी कोतवालीजवळील महाराणा प्रताप बागेतील श्री. महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याची अवस्था अत्यंत जीर्ण झाल्याने येथे नव्या पुतळ्यासह मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश उपमहापौर अमोल गोगे यांनी महापालिका प्रशासनास दिले आहेत.



महाराणा प्रताप सेवा समितीच्या वतीने पुतळ्याची दुरवस्था व बागेतील सुविधांचा अभाव याबाबत निवेदन प्राप्त होताच उपमहापौर गोगे यांनी मंगळवारी (दि. १०) महाराणा प्रताप बागेची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान विद्यमान पुतळा जीर्ण अवस्थेत असून हार अर्पण व पूजेसाठी कोणतीही सुरक्षित व्यवस्था नसल्याचे निदर्शनास आले. तसेच नागरिकांसाठी शौचालय, स्नानगृह तसेच सार्वजनिक कार्यक्रमांसाठी छोटे सभागृह नसल्याचेही स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर महाराणा प्रताप बागेत श्री. महाराणा प्रताप यांचा नवा पुतळा उभारण्यात यावा. पुतळ्याजवळ हार अर्पणासाठी सुरक्षित सिडी व पक्के बांधकाम करावे. यासोबतच येथे छोटे सभागृह उभारून शौचालय व स्नानगृहाची सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश उपमहापौर अमोल गोगे यांनी प्रशासनाला दिले. या सर्व कामांना प्राधान्य देत लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

### महाराणा प्रताप सेवा समितीचे निवेदन

शुक्रवारी महाराणा प्रताप सेवा समितीच्या वतीने पृथ्वीराज ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली समाज बांधवांनी नवनिर्वाचित उपमहापौर अमोल गोगे व संजय गोटफोडे यांना महाराणा प्रताप बागेतील विद्यमान पुतळा जीर्ण झाल्याबाबत तसेच बागेत आवश्यक सुविधांचा अभाव असल्याबाबत निवेदन देण्यात आले होते. निवेदनाची दखल घेत उपमहापौर अमोल गोगे यांनी मनपाच्या कनिष्ठ अभियंत्यासह बागेची पाहणी केली. यावेळी समितीच्या मागण्या वाजवी असल्याचे नमूद करीत महापालिका प्रशासनाला याबाबतीत लवकरच सकारात्मक पावले उचलण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# ३७ वर्षांच्या न्यायलढ्याला अखेर न्याय

## रेल्वे दरवाढीविरोधी आंदोलन प्रकरणी काँग्रेस नेते निर्दोष

### लोकशाही संघर्षावर न्यायालयाची मोहोर; काँग्रेसच्या लढ्याचा ऐतिहासिक विजय



■ प्रतिनिधी | अकोला ■

रेल्वे प्लॅटफॉर्म तिकिट दरवाढीविरोधात १९८८ साली अकोला रेल्वे स्थानकावर झालेल्या आंदोलन प्रकरणात तब्बल ३७ वर्षांनंतर काँग्रेसच्या आजी-माजी नेत्यांना अखेर न्याय मिळाला आहे. सन्माननीय न्यायाधीश क्षीरसागर यांनी या प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. जनतेसाठी उभ्या राहिलेल्या काँग्रेसच्या लढ्याला न्यायालयाने दिलेली ही स्पष्ट पावती मानली जात आहे.

१९८८ मध्ये रेल्वे प्रशासनाने प्लॅटफॉर्म तिकिटाचा दर दोन रुपयांवरून पाच रुपये केल्याच्या निर्णयाविरोधात अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात आले होते. या आंदोलनावर तत्कालीन सत्तेने लाठीचार्ज करत अनेक आंदोलकांना जखमी केले होते. त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर विविध कायद्यांअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले.

या प्रकरणात माजी आमदार लक्ष्मणराव तायडे, माजी आमदार हरिदास मेंढे, माजी महापौर मदन भरगड, तत्कालीन युवक काँग्रेस अध्यक्ष गोपाल भीरड, तसेच विलास वखरे, प्रकाश तायडे, अनंतराव बगाडे, माजी नगरसेवक नरेंद्र मोदीराज, अजय रामटेके, राजेश राऊत, दिलीप दांदळे, दीपक काळपांडे, विजय नरवाडे, श्याम तिवारी, किशोर गौरवे यांच्यासह अनेक काँग्रेस नेत्यांचा समावेश होता. १९८८ पासून सुरू असलेल्या या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यात ॲड. मंदार विलास वखरे, ॲड. भूषण हागे आणि ॲड. ठाकूर यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. अखेर न्यायालयाने काँग्रेसच्या आंदोलनाला लोकशाही संघर्ष मान्यता देत सर्वांची निर्दोष मुक्तता केली.

निर्णयानंतर अकोला जिल्हा न्यायालय परिसरात उपस्थित काँग्रेसच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी न्यायालयीन व्यवस्थेचे आभार मानले. 'जनतेच्या हक्कासाठी उभा राहिलेला हा संघर्ष आमच्या आयुष्यातील अमूल्य आठवणींचा ठेवा आहे,' अशी भावना व्यक्त केली. यावेळी महेंद्र गवई, प्रशांत प्रधान, अनुराग काळपांडे यांच्यासह अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.३७ वर्षांनंतर मिळालेला हा निकाल म्हणजे काँग्रेसच्या जनआंदोलनाचा नैतिक विजय असून, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणाऱ्या संघर्षशील राजकारणाचा ऐतिहासिक क्षण ठरत आहे.

### १८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला मुदतवाढ

**अकोला :** जिल्ह्यातील ८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला दहावी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यात अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, म्हैसांग, उगवा, तसेच बाळापूर तालुक्यातील बहादुरा, सागद, नागद व मांजरी येथील वाळूघाट आहेत.

# जल्लोषात होणार शनिवारपासून सार्वजनिक शिवजयंती कार्यक्रमास प्रारंभ

### यंदा 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका'

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरातील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने दिनांक १४ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत शिवजयंती निमित्त शिव सप्ताह विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आला आहे. यंदा या शिवजयंती सोहळ्याचे मुख्य आकर्षण 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका' राहणार असून विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने ही शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत समितीचे पवन महल्ले यांनी दिली.



यावेळी संजय गोटफोडे, निरंजन पावसाळे, राम बोंद्रे, ॲड देवशिष काकड, संदीप बाथो आदी उपस्थित होते.शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी पार्क येथील शिवप्रतिमेचे पूजन करून या शिव जयंती सप्ताहास प्रारंभ होणार आहे.

रविवार दिनांक १५ रोजी सकाळी १० वाजता शिवाजी पार्क येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा होणार आहे.तसेच सकाळी ११ वाजता याच ठिकाणी किल्ले बांधणी स्पर्धा होणार आहे.तर दुपारी १२ वाजता शिवकालीन शस्त्र प्रदर्शनीचा मान्यवरांच्या हस्ते प्रारंभ होणार आहे.सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी प्रत्येक शाळेत शालेय स्तरावर निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे.शिव छत्रपती च्या जिवनावर आधारित या शालेय निबंध स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता टिळक पार्क परिसरात समितीच्या वतीने भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी पार्क परिसरात भव्य रांगोळी स्पर्धा होणार आहे.तर सायंकाळी ६ वाजता सिटी कोतवाली येथील महाराणा प्रताप बागेपासून ते शिवाजी पार्क पर्यंत भव्य मशाल रॅली आयोजित करण्यात आली आहे.गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी या शिवजयंती दिनी शिवाजी पार्क येथे सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा जल्लोषात साजरा करण्यात येणार आहे. या नंतर शिवजयंती घरोघरी हे स्पर्धात्मक अभियान राबविण्यात येणार आहे.दु १ वाजता शिवाजी पार्क येथे अन्नदान सेवा उपक्रम होऊन दु ३ वाजता डॉ आंबेडकर खुले नाट्य गृह येथून शिवाजी महाराज पार्क पर्यंत भव्य महारैली आयोजित करण्यात आली आहे. ही महारैलीचे येथे आगमन झाल्यावर सायंकाळी ७ वाजता शिवाजी महाराज पार्क येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या वर आधारित 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका' सादर करण्यात येणार आहे.

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**दयानंद मारुती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

प्रोसेस नं.२७९/२०२६ — दिनांक : ३१/०१/२०२६

दिवाणी किरकोळ अर्ज/३४/२०२६
शिवानंद हरिषचंद्र अवातिरक वि. कोणीही नाही
पुढिल तारिख २७-०३-२०२६

**अर्जदार :** १. शिवानंद हरिशचंद्र अवातिरक वय४६ वर्ष धंदा -शेता रा. बारलिगा ता. बाळापुर जि. अकोला २. सौ वंदना अरुण दुतोंडे वय अ५६वर्ष धंदा -घरकाम रा. प्लॉट न११ भागीरथ शाळेजवळ, पोस्ट ऑफीस जवळ, पटेल नगर जळगांव ता. जि. जळगांव ३. सौ रंजना ज्ञानेश्वर सरप वय अ ५०वर्ष धंदा - घरकाम रा व्दारा ज्ञानेश्वर सरप, जयराम महाराज संस्थान जवळ कान्हेरी सरप, ता. बार्शी जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत हरिशचंद्र तुळशीराम अवातिरक दिनांक २६.०१.२०२५ रोजी मौजे बारलिंगा ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले मयत गीताबाई हरिशचंद्र अवातिरक या दिनांक ०८.०७.२०२२ रोजी मरण पावल्या वरील नमूद अर्जदार यांना मयत हरिशचंद्र तुळशीराम अवातिरक यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व इतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकाना सूचित करण्यात येते की, सदरचे अर्जाविरुद्ध इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत वकीलामार्फत दिनांक २७.०३.२०२६ रोजी किवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल करीता आज दिनांक ३१.०१.२०२६ रोजी माझे सहीने व कोटांच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

(शिक्का)

**आदेशानुसार**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय बाळापूर

# श्रीरामदास नवमीनिमित्त अकोल्यात २५ हजार विद्यार्थ्यांचा '५१ मनाचे श्लोक' सामूहिक पठन

■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रीरामदास नवमीनिमित्त अकोला शहरात भक्तीचा जागर घडणार असून, तब्बल २५ हजार विद्यार्थ्यांचा '५१ मनाचे श्लोक' सामूहिक पठन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. अ?ड. धनश्री देव स्मृती सेवा व निलेश देव मित्र मंडळ यांच्या संयुक्त संकल्पनेतून बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी हा भव्य उपक्रम राबविण्यात येणार आहे.

'जागर भक्तिचा' या संकल्पनेअंतर्गत अकोला शहरातील २० शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी एकाच वेळी समर्थ रामदास स्वामींच्या ५१ मनाच्या श्लोकांचे समूहशः पठन करणार आहेत. सकाळच्या नियमित प्रार्थना वेळेत प्रत्येक शाळेच्या आवारात हा उपक्रम होणार आहे.

यंदा श्रीरामदास नवमीला ३४४ वर्षे पूर्ण होत असून, या निमित्ताने हिंदू संस्कृतीचा जागर व्हावा, समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचे संस्कार विद्यार्थ्यांवर व्हावेत, तसेच आत्मशिस्त, भक्ती, नैतिकता व समाजभान रुजावे, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल; अर्ज मागविले

■ प्रतिनिधी | अकोला ■

समाजकल्याण कार्यालयातर्फे गटई कामगारांना १०० टक्के अनुदान तत्वावर तयार पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना राबवली जाते. त्यासाठी २८ फेब्रुवारीपूर्वी अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवाशी व अनुसूचित जातीचा असावा. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागातील असल्यास ८० हजार व शहरातील असल्यास १ लाखापेक्षा अधिक असू नये. तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला आवश्यक. वय १८ पेक्षा कमी नसावे. अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा स्थानिक स्वराज्य संस्थेने त्याला भाड्याने, कराराने, खरेदीने वा विनामूल्य मात्र, अधिकृत ताब्यात दिलेली असावी किंवा त्याच्या स्वयंमालकीची असावी. लाभार्थ्यांचा प्राधान्यक्रम- ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार पीडित झालेली अनुसूचित जातीची व्यक्ती, घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा, परितत्त्या महिला, दिव्यांग व्यक्ती असा असेल.

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी श्री. दिपक अशोक कराळे, श्री. मंगेश अशोक कराळे व श्री. धर्मा अशोक कराळे सर्व रा. हरीहरपेठ, अकोला, ता. जि. अकोला यांचेकडुन त्यांचे मालकीची व ताब्यातील खाली वर्णन केलेली मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :-** मौजे अकोली बु., प्र. ता. जि. अकोला, र.स.डी. र.डी. अकोला महानगरपालिका अकोला चे हद्दीतील शेत सर्व्हे नं. ७/१ च्या जमीनीचे एस.डी.ओ. अकोला यांचे फाईलवरील रे.के.ने. एन. ए.पी-३४/अकोली बु./६४/ १९८१-८२ आदेश पारीत दि. ०८.०७.१९८२ अन्वये मंजुर झालेल्या स्नेह नगर, लेआऊट मधील डुप्लेक्स नं. ८/१ ज्याची बिल्डअप एरीया ७०.०० चौ. मिटर असुन सुपर बिल्डअप एरीया ८४.०० चौ. फुट असुन प्लॉट नं. ८–बी मधील ४२.०० चौ. मिटर आणि प्लॉट नं. ८-सी मधील २८.०० चौ.मिटर असे एकुण ७०.०० चौ.मिटर जागेसह सदर डुप्लेक्स छताचे संपुर्ण मालकीसह ज्याची चर्तु:सिमा – पुर्वेस स्कीम मधील खुली जागा व त्यानंतर खिडके यांचे घर, पश्चिमेस ५ फुट रूंद रोड, उत्तरेस २५ फुट रूंदीचा लेआऊट रोड, दक्षिणेस – डुप्लेक्स नं. ८/२ अशा वर्णनाचे डुप्लेक्स माझे पक्षकार यांचेसोबत विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. करीता सर्वांना सुचीत करण्यात येते की, वर उल्लेखीत मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, कर्ज, गहाण, बोजा वा इतर कोणताही हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्दी पासुन ७ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी पुराव्यासह व कागदपत्रासह कळवावे. कोणाचीही कोणतीही प्रकारे हरकत न आल्यास माझे पक्षकार वर उल्लेखीत मालमत्ता खरेदी करतील. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे उजर ऐकली जाणार नाही. करीता ही जाहीर नोटीस.

**पक्षकारा करीता अधिवक्ता**
**ॲड. सौरभ अशोक शर्मा**

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार नामे सुनील विलास राठोड, अनिल विलास राठोड, सौ. शशिकला विलास राठोड, विलास लछिराम राठोड सर्व रा. मु. भेंडीमहल, ता. बार्शीटाकली, जी. अकोला यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार सुनील विलास राठोड, अनिल विलास राठोड, सौ. शशिकला विलास राठोड, विलास लछिराम राठोड यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १९४, मौजे - भेंडीमहल, ता. बार्शीटाकली, जी. अकोला ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ १४२.१४ चौ. मीटर, ज्याचे चातुर्सिमा - पूर्वेस - फुलसिंग चव्हाण पश्चीमेस – रस्ता, उत्तरेस- आकाश राठोड, दक्षिणेस – शेषराव राठोड या वर्णनाची मालमत्ता आमचे पक्षकार यांचे मालकीची आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून आमचे पक्षकार हे जना स्माल फायनान्स बँक कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु:सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

**ठिकाण :- अकोला**
**दिनांक :- १०/०२/२०२६**

**ॲड. अजय वा. गोडे**
शॉप क्र. २३– ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला,
ता. जि. अकोला, मो.क्र. ९१७५९३८२४२

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १००/२०२६ — प्रोसेस नं.८९७/२०२६
चौ.ता. ०६/०३/२०२६ — दिनांक : २०/०१/२०२६

**अर्जदार :** सुधीर मूकुंदराव वाघमारे रा. हनूमान मंदिर समोर, कैलास टेकडी, गौतम नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. मूकुंदराव हिरामण वाघमारे २. कुसुम माणिकराव गायकवाड (लग्नापुर्वीचे नाव), श्रीमती कुसुम मुकुंदराव वाघमारे (लग्नानंतरचे नाव)

**पत्ता :-** रा. कैलास टेकडी, हनूमान मंदिर जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मूकुंदराव हिरामण वाघमारे यांचे दि. २५/०४/२००९ रोजी माळीपूरा, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत कुसुम माणिकराव गायकवाड (लग्नापुर्वीचे नाव), श्रीमती कुसुम मूकुंदराव वाघमारे (लग्नानंतरचे नाव) यांचे दि. ०९/०९/२०२१ रोजी कैलास टेकडी, हनुमान मंदिर जवळ, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## Change In Name

We have Changed Name Form
**AMINUDDIN KHAN**
--TO--
**AMEENUDDIN KHAN**
Passport No-J7753334
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**RESHMA JAHAN AMINUDDIN KHAN**
--TO--
**RASHMA JAHAN**
Passport No- R5366118
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**AMINUDDIN KHAN**
--TO--
**AMEENUDDIN KHAN**
Passport No- R5366118
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**AMINUDDIN KHAN**
--TO--
**AMEENUDDIN KHAN**
Passport No- R5366126
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**AMINUDDIN ANWARUDDIN KHAN**
--TO--
**AMEENUDDIN KHAN**
Passport No-J7753333
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**RESHMA JAHAN AMINUDDIN KHAN**
--TO--
**RASHMA JAHAN**
Passport No-J7753333
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**RESHMA JAHAN AMINUDDIN KHAN**
--TO--
**RASHMA JAHAN**
Passport No-J7753334
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**RESHMA JAHAN AMEENUDDIN KHAN**
--TO--
**RASHMA JAHAN**
Passport No- R5366135
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**AAYSHA JAHAN AMINUDDIN KHAN**
--TO--
**AYESHA JAHAN AMEENUDDIN KHAN**
Passport No- R5366126
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

## Change In Name

We have Changed Name Form
**RESHMA JAHAN AMINUDDIN KHAN**
--TO--
**RASHMA JAHAN**
Passport No- R5366126
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay
Pass plot no. 63 care of Santosh Golden Transport Akola 444001

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# बोर व्याघ्र प्रकल्पात 'ग्रे-हेडेड फिश इगल'चे सलग यशस्वी प्रजनन

## दुसऱ्यांदा अंडी; पिल्लांचीही नोंद, वन्यजीव अभ्यासकांमध्ये उत्साह

**वर्धा/जनमाध्यम**

दुर्मिळ व संरक्षित पक्ष्यांच्या यादीत असलेल्या करड्या डोक्याच्या मत्स्य गरुडाने (ग्रे-हेडेड फिश इगल) वर्धा जिल्ह्यातील बोर व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर परिसरात सलग दुसऱ्यांदा यशस्वी प्रजनन केल्याची नोंद झाली आहे. यापूर्वी नोव्हेंबर २०२५ मध्ये याच परिसरातील उंच झाडावर या गरुडाने अंडी देत दोन पिल्लांना जन्म दिला होता. आता पुन्हा दोन अंड्यांतून पिल्ले बाहेर पडल्याचे निरीक्षण समोर आल्याने वन विभाग व वन्यजीव अभ्यासकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



करड्या डोक्याचा मत्स्य गरुड हा प्रामुख्याने दक्षिण-पूर्व आशियातील पानथळ, नदीकाठ व जलाशय परिसरात आढळणारा शिकारी पक्षी आहे. राखाडी डोके, गडद तपकिरी शरीर, पांढरा पोटभाग व पाय, लांब व बाकदार चोच आणि फिकट पिवळे डोळे ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. साधारण ६१ ते ७५ सेंटीमीटर लांबी असलेला हा गरुड मासे पकडण्यात अत्यंत कुशल मानला जातो.बोर व्याघ्र प्रकल्पातील विस्तीर्ण जलाशय, मुबलक मासळी आणि पाण्यालगतची उंच झाडे यामुळे हा परिसर या प्रजातीसाठी आदर्श अधिवास ठरत आहे. गरुडाने पाण्याच्या जवळ असलेल्या उंच झाडावर काड्या व फांद्यांपासून मजबूत घरटे उभारले असून सुरक्षित वातावरणात पिल्लांची वाढ होत असल्याचे तज्ज्ञांच्या निरीक्षणात आले आहे.

**परिसंस्थेच्या आरोग्याचे सकारात्मक संकेत**

आययूसीएन रेड लिस्टमध्ये 'नजीकच्या धोकादायक' (Near Threatened) श्रेणीत असलेल्या या पक्ष्याचे सलग प्रजनन हे परिसंस्थेच्या आरोग्याचे सकारात्मक संकेत मानले जात आहेत. पाण्याची गुणवत्ता, मासळीची उपलब्धता आणि मानवी हस्तक्षेपावर नियंत्रण यामुळेच ही प्रजाती येथे स्थिरावत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना आवश्यक**

हा गरुड साधारण नोव्हेंबर ते मे या कालावधीत प्रजनन करतो. एका वेळेस एक ते दोन अंडी देतो आणि दोन्ही पालक पिल्लांच्या संगोपनात सक्रिय असतात. पिल्ले उडण्यास सक्षम होईपर्यंत घरट्याभोवती अत्यंत सावध वावर दिसून येतो. बोर व्याघ्र प्रकल्पातील हे सलग यशस्वी प्रजनन महाराष्ट्रातील वन्यजीव संवर्धनासाठी महत्त्वाची कामगिरी मानली जात असून, भविष्यात या प्रजातीच्या संरक्षणासाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# जातभेदाला छेद देत ७५ वा सत्यशोधकी विवाह

**वर्धा/जनमाध्यम**

भारत स्वातंत्र्याच्या हिरकमहोत्सवाचे वर्ष साजरे करत असतानाच वर्ध्यात सामाजिक समतेचा ठळक संदेश देणारा ७५ वा सत्यशोधकी विवाह पार पडला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) जिल्हा व शहर शाखा, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने चेतन सुभाष कोहले (रा. पांढुर्णा, मध्यप्रदेश) आणि गौरी साहेबराव मडावी (रा. आष्टी, जि. वर्धा) या प्रेमविरांचा विवाह वर्ध्यातील सरोज सभागृहात कायदेशीर व सत्यशोधकी पद्धतीने पार पाडण्यात आला. चेतन व गौरी यांची ओळख नातेवाईकांकडे ये-जा करताना झाली. ओळखीचे प्रेमात रूपांतर झाले, मात्र आंतरजातीय विवाह असल्याने



दोन्ही कुटुंबांकडून विरोध झाला. रोटी व्यवहार चालतो, पण बेटी व्यवहार नको या मानसिकतेला आव्हान देत दोघांनी विवाहाचा निर्णय घेतला. चेतना विकास संस्थेच्या समुपदेशनातून गजेंद्र सुरकार यांच्याशी संपर्क साधण्यात आला. कागदपत्रांची पूर्तता करून त्यांनी विवाहासाठी पुढाकार घेतला.अंनिसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव किटे व सरोज किटे यांच्या आग्रहाने हा ७५ वा सत्यशोधकी विवाह सरोज सभागृहातच पार पडला. सप्तपदी व शपथविधी कल्पना सातव फुसाटे, डॉ. माधुरी झाडे, नंदा नरांजे व डॉ. मंजुषा देशमुख यांनी पार पाडले. अध्यक्षस्थानी नगरसेवक डॉ. चावरे व सभापती खंगार उपस्थित होत्या. बाबाराव किटे, सरोज किटे, गजेंद्र सुरकार यांच्यासह मान्यवरांनी नवदाम्पत्याला शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश कांबळे यांनी केले, सूत्रसंचालन सुनील ढाले यांनी, तर आभार डॉ. हरिश पेटकर यांनी मानले. हा विवाह समता, विवेक आणि मानवतेचा संदेश देणारा ठरला.

## संक्षिप्त

### दुचाकीस्वाराचा मृत्यू

**वर्धा-**नागपूर–तुळजापूर महामार्गावरील सावंगी मेघे परिसरात भरधाव अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. सुमित ठाकरे (२३) रा. देवळी हा एम.एच. ३२ ए.झेड. ५७७४ क्रमांकाच्या दुचाकीने जात असताना मागाहून आलेल्या अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातात सुमित गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अज्ञात वाहनाचा शोध सुरू असून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### उभ्या कारला टिप्परची धडक

**देवळी-**हुस्नापूर टोलनाक्यावर भरधाव टिप्परने टोल भरण्यासाठी उभ्या असलेल्या कारला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात कारमधील एकजण जखमी झाला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. नरेश सालपे (५४) व त्यांचा पुतण्या अंकुश सालपे (रा. नागपूर) हे एम.एच. ४९ यू ६१२० क्रमांकाच्या कारने यवतमाळहून नागपूरकडे जात होते. टोलनाक्यावर कार थांबविली असताना मागाहून आलेल्या एम.एच. २५ सी.एच. २७२८ क्रमांकाच्या टिप्परने धडक दिली. या अपघातात अंकुश सालपे जखमी झाला. त्याच्यावर उपचार सुरू असून देवळी पोलिसांनी टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

### बचतगटाच्या कर्जाला कंटाळून आत्महत्या

**वडनेर -** बचतगटाच्या कर्जाच्या ओझ्यामुळे तरुणाने आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना धानोरा येथे घडली. संदीप शिरपूरकर (३५) रा. धानोरा याने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केली. संदीपने बचतगटाकडून कर्ज घेतले होते. मात्र आर्थिक अडचणींमुळे कर्जाची परतफेड करणे शक्य होत नसल्याने तो मानसिक तणावाखाली होता. या विवंचनेतूनच त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येते. प्रकृती बिघडल्यावर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. वडनेर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### बोलेरोच्या काचा फोडल्या

**खरांगणा-**कामावर न नेल्याच्या रागातून हेल्परने मालवाहू बोलेरो वाहनाची तोडफोड केल्याची घटना ब्राह्मणवाडा येथे घडली. बजरंगी साठे (३६) यांच्याकडे मालवाहू बोलेरो असून प्रशांत आत्राम हा त्यावर हेल्पर म्हणून काम करतो. एका दिवशी प्रशांत हा मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याने त्याला कामावर नेण्यात आले नाही. याच रागातून त्याने घरासमोर उभ्या असलेल्या बोलेरो वाहनाच्या कुऱ्हाडीने काचा फोडून मोठे नुकसान केले. घटनेनंतर वाहनमालकाने खरांगणा पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे.

### हटकल्याच्या कारणातून काठीने मारहाण

**वर्धा -** शेजाऱ्याला हटकल्याच्या कारणातून झालेल्या वादात एका इसमाला काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना पोद्दार बगीचा परिसरात घडली. मुकेश बैरीसाल (४८) यांच्या पत्नीने नालीत कचरा टाकल्याच्या कारणातून शेजारी दक्षू बैरीसाल याने शिवीगाळ केली. हा प्रकार सहन न झाल्याने मुकेश बैरीसाल यांनी त्याला हटकल्याने दोघांत वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.

# 'प्रोजेक्ट चीअर्स २.०'ची पुन्हा सुरुवात

## दिव्यांग मुलांसाठी उपचार, शस्त्रक्रिया व पुनर्वसनाची व्यापक मोहीम

**वर्धा/जनमाध्यम**

दिव्यांग व विशेष गरजा असलेल्या मुलांच्या आरोग्यसेवा, उपचार आणि पुनर्वसनासाठी 'प्रोजेक्ट चीअर्स २.०' या उपक्रमाची पुन्हा एकदा प्रभावी सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाअंतर्गत अपंगत्व असलेल्या मुलांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून सखोल तपासणी करून आवश्यक उपचार, शस्त्रक्रिया तसेच पुनर्वसन सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

उपक्रमाच्या प्रारंभी विशेष ऑर्थोपेडिक तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेस एव्हीबीआरएच कम्युनिटी केअर प्रशासन व जिल्हा समाजकल्याण कार्यालय यांचे सहकार्य लाभले आहे.



त्यांच्या पाठबळामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील दिव्यांग मुलांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवण्यास मदत होत आहे.पहिले तपासणी शिबिर यवतमाळ येथील पुण्यशील विद्यालयात पार पडले. ऑर्थोपेडिक्स विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. गजानन पिसुळकर यांच्या नेतृत्वाखाली या शिबिरात निवासी दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. ८ ते २० वयोगटातील सुमारे ९० विद्यार्थ्यांची तपासणी झाली असून, त्यापैकी ४२ विद्यार्थ्यांना पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. तपासणीदरम्यान सेरेब्रल पाल्सी, सीटीईव्ही, किफोस्कोलियोसिस, क्लब हँड यांसह विविध अस्थिरोगविषयक विकृती आढळून आल्या.या विद्यार्थ्यांना तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचार व पुनर्वसन सेवा दिल्या जाणार असून, पुढील काळात अशाच प्रकारची आणखी तपासणी शिबिरे घेण्याचे नियोजन आहे. उपचार व पुनर्वसन प्रक्रियेनंतर उपक्रमाचा समारोप जागतिक अपंग दिनानिमित्त होणाऱ्या इंद्रधनुष्य १६, २०२६' या सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार आहे. गेल्या दोन दशकांत ५ हजारांहून अधिक दिव्यांग मुलांना लाभ देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे ठळक उदाहरण ठरत आहे.

### ओम नमः शिवाय च्या गजरात धामंत्री शिवमय

# वरदायिनी वर्धा नदीपासून श्री नागेश्वर महादेव सस्थानापर्यंत भव्य कलशयात्रा



**वर्धा/जनमाध्यम**

आगामी महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर तिवसा तालुक्यातील प्राचीन श्री नागेश्वर महादेव संस्थान, धामंत्री येथे शेकडो महिलांच्या उपस्थितीत भव्य कलशयात्रा काढण्यात आली. वरदायिनी वर्धा नदीच्या पावन तीरावर आरती करून या यात्रेला प्रारंभ झाला. कडक उन्हाची पर्वा न करता अनवाणी पायाने, डोक्यावर कलश घेत महिलांनी ओम नमः शिवाय चा अखंड जप करत नगरप्रदक्षिणा घालत मंदिराकडे कूच केले. वारकरी संप्रदायाच्या भजन-दिंड्यांमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. नगरप्रदक्षिणेदरम्यान गावात ठिकठिकाणी पुष्पवृष्टी,पूजन,रांगोळी व फुलांच्या सजावटीद्वारे कलशयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.कलशयात्रेचे श्री नागेश्वर महादेव संस्थान येथे आगमन होताच मंदिर समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. तहसीलदार तिवसा मयुर कळसे (सपत्नीक) यांच्या हस्ते शिवलिंगाचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर संस्थानचे अध्यक्ष कैलाशकुमार कमलकिशोर पनपालिया व पत्नी पल्लवी पनपालिया यांच्या हस्ते पिंडीचा अभिषेक व कलश पूजन झाले.हजारो महिलांनी आणलेल्या कलशातील पवित्र जलाने महाभिषेक घालण्यात आला. तिवसा तहसीलचे नायब तहसीलदार आशिष नागरे यांच्या हस्ते,पं. स्वप्नील महाराज खेडकर यांच्या मंत्रोच्चारात विधीवत कलश स्थापना करण्यात आली. महाआरतीनंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### एटीएमची अदलाबदल करून वृद्धास ८० हजारांचा गंडा

**आर्वी** - आर्वी बसस्थानक परिसरात एटीएमची अदलाबदल करून अनोळखी व्यक्तीने वृद्धाची ८० हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना घडली. राष्ट्रसंत वार्डातील सुरेश अहीव (६८) हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएमवर पैसे काढण्यासाठी गेले होते. पैसे न निघाल्याने अज्ञात व्यक्तीने मदतीचा बहाणा करत एटीएम घेतला व पीन क्रमांक टाकायला लावला. काही वेळाने एटीएम परत दिला. नंतर बँकेत चौकशी केली असता खात्यातून चार वेळा १० हजार असे एकूण ४० हजार रुपये काढल्याचे समोर आले. दुसऱ्या दिवशी स्टेटमेंटमध्ये ८० हजार रुपये काढल्याचे उघड झाले. एटीएमची अदलाबदल झाल्याचे लक्षात येताच अहीव यांनी पोलिसांत तक्रार दिली असून पुढील तपास सुरू आहे.

### आर्वीतील शिरपेचात मानाचा तुरा

# आ.सुमित वानखेडे यांची यू.के. अभ्यासदौऱ्यासाठी निवड

**आर्वी/जनमाध्यम**

विधानसभा मतदारसंघासाठी अभिमानाची बातमी आहे. महाराष्ट्र विधानमंडळातील निवडक आमदारांसाठी युनायटेड किंगडम येथे आयोजित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय अभ्यासदौऱ्यासाठी आर्वीचे कार्यतत्पर आमदार सुमित वानखेडे यांची विशेष निवड करण्यात आली आहे. वेल्स विद्यापीठाच्या माध्यमातून होणाऱ्या या अभ्यासदौऱ्यात सहभागाची संधी मिळणे, ही त्यांच्या अभ्यासू वृत्तीची आणि प्रभावी कामकाजाची पोचपावती मानली जात आहे. या दौऱ्यातील प्रतिनिधी १५ फेब्रुवारी रोजी लंडन येथे दाखल होणार आहेत. त्यानंतर १६ ते २० फेब्रुवारी या कालावधीत वेल्स विद्यापीठाच्या लॅम्पिटर कॅम्पसमध्ये सुशासन व सार्वजनिक धोरण' (Good Governance & Public Policy) या विषयावर विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे.



यामध्ये आधुनिक प्रशासन, पारदर्शकता, लोकाभिमुख धोरणे तसेच शहर व्यवस्थापनाच्या प्रगत संकल्पनांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.अवघ्या १५ निवडक आमदारांच्या या पथकात सुमित वानखेडे यांचा समावेश होणे, ही बाब आर्वीसाठी भूषणावह ठरत आहे. या आंतरराष्ट्रीय अनुभवाचा उपयोग करून मतदारसंघात अधिक प्रभावी, पारदर्शक आणि जनतेच्या अपेक्षांना पूरक विकासकामे राबविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीमुळे संपूर्ण आर्वी तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### चैलीवरून पडून कामगाराचा मृत्यू

**हिंगणघाट-**गोदामाची रंगरंगोटी करताना १० फूट उंच चैलीवरून पडून कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना कुकाबर्डी येथील बिडकर गोदामात घडली. मंगेश भोकरे (३५) रा. इंदिरा गांधी वार्ड हा गोदामाचे पेंटिंग करीत होता. काम करत असताना त्याचा तोल गेला आणि तो थेट खाली कोसळला. गंभीर जखमी अवस्थेत त्याला रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना नसल्याचा आरोप होत आहे. हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### विहिरीत बुडून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**वडनेर-**सेलू शिवारात विहिरीत बुडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. प्रफुल्ल भुते (३२) रा. सेलू असे मृत तरुणाचे नाव आहे. प्रफुल्ल याला दारूचे व्यसन होते. दरम्यान, तो विहिरीजवळ गेला असता तोल जाऊन तो विहिरीत पडल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. बराच वेळ झाला तरी तो घरी न परतल्याने शोध घेतला असता त्याचा मृतदेह विहिरीत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच वडनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### आज पोलीस भरती; सेवाग्राम-दत्तपूर मार्गावरील वाहतूक वळविली

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात आजपासून पोलीस भरती च्या मैदानी प्रात्यक्षिक चाचण्यांना सुरुवात होत असल्याने सेवाग्राम उड्डाणपुल ते दत्तपूर टी-पॉईंट या मार्गावरील वाहतुकीत तात्पुरता बदल करण्यात आला आहे. उमेदवारांच्या ८०० व १६०० मीटर धावण्याच्या चाचण्या या मार्गावर होणार असल्यामुळे सकाळी ५ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सार्वजनिक रहदारीचे नियमन करण्यात आले आहे. जिल्हा क्रीडा संकुलात सुरू असलेल्या दुरुस्ती कामामुळे मैदानी चाचणीचा मार्ग बदलण्यात आला असून, याबाबत पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३३ अंतर्गत ही वाहतूक व्यवस्था लागू करण्यात आली आहे. दत्तपूर टी-पॉईंटकडून सेवाग्रामकडे जाणारी वाहतूक नालवाडी रोड, गोपुरी रोड, रेस्ट हाऊस, महात्मा गांधी पुतळा मार्गे वळविण्यात आली आहे. तसेच सेवाग्रामकडून दत्तपूरकडे जाणारी वाहतूकही याच पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.पोलीस भरतीदरम्यान वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, तसेच पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे करण्यात आले आहे. सार्वजनिक सुटीच्या दिवशी पूर्ववत सुरू राहणार आहे.

## पुस्तकांच्या बळावर स्वप्नांना पंख

# शालेय साहित्य वाटप म्हणजे भविष्य घडविण्याची पेरणी-श्यामसुंदर राठी

**वर्धा/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण गरिबीमुळे अडखळते; मात्र योग्य वेळी मिळालेले पुस्तक, वही आणि लेखन साहित्य हे त्यांच्या आयुष्याची दिशा बदलू शकते. अशा साहित्याचा पुरवठा म्हणजे केवळ मदत नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देणारी सामाजिक जबाबदारी आहे, असे भावनिक प्रतिपादन आर्वी येथील ज्येष्ठ समाजसेवक श्यामसुंदर राठी यांनी केले. ते नवजीवन छात्रालय येथे शैक्षणिक व जीवनोपयोगी साहित्य वितरण सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. हा कार्यक्रम ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरम व श्यामसुंदर राठी मित्र मंडळ यांच्या संयुक्त



विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन नवजीवन छात्रालयाचे सचिव प्राचार्य विजय व्यास यांच्या हस्ते झाले. यावेळी बुलढाणा अर्बन बँकेचे विभागीय व्यवस्थापक राजेश बगाडे, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, राष्ट्रीय सचिव किरण फुलझेले, सेंट थॉमस इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य प्रिती सत्यम, स्नेहालय संस्थेचे अध्यक्ष विलास कुळकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.महात्मा गांधींच्या अहिंसा, समता व सेवा या मूल्यांवर उभ्या असलेल्या नवजीवन छात्रालयात हा कार्यक्रम होणे ही गांधीविचारांना मानवंदना असल्याची भावना इमरान राही यांनी प्रस्तावनेत व्यक्त केली. यावेळी विजय व्यास, राजेश बगाडे, प्रिती सत्यम व विलास कुळकर्णी यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.पाहुण्यांच्या हस्ते छात्रालयातील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व ब्लँकेटचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन हरीष तांदळे यांनी केले, तर आभार विक्रांत गव्हाणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.


### जाहीर नोटीस

माझे पक्षकार.**सौ. आश्लेषा वामनराव फुलझेले** हे मौजा - वर्धा तह. - जिल्हा वर्धा. मौजा क्रमांक. 85,शीट क्रमांक ४८, भूखंड No. 27/2 वॉर्ड क्रमांक 7 क्षेत्रफळ 123.80 स्क्वे.मीटर .त्यावर बांधलेले घर चतु:सीमा - पूर्वेस :- पांडे ह्यांचे घर,पश्चिमेस :- श्री. राठी ह्यांचे घर, उत्तरेस :- पोकळे ह्यांचे घर, दक्षिणेस: - रस्ता,सदर मालमत्ता हि त्रिवेणीबाई वामनराव फुलझेले यांनी माझ्या पक्षकाराला आणि श्री. समीर वामनराव फुलझेले ह्यांना दिनांक 17/01/2020 रोजी दस्त क्रमांक 145/2020अन्वय बक्षीस पत्राद्वारे दिलेले आहे. समीर वामनराव फुलझेले हे दिनांक 27/12/2020 रोजी मरण पावले व त्या नंतर माझ्या पक्षकाराने स्वतःचे नाव वरील मालमत्तेवर समीर वामनराव फुलझेले ह्यांच्या वारस हक्काने चढवून घेतले व त्याचा फेरफार क्रमांक 16811असा आहे. माझ्या पक्षकाराने सदर मालमत्ता गहाण ठेविण्याकरिता The Tata Capital Housing Finance Ltd. येथे कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सदर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल ते त्यांनी सूचना प्रकाशित केल्याच्या 7 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**संपर्क:ॲड .आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा. मो. 9922426168**



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ७७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मोटारसायकल चोरटे ३ सराईत ताब्यात, तीन दुचाकी हस्तगत

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात सातत्याने घडत असलेल्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यात अमरावती शहर गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. गुन्हे शाखेने केलेल्या धडक कारवाईत तीन सराईत मोटारसायकल चोरांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्या चौकशीत तीन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या कारवाईत चोरीच्या तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

शहरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी संबंधित गुन्हे तातडीने उघडकीस आणण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण (गुन्हे शाखा) यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक सक्रिय करण्यात आले. फ्रेजरपुरा पोलिस ठाणे हद्दीत नोंद झालेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना, तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे साजीद उर्फ शाहरुख पि. मन्सूर खान (वय ३०, रा. रहमत नगर, अमरावती) याचा सहभाग उघड झाला. आरोपी कॅम्प परिसरात फिरत असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपीने आपल्या साथीदारांसह शहरातील विविध भागांत तीन मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर केलेल्या कारवाईत मो. नईम मो. कलीम (वय २५, रा. गवळीपुरा, अमरावती) व शेख इरफान उर्फ भुरया पि. शेख मन्सूर (वय ३०, रा. सादिया नगर, अमरावती) यांनाही ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून चोरीच्या तीन दुचाकी जप्त करून संबंधित तीन गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे व रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे यांच्या देखरेखीखाली पार पडली.

# मूर्तिजापूर-आसरा मार्गावर मिनीव्हॅनचा अपघात

## -८ ते १० प्रवासी जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** मूर्तिजापूर–आसरा मुख्य मार्गावर सोमवारी दुपारी अचानक समोर आलेल्या टाटा एस वाहनामुळे मिनीव्हॅन चालकाचा ताबा सुटून वाहन रस्त्यालगतच्या शेतात पलटी झाले. या अपघातात ८ ते १० प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर मूर्तिजापूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

माहितीनुसार, एमएच ४१/व्ही ६०२९ क्रमांकाची मिनीव्हॅन मूर्तिजापूरहून आसरा येथे प्रवासी घेऊन जात असताना शर्माच्या बागेजवळील वळणावर एमएच ४५/टी १७९१ क्रमांकाची टाटा एस अचानक समोर आली. या धक्कादायक प्रसंगामुळे मिनीव्हॅन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि वाहन थेट शेतात उलटले. अपघातानंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत जखमी प्रवाशांना बाहेर काढले व तातडीने रुग्णालयात हलवले. भातकुली पोलिसांनी पोलीस कॉन्स्टेबल संजय वसंतराव मोहोड यांच्या तक्रारीवरून दोन्ही वाहन चालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

---

श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित

**डॉ. पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूट**

शिवाजी नगर, अमरावती-४४४६०३

## सुचना

श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालीत डॉ. पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूट अमरावती येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता शालेय स्टेशनरी साहित्य / साफसफाई साहित्य / इलेक्ट्रीकल साहित्य / प्लबींग साहित्य / संगणक साहित्य खरेदीकरिता सिलबंद लिफाफ्यात अधिकृत पुरवठादार यांचेकडून कोटेशन मागविण्यात येते. अटि खालीलप्रमाणे

१) कोटेशन दिनांक. १८/२/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यालयात स्विकारले जातील. यातारखेनंतर येणारे कोटेशन स्विकारले जाणार नाही.
२) कोटेशन पोस्टाने पाठवावे किंवा प्रत्यक्ष येवून सादर करावे.
३) न्यूनतम दर असणारे पुरवठादार यांना प्राध्यान्य देण्यात येईल.
४) कोटेशन मंजूर करणे किंवा नाकारणे संपुर्ण अधिकारी महाविद्यालयाकडे राखीव आहे
५) कार्यालयाचा पत्ता :
प्राचार्य, डॉ. पं. दे. नर्सिंग इन्स्टिट्यूट, शिवाजी नगर अमरावती ४४४६०३

प्राचार्य
डॉ. पंजाबराव देशमुख
नर्सींग इन्स्टिट्युट अमरावती

---

### तहसिलदार नांदगाव खंडेश्वर यांचे कार्यालय

ता.नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती

क्र. प्रस्तु-१/स.म.अ./कावि-१२/२०२६ दि.०२.०२.२०२६

## जाहीरनामा

**विषय - मौजा धामक येथील शेत स.नं.४६ क्षेत्र ३.३२ हे.आर या शेताच्या ७/१२ मधील लक्ष्मण जंगलू माळी यांच्या नावाची नोंद कमी करणेबाबत.**

प्रस्तुत प्रकरण अर्जदार श्री.अब्दुल मतीन अब्दुल मुनाफ रा.धामक बेलोरा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती यांनी या कार्यालयात सादर केले असून त्यांनी मौजा धामक येथील सामाईक मधील शेत स.नं.४६ क्षेत्र ३ हे.३२ आर. पो.ख.०.०० आर. आकार १०.९४ रु.पैसे येणे प्रमाणे शेती असून सदर शेताच्या इतर अधिकारामध्ये लक्ष्मण जंगलू माळी १/२, बटई १९५१ ते ७२ चे कूळ अशी नोंद आहे. तरी सदर नोंद कमी करुन मिळणेबाबत प्रकरण या कार्यालयात सादर केलेले आहे.

करीता याद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, सदर कूळ खरेदी प्रकरणात अनुषंगाने कोणाचेही हितसंबंधित आक्षेप/हरकती दाखल करावयाच्या असतील त्यांनी स्वतः किंवा विधी व्यवसायी अभिकर्ता यांचे मार्फत १५ दिवसांचे आत या कार्यालयामध्ये हजर राहून दाखल करावे.

शिक्का

तहसीलदार,
नांदगांव खंडेश्वर
जि.अमरावती

---

### जाहीर नोटीस

प्रति,
**अपिलार्थी -**
१. कैलास बाबारावजी यावलीकर, रा.यावली शहीद, ता.जि.अमरावती
२. अलका गजानन इंगोले, रा.वणी ममदापूर, ता.तिवसा, जि.अमरावती
३. मंगला श्रीधरराव रोहणकर, रा.रोहणा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
४. साधना रामदासराव भुगल, रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. शारदा चंद्रशेखर वाईकर, रा.आसेगांव पुर्णा, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**उत्तरार्थी -**
१. जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख अमरावती/अकोला
२. सुनंदा प्रभाकरराव सिनकर, रा.अर्जुन नगर, ता.जि.अमरावती
३. मंगेश प्रभाकरराव सिनकर, रा.अर्जुन नगर, ता.जि.अमरावती
४. अर्चना किरण श्रीखंडे, रा.जुना बायपास रोड, गोंड बाबा मंदिराजवळ, देशपांडे लेआऊट, अमरावती, ता.जि.अमरावती
५. प्रणिता राजेश भोगे, रा.राधानगर, अमरावती, ता.जि.अमरावती
६. भावना योगेश साबळे, रा.गणोजा देवी, ता.भातकुली, जि.अमरावती
७. माधवी वैभव इंगोले, रा.अकोला, ता.जि.अकोला
८. कविता राजेंद्र घाटे, ता.तारखेडा, ता.जि.अमरावती

**विषय - महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम चे १९६६ कलम २४७ अन्वये अपील अर्ज मौजे यावली शहीद शिट नं.३, प्लॉट नं.४१०**

ज्याअर्थी अपीलार्थी यांनी इकडील पिठासनासमोर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत विषयांकीत अपील सादर केले आहे. परंतु उत्तरार्थी यांना नोटीसने कळवूनही त्यापैकी उत्तरार्थी अ.नं.६, ७ व ८ हे स्वतः किंवा त्यांचे अधिवक्ता सुनावणी वेळी सातत्याने गैरहजर आहेत. यास्तव उक्त उत्तरार्थी यांना कळविण्यात येते की, दि.११.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या पिठासनासमोर आपण स्वतः अगर आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी उपस्थित रहावे, नाहीपेक्षा प्रकरणी एकतर्फी निकाल देण्यात येईल, याची सर्व हितसंबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९.०२.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

(महेशकुमार शिंदे)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख (सं)
उपसंचालक भूमि अभिलेख
अमरावती प्रदेश, अमरावती

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.६२/२०२६ ने.ता.२०.०३.२०२६

**अर्जदार :** १. नर्मदाबाई ओंकारराव काळे
वय ८० धंदा - घरकाम
रा.तळेगांव मोहना, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक ओंकारराव बापुरावजी काळे** यांचा मृत्यू दिनांक **०६.१२.२००६** रोजी झाला. व **मृतक झुराबाई बापुरावजी काळे** हिचा मृत्यू बऱ्याच वर्षापुर्वी झालेला आहे. तसेच **मृतक सतीश ओंकारराव काळे** यांचा मृत्यू **१३.०७.२०२५** रोजी झालेला आहे. त्यावेळी ते अविवाहीत होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.६२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८७/२०२६ ने.ता.१८.०३.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती मंदा किसनराव राऊत, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.विवेक किसनराव राऊत, वय ३३ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.किरण संतोष पवार, वय ३४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.शहापूर, पो.माहुली धांडे, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. श्रीमती चंद्रकला पंजाबराव राऊत, वय ८० वर्षे, धंदा - घरकाम
रा.धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडील तर अर्जदार नं.४ चा मुलगा नामे **किसनराव पपंजाबराव राऊत** हे दि.**०३.११.२०२५** रोजी विनोबा भावे हॉस्पीटल, सावंगी मेघे, ता.जि.वर्धा येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, चांदूर रेल्वे, यांचे कार्यालय

आर.एम.जे.सी. क्र.२८७/२०२५ ने.ता.१२.०१.२०२६

### जाहीरनामा

**प्रति,**
**श्रीमती उज्वला शिवाजी शेंबे**
**रा.टोंगलाबाद, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती**

**विषय - जाहीरनामा प्रसिध्द करणेबाबत**

संदर्भ - निबंधक तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय, टोंगलाबाद यांचा प्राप्त प्रस्ताव

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती उज्वला शिवाजी शेंबे यांचा जन्म टोंगलाबाद येथे दिनांक १२.०५.१९६४ रोजी टोंगलाबाद, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झालेला असल्यामुळे व जन्माची नोंद करण्यात आलेली नसल्यामुळे जन्माची नोंद करण्याकरीता अर्ज दाखल केल्यावरुन निबंधक तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय टोंगलाबाद यांनी जन्म नोंदीचा आदेश मिळण्याकरीता प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झालेला आहे.

करीता प्रस्तावासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्याकरीता मूळ कागदपत्रासह या कार्यालयात दिनांक ११.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता न चुकता हजर रहावे तसेच सदर प्रकरणातील जाहीरनामा दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करुन त्याबाबतचा अहवाल मुदतीत या कार्यालयामध्ये सादर करावा.

शिक्का

स्वाक्षरी/-
तहसीलदार,
तथा तालुका दंडाधिकारी,
चांदूर रेल्वे

---

### जाहीर सुचना

माझे पक्षकार **श्री.देविदास रा.कुमरवार,** रा.४३-बी परमहंस कॉलनी, अकोली रोड, साई नगर, अमरावती ता.जि.अमरावती यांनी मला दिलेल्या माहिती, अधिकारावरुन मी पुढीलप्रमाणे सार्वत्रिक जाहीर सूचना संपूर्ण लोकांना देण्यात येत आहे की,

**माझे पक्षकार यांनी वादांकित मालमत्ता मौजे बडनेरा, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.१८९/३ मौजे रहाटगांव एकुण क्षेत्रफळ २७७९.३० चौ.मी. ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--**

पुर्वेस - प्लॉट नं.१०
पश्चिमेस - लेआऊट मधील रोड
उत्तरेस - प्लॉट नं.८७
दक्षिणेस - ईतर व्यक्ती यांची जागा

सदरहू मालमत्ता ही माझे पक्षकार यांच्या मालकी व ताब्यातील असून त्याबाबत वि.दिवाणी न्यायालय, अमरावती येथे नियमित दि.दावा नं.६८/२०२३ श्वेता गुंडेवार विरुध्द देविदास कुमरवार, वि.दि.दावा नं.११४/२०२५ देविदास कुमरवार विरुध्द श्वेता गुंडेवार तसेच मुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अमरावती येथे सिव्हील एम.ए.२४२/२०२५ देविदास कुमरवार विरुध्द श्वेता गुंडेवार अधिक ईतर असे तीन दावे प्रलंबित आहेत.

या मालमत्तेमध्ये माझे पक्षकार यांची मालकी असल्याने सर्व लोकांना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांचे पुर्व परवानगीशिवाय अथवा न्यायालयीन प्रकरण निर्णयांकित झाल्याशिवाय या मालमत्तेबाबत कोणीही कुणाशीही खरेदी-विक्री, गहाण, बक्षीस, तसेच भाडेपट्टा अथवा इतर कोणतेही व्यवहार करु नये. असा कोणताही झालेला व्यवहार हा आपोआप पुर्वलक्ष्मी प्रभावाने गैरकायदेशीर होईल तसेच भविष्यात वर नमुद न्यायालयीन आदेश अशा तिऱ्हाईक व्यक्तीवर सुध्दा बंधनकारक होईल झालेला व्यवहार गैरकायदेशीर समजण्यात येईल. तसेच सदर मालमत्तेचे व्यवहार करणाऱ्यावर दिवाणी व फौजदारी कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी आणि सदर मालमत्तेचा व्यवहार कुणीही कुणाशीही करु नये. करीता जाहीर सुचना प्रकाशित करण्यात येत आहे.

**(ॲड.सागर द.अंजीकर)**
भूमिपुत्र कॉलनी, कॉंग्रेस नगर
अमरावती
मो.९४२३४२६०८९, ७०२०३८०११९

---

### जाहीर सुचना

माझे पक्षकार **श्री.नंदकिशोर पु.गुंबळे,** रा.आझाद हिंद मंडळ बुधवारा चौक, अमरावती ता.जि.अमरावती यांनी मला दिलेल्या माहिती, अधिकारावरुन मी पुढीलप्रमाणे सार्वत्रिक जाहीर सूचना संपूर्ण लोकांना देण्यात येत आहे की,

**माझे पक्षकार यांनी वादांकित मालमत्ता मौजे बडनेरा, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.३०१/१ प्लॉट नं.४८/१ ज्याचे एकुण क्षेत्रफळ १३०.६६ चौ.मी.(१४०६ चौ.फुट) ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--**

पुर्वेस - रोड
पश्चिमेस - सर्व्हीस लाईन
उत्तरेस - प्लॉट नं.४८/२
दक्षिणेस - प्लॉट नं.४७

सदरहू मालमत्तेबाबत मूळ मालक माझे पक्षकार यांच्यासोबत केलेल्या सौदा व ताबा तसेच भरणा पावतीच्या अधिकाराने माझ्या पक्षकार यांचीच मालकी व ताबा असून त्याबाबत वि.दिवाणी न्यायालय, अमरावती येथे नियमित दि.दावा नं.६८/२०२३ श्वेता गुंडेवार विरुध्द देविदास कुमरवार, वि.दि.दावा नं.**५८०/२०२२** नंदकिशोर गुंबळे विरुध्द जयवंताबाई अधिक ईतर असा दावा प्रलंबित आहे.

करीता या मालमत्तेमध्ये माझे पक्षकार यांचाच ताबा असल्याने सर्व लोकांना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांचे पुर्व परवानगीशिवाय अथवा न्यायालयीन प्रकरण निर्णयांकित झाल्याशिवाय या मालमत्तेबाबत कोणीही कुणाशीही खरेदी-विक्री, गहाण, बक्षीस, तसेच भाडेपट्टा व्यवहार अथवा इतर कोणतेही व्यवहार करु नये. असा कोणताही झालेला व्यवहार हा आपोआप पुर्वलक्ष्मी प्रभावाने गैरकायदेशीर होईल तसेच भविष्यात वर नमुद न्यायालयीन आदेश अशा तिऱ्हाईक व्यक्तीवर सुध्दा बंधनकारक होईल झालेला व्यवहार गैरकायदेशीर समजण्यात येईल. तसेच सदर मालमत्तेचे व्यवहार करणाऱ्यावर दिवाणी व फौजदारी कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी आणि सदर मालमत्तेचा व्यवहार कुणीही कुणाशीही करु नये. करीता जाहीर सुचना प्रकाशित करण्यात येत आहे.

**(ॲड.सागर द.अंजीकर)**
भूमिपुत्र कॉलनी, कॉंग्रेस नगर
अमरावती
मो.९४२३४२६०८९, ७०२०३८०११९

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६९/२०२६
**अभिषेक व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१६.०३.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Abhishek Shyamsundar Bhadge, Age 35 Yrs. Occu.: Doctor
2. Swati Shyamsundar Bhadage, Age 68 Yrs. Occu.: Nil
Both R/o Near Laharibaba Mandir Laxmi Nagar, P.O.VMV, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्यामसुंदर संभाजी भडांगे** हे दिनांक 22.09.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अभिषेक व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अभिषेक व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८८/२०२६
**चंद्रकला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०८.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. चंद्रकला नारायण पवार, वय ७१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.जय गौरी नगर, अर्जुन नगर, शिवाजी नगर, अमरावती
२. गोपाल नारायण पवार, वय ५१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.अनुसया माता मंदिराजवळ, दत्तवाडी,अर्जुन नगर, शिवाजी नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नारायण संपतराव पवार** हे दिनांक 28.05.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **चंद्रकला व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंद्रकला व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८९/२०२६ ने.ता.१८.०३.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती कुसूम सुखदेवराव तायवाडे, वय ८९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. श्री.जीवन सुखदेवराव तायवाडे, वय ५० वर्षे, धंदा - शेती
रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **विलास सुखदेवराव तायवाडे, मयतांचे वारस**
३अ) श्रीमती वंदना विलासराव तायवाडे, वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
३ब) अभिषेक विलासराव तायवाडे, वय २७ वर्षे, धंदा - शेती
३क) संकेत विलासराव तायवाडे, वय २५ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ चे वडील अर्जदार नं.३अ चे सासरे तर अर्जदार नं.३ब,क चे आजोबा नामे **सुखदेव सूर्यभानजी तायवाडे** हे दि.**१६.०१.२०१८** रोजी विनोबा भावे हॉस्पीटल, सावंगी मेघे, ता.जि.वर्धा येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०९.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/२९/एमआरसी-८१/हिवरखेड/२०२५-२०२६

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार किशोर शंकरराव दारोकर, रा.हिवराखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे आप्पा नामे नारायण लंगडाजी दारोकर मृत्यूची नोंद ग्रामपंचायत हिवरखेड ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबांक, ग्रा.पं.हिवरखेड येथील जन्म-मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र इ. अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०६.०२.२०२६

शिक्का

**तहसीलदार, मोर्शी**

---

### जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), अचलपूर यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी. क्र.७९/२०२६ ने.ता.२०.०३.२०२६

**अर्जदार -**
१. उज्वला संजय भवते, वय ४६ वर्षे
२. कमलेश संजय भवते, वय २५ वर्षे
३. आकांक्षा संजय भवते, वय २६ वर्षे
सर्व रा.मेघदूत नगर, गल्ली नं.११, व्ही.टी.सी.इंदौर पो.नंदनगर, इंदौर

-विरुध्द-

**गैरअर्जदार -** निरंक

ज्याअर्थी अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये या न्यायालयायत वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मनोरमा हरिचंद्र भवते यांचे निधन दि.२४.०९.२०२४ रोजी झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर वारस आहेत व इतर कोणीही मयतास वारस नाही. अर्जदारांना सरकारी योजनाकरीता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब वारसा प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अचलपूर या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६.०२.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा)**
दिवाणी न्यायालय, (व.स्तर) अचलपूर

---

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव श्रीमती शमशाद बानो मो.युसुफ, पत्ता वार्ड क्र.२९ नौबागपुरा अचलपूर, ता.अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२९ मालमत्ता क्र.२५६७२ जुना मालमत्ता क्र.२९०००५६८ नझुल शिट क्र.... नझुल प्लॉट नं.नझुल ही कर आकारणी नोंदवहीनुसार नझुल जागा भोगवटदार मो.युनुस शे.उसमान या नावाने असून वरील अर्जदार यांनी नझुल जागा भोगवटदार श्रीमती शमशाद बानो मो.युसुफ या नावाने फेरफार घेण्याकरीता प्रतिज्ञापत्राद्वारे या न्यायालयामध्ये दिनांक २१.०१.२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - छन्नु भाई यांचे घर
**पश्चिमेस** - इंद्रीस भाई यांचे घर
**दक्षिणेस** - शेरखॉ भाई यांचे घर
**उत्तरेस** - गुड्डु भाई यांचे घर

शिक्का

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६/२०२६
**सुनंदा पाचगडे अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२४.०२.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Sunanda Manohar Pachgade, Age 80 Yrs. Occu.: Housewife
R/o 6/1, Ashirwad, Lokmanya Colony, Amravati.
2. Mr.Sunil Manohar Pachgade, Age 54 Yrs. Occu.: Service
R/o 202/C, Jupiter, Lodha Paradise, Majiwada, Thane (W) Kasarvadali, Thane
3. Mr.Sushil Manohar Pachgade, Age 50 Yrs. Occu.: Service
R/o Flat No.403, Kawade Road, Pune
4. Mrs. Neeta Prashant Bhagwat, Age 52 Yrs. Occu.: Doctor
R/o A4-1005, Basil, Mohan Pride, Wayale Nagar, Near Podar International School, VTC, Kalyan West

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Manohar Narisa Pachgade हे दिनांक 13.08.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Sunanda Manohar Pachgade + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Sunanda Manohar Pachgade + 3 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०६.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 261/19/2025
सार्वजनिक न्यासाचे नांव व **गौराई गौशाला ट्रस्ट मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती**
नोंदणी क्रमांक
बाबत अर्जदार - **सौ.कांचन दिनेश वसंत**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-१, अमरावती हे वर नमुद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन -** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मदाय आयुक्त-१, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०४.०२.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.३९/२०२६ ने.ता.०७.०३.२०२६

**अर्जदार :**
१. काशिनाथ आनंदराव बावणकुरे,
२. बंडु काशिनाथ बावणकुरे
दोन्ही रा.शिवणी रसुलापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. वंदना संजयराव राजगिरे,
रा.सावनेर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत शकुंतला काशिनाथ बावणकुरे** यांचा मृत्यू दिनांक **२०.०२.२०१७** रोजी शिवणी रसुलापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार १ हा पती आहे तर अर्जदार नं.२ हा मुलगा असून अर्जदार नं.३ ही मुलगी आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५ फेब्रुंवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय ,क.स्तर
नांदगाव खंडेश्वर

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### शंकरगीर महाराज यांचे हस्ते गजानन महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा




**अंजनगाव बारी -** येथील वीर भगतसिंग चौक अंजनगाव बारी येथे गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रगटदिनाचे निमित्त रमेशराव पोकळे गुरुजी व पुष्पाताई पोकळे यांचेकडून गजानन महाराज मंदिर येथे रामगीर महाराज मठाचे मठाधीपती शंकरगीर महाराज यांचे हस्ते गजानन महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा गावातील सर्व भाविक-भक्तांचे उपस्थितीत करण्यात आली. तसेच संध्याकाळी गजानन महाराज भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज जयंती पर्वावर त्यांच्या 'चरित्राचे वाचन' योगेश महाराज सालेगावकर (परभणी) यांच्याकडून करण्यात आले. तसेच यावर्षी संगितमय भागवत सप्ताहात 'श्रीराम कथा सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे, कथा प्रवक्ता ह.भ.प. अभिनंदन गायकवाड महाराज (सोलापूर) होते. तर याशिवाय सप्ताहभर भजन, कीर्तन, हरिपाठ, कलश स्थापना, ग्रंथ शोभायात्रा, काल्याचे कीर्तन मठाधिपती शंकरगीर महाराज यांनी केले. असे विविध धार्मिक कार्यक्रम राबविण्यात आले यावेळी भव्य महाप्रसादात भाविक-भक्तांनी लाभ घेतला.



### पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी अनुभवला दादासाहेब गवई यांचा इतिहास

**अमरावती-** दारापूर येथील विक्रमशीला पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी अमरावती विद्यापीठ परिसरात नव्याने साकारण्यात आलेल्या स्व. रा. सू. ऊर्फ दादासाहेब गवई यांच्या भव्य स्मारकाला सदिच्छा भेट दिली. पुस्तकी ज्ञानाला सामाजिक जाणीवेची जोड देण्यासाठी आणि भावी अभियंत्यांमध्ये थोर नेत्यांचे आदर्श रुजवण्यासाठी या विशेष सहलीचे आयोजन करण्यात आले होते.एआय (AI) गॅलरी आणि डिजिटल प्रदर्शनाने वेधले लक्ष या भेटीचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे स्मारकातील अत्याधुनिक एआय (AI) आधारित गॅलरी.या स्मारकात दादासाहेबांचा जीवनप्रवास १६ डिजिटल वॉल डिस्प्ले आणि ऑडिओ-व्हिज्युअल किओस्कच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे. १५ फुटी उंच कांस्य पुतळ्यासमोर विद्यार्थ्यांनी नतमस्तक होऊन अभिवादन केले.विद्यार्थ्यांशी संवाद साधताना धम्मदीप गवई यांनी दादासाहेबांच्या 'व्हिजन'वर प्रकाश टाकला. स्मारकातील २०० आसनी सभागृह, समृद्ध वाचनालय आणि दुर्मिळ छायाचित्रांचा संग्रह पाहून विद्यार्थी भारावून गेले होते. अमरावतीच्या या भूमीत दादासाहेबांसारखे महान नेतृत्व होऊन गेले, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. अशा भावना विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केल्या. यावेळी या भेटीदरम्यान स्मारकाचे संपदा व्यवस्थापक धम्मदीप गवई, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद, स्मारकावरील कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



### पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि मॅनेजमेंट येथे प्रकट दिन

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि मॅनेजमेंट येथे श्री संत गजानन महाराज प्रकट दिन मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.कार्यक्रमाची सुरुवात श्रींच्या प्रतिमेची पूजा व सामूहिक स्तोत्र पठणाने करण्यात आली. यानंतर श्रींची महाआरती करत पुष्पांजली अर्पण करण्यात आले. यानंतर महाविद्यालय परिसरात भजन आणि कीर्तनाचे आयोजन झाले. श्रींच्या जीवनकार्यावर आधारित प्रवचनाने उपस्थितांना आध्यात्मिक मार्गदर्शन मिळाले.कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.हा पवित्र सोहळा महाविद्यालयात भक्तिभावाने पार पडला आणि उपस्थितांना अध्यात्मिक आनंदाचा अनुभव मिळाला.



### पोटे पाटील रुग्णालयात शस्त्रक्रिया शिबीर

**अमरावती-** पी.आर. पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालय, अमरावती यांच्या वतीने १० फेब्रुवारी रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १०.०० ते १.०० या वेळेत या विशेष शिबिरात मुळव्याध,फिशर,भगंदर,पोटाचे आजार, मुत्रमार्गाचे विकार ,पायलोनाईडल सायनस,हर्निया,हायड्रोसिल, इतर शरीरावर कुठलीही चरबीची, घामाची गाठ, स्तनाच्या गाठी, कान शिवणे, (फाटलेले कान शिवणे), कुरुप काढणे, जखमेवर टाके मारणे, त्वचा विकार या व्याधी वर उपचार करून मार्गदर्शन केले. या शिबीरचे उद्घाटक म्हणून आयुर्वेद हॉस्पिटलचे प्राचार्य डॉ रणजित देशमुख हे उपस्थित होते. तसेच येथील तज्ञ चिकित्सक डॉ. नितेश ना. सानप ,डॉ. अश्विनी अं खार्डे उपस्थित राहून रुग्णांची तपासणी केली. संचालन आणि आभार डॉ. निकिता लांडे यांनी केले.

### प्रवीण तूळे यांचे निधन



**बेलोरा-** जवळ असलेले बऱ्हाणपूर येथील प्रवीण ज्ञानेश्वर तूळे (४९ वर्ष) यांचे आजारामुळे निधन झाले. त्यांच्या मागे आई, पत्नी, दोन मुले, दोन भाऊ असा परिवार आहे. प्रवीण हा बरहानपुर येथील गोरगरिबांच्या दुःखात सुखात धावणारा व मदत करणारा व्यक्ती होता. त्यांच्या निधीनामुळे संपूर्णगावावर शोकांतिका पसरलेली आहे.

# नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे आठवडी बाजारात ट्रॅफिक पोलिसांची कसरत

**बेलोरा वार्ताहर**

चांदूरबाजार येथे दर रविवारी भरणाऱ्या आठवडी बाजारामुळे शहरातील वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण होत असून, नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे ट्रॅफिक पोलिसांना मोठ्या परिश्रमांना सामोरे जावे लागत आहे.



दर रविवारी या आठवडी बाजारात दूरदूरवरून व्यापारी येतात. अनेक व्यापारी आपली दुकाने थेट रहदारीच्या रस्त्यावर मांडत असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होतो. बाजाराची वसुली नगरपरिषदेकडून केली जाते; मात्र बाजारात शिस्त लावण्याकडे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. परिणामी वाहनधारकांना कोणत्या दिशेने वाहन काढावे, यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.या परिस्थितीत नगरपरिषदेने जबाबदारी न घेतल्यामुळे चांदूरबाजार येथील ट्रॅफिक पोलिसांना सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत दुकानदारांना हटवणे, वाहतूक सुरळीत ठेवणे यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागत आहे.दरम्यान, चांदूरबाजार–परतवाडा ते मोर्शी रोडवर काही परदेशी लस्सी विक्रेत्यांनी कोणतीही नगरपरिषदेची परवानगी अथवा एनओसी न घेता दुकाने थाटली आहेत.

त्यांच्या दुकानांसमोर पार्किंगची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहने रस्त्यावरच उभी राहत असून, त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे.या ठिकाणी संबंधित दुकानदारांनी स्वतः पार्किंगची योग्य व्यवस्था करावी. अन्यथा, वाहतूक अडथळा निर्माण झाल्यास संबंधित दुकानदार व जागा भाड्याने देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी चांदूरबाजार येथील नागरिकांकडून होत आहे.तसेच नगरपरिषद प्रशासनाने आठवडी बाजारासाठी स्वतंत्र कर्मचारी नेमून बाजारात शिस्त लावावी, जेणेकरून भविष्यात वाहतुकीचा प्रश्न उद्भवणार नाही, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

# नगर पंचायतीच्या सभांमध्ये 'प्रोटोकॉल' पाळा

## नगरसेविका प्रांजली गुल्हाने यांची प्रशासनाकडे मागणी

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

नगर पंचायत प्रशासनाने सर्वसाधारण सभांमध्ये लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्या आसनव्यवस्थेबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी प्रभाग क्रमांक १४ च्या नगरसेविका प्रांजली राहुल गुल्हाने यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

नगरसेविका गुल्हाने यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सध्या नगर पंचायतीच्या सभांमध्ये आसनव्यवस्थेत सुसूत्रता नसल्याने सभेच्या शिस्तीवर परिणाम होत आहे. महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायती अधिनियमातील तरतुदीनुसार, सभेचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्षा मध्यभागी सन्माननीय स्थानी बसणे आवश्यक आहे.



त्यांच्या एका बाजूला उपनगराध्यक्ष आणि दुसऱ्या बाजूला प्रशासकीय प्रमुख म्हणून मुख्याधिकाऱ्यांची जागा निश्चित असावी. तसेच, सभागृहात गटनेते आणि ज्येष्ठ नगरसेवक यांना त्यांच्या पदानुसार योग्य स्थान मिळणे गरजेचे आहे. आगामी सभेपूर्वी सभागृहात नामनिर्देशित पाट्या लावून खालीलप्रमाणे व्यवस्था करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

अध्यक्ष (नगराध्यक्ष): व्यासपीठावर मध्यभागी,उपाध्यक्ष व मुख्याधिकारी: अध्यक्षांच्या दोन्ही बाजूंन गटनेते, समोरील पहिल्या रांगे नगरसेवक, वॉर्ड क्रमांक किंवा ज्येष्ठतेनुसार निश्चित क्रमाने,

लोकशाही परंपरा आणि शासन निर्णयांचे पालन करून प्रशासनाने त्वरित लेखी निर्देश द्यावेत, जेणेकरून सभागृहाची प्रतिष्ठा राखली जाईल, असेही प्रांजली राहुल गुल्हाने नगरसेविका प्रभाग क्रमांक - १४ नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

### ग्रामगीता हा जीवन विकासाचा मार्ग दाखविणारा ग्रंथ-सोनपराते गुरुजी



**लेहेगाव -** स्थानिक नेरपिंगळाई येथील जि.प.मुलांच्या शाळेत नुकतीच ग्रामगीता जीवन विकास परीक्षा पार पडली. या परीक्षेचे आयोजन सुनिल डेहणकर केंद्र संचालक यांनी केले. प्रवेश, परीचय, प्रविण, ग्रामनाथ, ग्रामगीतारत्न व ग्राम गीताचार्य अशा सहा गटामध्ये ही परीक्षा घेतली. सुरवातीला राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या फोटोचे पुजन करून 'गुरुदेव हमारा प्यारा' या संकल्प गीताने सर्वांना प्रेरणा देण्यात आली. नंतर परीक्षा सुरु झाली.या करीता पर्यवेक्षक म्हणून मार्गदर्शक म्हणून विनायकराव सोनपराते ग्रामगीताचार्य पंजाबराव भोजने, सुषमा वडनेरकर, सोहम खंडारकर, हर्षित भोजने यांनी कार्य केले. यशस्वीतेसाठी संदीप मंगळे व दिपा मंगळे यांनी सहकार्य केले.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात 'मराठी भाषा संवर्धन' पंधरवडा

**अमरावती/का.प्र**

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार अस्मिता शिक्षण मंडळ, अमरावती द्वारा संचालित स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या मराठी विभागाद्वारा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या उद्देशाने महाविद्यालयाच्या मराठी विभागाद्वारा 'मराठी भाषा संवर्धन: काळाची गरज' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.यामध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी अमृता शेळके, बी.ए.भाग १ हिने प्रथम,पूनम शेंडे, बी. कॉम भाग १ हिने द्वितीय तर पूनम शेंडे, बी. कॉम.भाग १ हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेचे परीक्षण राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. बबिता येवले आणि संस्कृत विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रज्ञा इंगळे यांनी केले.त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा सांगीतिक गोडवा कळावा,मराठी भाषेतील सुप्रसिद्ध व कर्णमधुर भावगीते त्यांच्यापर्यंत पोहचावीत आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या उद्देशाने महाविद्यालयाचा मराठी व संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन 'युवारंग-२०२६' दरम्यान 'मराठी भावगीत गीतगायन स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाचा विद्यार्थी गजानन पळसकर बी. ए.भाग २ याने प्रथम,मेघा वणवे, एम. ए. संगीत भाग १ हिने द्वितीय तर सलोनी कळसकर, एम. ए. संगीत भाग २ हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेचे परीक्षण संगीत विभागाच्या प्रा.सोनाली आसरकर आणि बी. सी. ए. विभागाच्या प्रा.अंबिका बडनखे यांनी केले. या दोन्ही स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनादरम्यान मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला .या सर्व कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. दीपक वानखडे, संगीत विभाग प्रमुख प्रा डॉ.जगन्नाथ इंगोले, प्रा.गजानन काळे, प्रा.सोनाली आसरकर, प्रा.अमोल वाडवे, प्रा. गजानन केतकर, प्रा.गणेश सरोदे तसेच मराठी व संगीत अभ्यास मंडळाच्या विद्यार्थी कार्यकारिणीने परिश्रम घेतले.



# पार्डी (देवी )भुयारी रेल्वे क्रॉसिंग मार्गावर उड्डाणपूल (आरओबी) बांधकमास मंजूर

## खा.बळवंत वानखडे यांच्या प्रयत्नांना यश

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

बडनेरा मतदारसंघातील नागपूर-मुंबई रेल्वे मार्गावरील पार्डी (देवी) गावात रेल्वे अंडरब्रिजचे बांधकाम सुरू आहे. तथापि, हा अंडरब्रिज खूपच लहान आणि अरुंद असल्याने मोठ्या वाहनांना त्यातून जाण्यास अडचण येत आहे. या भागात शेती मोठ्या प्रमाणात होत असल्याने, शेतकऱ्यांना त्यांची शेती उपकरणे (ट्रॅक्टर, कापणी यंत्रे आणि थ्रेशर) नेण्यात अडचणी येत आहेत.ग्रामीण पार्डी (देवी) गाव राज्य महामार्ग-१९९ वर आहे आणि येथे प्रस्तावित आरओबी (रोड ओव्हर ब्रिज) बांधकाम सोयीस्कर ठरेल.तथापि, अमरावती जिल्ह्यातील पार्डी (देवी)येथील रेल्वे क्रॉसिंगवर



आरओबी बांधण्याबाबत कारवाई केली जाऊ शकते याबद्दल माहिती दिली जाऊ शकते असे खासदार बळवंत वानखडे यांनी नागपूर मध्य रेल्वे प्रबंधक यांना दिलेल्या निवेदनात सांगितले आहे.आरओबी (Road Over Bridge) बांधकाम हे रेल्वे ट्रॅकच्या वरून जाणारे पूल आहेत, जे ट्रॅफिक जाम कमी करण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी रेल्वे क्रॉसिंगवर बनवले जातात. हे प्रकल्प जमीन संपादन, पर्यावरणीय मंजुरी, आणि रेल्वे-राज्य समन्वय यासारख्या आव्हानांमुळे उशिरा पूर्ण होतात, परंतु हे अपघातांची संख्या कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.हे पूल रेल्वेच्या मान्यतेने (GAD - General Arrangement Drawing) आणि पीडब्ल्यूडी (PWD) किंवा संबंधित विभागामार्फत बांधले जातात.

### वुमेन्स स्टडीज सेंटरच्या विद्यार्थ्यांची 'भरोसा सेल'ला क्षेत्रभेट

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत एम.ए.जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रम चालवण्यात येतो. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी अमरावती पोलीस आयुक्तालयातील भरोसा सेल येथे क्षेत्रभेट दिली. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक अभ्यासासह विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांमधील कार्यप्रणालीचा परिचय व्हावा तसेच व्यावहारिक बाजूंचे आकलन व्हावे, या उद्देशाने अभ्यासक्रमा अंतर्गत ही क्षेत्रभेट देण्यात आली.




यावेळी अमरावती पोलीस आयुक्तालायातील भरोसा सेलमधील पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मे, पोलीस उपनिरीक्षक सुनिता कांगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मेघाली गावंडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुनील मेतकर, श्रद्धा रोकडे (एल.पी.सी.) टाटा समाजविज्ञान संस्थे अंतर्गत कार्यरत विशेष कक्षाच्या प्रादेशिक समन्वयक प्रतिभा गजभिये यांसह राजेश यादव (हेड कॉन्स्टेबल), अनिता जवंदर (हेड कॉन्स्टेबल), संगीता आठवले (कॉन्स्टेबल) उपस्थिती होते. तसेच त्यांनी आपल्या कार्याविषयी माहिती दिली.यावेळी पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भरोसाला सेल अंतर्गत पिडीत महिला व मुलींना करण्यात येणारे सहकार्याचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले.प्रतिभा गजभिये यांनी महिला व मुलींच्या येणाऱ्या तक्रारींची सद्यास्थिती स्पष्ट करून समुपदेशनाचे अनुभव सांगितले.या क्षेत्रभेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी महिलांसंबंधीचे कायदे, समाजातील महिलांसंबंधीचे गुन्हे आणि त्यांचे निवारण या संदर्भात विविध प्रश्न संबंधितांना विचारून अधिक माहिती प्राप्त केली. सदर क्षेत्रभेटी दरम्यान सेंटरमधील डॉ. भगवान फाळके, प्रा. पूजा अलोने, डॉ. मनीषा इंगळकर, सारिका देशमुख यांसह अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा वक्तृत्व स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा 'जेंडर इक्वलिटी : सद्यस्थिती आणि आव्हाने' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा झाली. विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमधील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक समानता विषयक जाणीव जागृती व्हावी, तसेच त्यांच्यात लिंगभाव संवेदनशीलतेचा विकास व्हावा, या हेतूने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये विविध शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक स्पर्धकाने विषयाच्या अनुषंगाने संदर्भ देत मांडणी केली. त्यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय आणि दोन प्रोत्साहनपर क्रमांक निवडण्यात आले.

या स्पर्धेत एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रमाचे विद्यार्थी प्रफुल्ल कुकडे यांनी यांनी प्रथम,तर ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील विद्यार्थी नितीन गवई यांनी द्वितीय, शिक्षणशास्त्र विभागातील विद्यार्थी प्रज्वल घोम यांनी तृतीय तर एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रमाची प्राजक्ता देशमुख आणि पल्लवी चिमूरकर यांनी प्रोत्साहनपर क्रमांक पटकाविला. या स्पर्धेचे परीक्षण महात्मा ज्योतिबा फुले वाणिज्य व विज्ञान आणि विठ्ठलराव राऊत कला महाविद्यालय, भातकुली येथील मराठी विभागप्रमुख डॉ. रवी साखरकर यांनी केले.

क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना स्पर्धेचे परीक्षक डॉ. रवी साखरकर यांसह सेंटरचे प्रा. डॉ. भगवान फाळके उपस्थित होते.बक्षीस वितरणावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना परीक्षक डॉ. रवी साखरकर म्हणाले, समाजाचा संतुलित विकास होण्यासाठी लैंगिक समानता आवश्यक आहे. त्यासाठी समाजात लिंगभाव संवेदनशीलता विकसित करण्यासाठी जाणीव-जागृती करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. पूजा अलोने यांनी केले.

### वलगाव येथे मोफत रोग निदान शिबीर

**वलगाव-** येथील शारदा नारायण विज्ञान मंडळाच्या वतीने अक्झॉन मल्टीस्पेशालिस्ट अँड क्रिटिकल केअर हॉस्पिटल अमरावती यांच्या सहकार्याने सिकची दवाखाना वलगाव येथे नि:शुल्क शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात सर्व वयोगटातील नागरिकांची मोफत रक्तदाब तपासणी, व्हायटल तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरात डॉ.महेंद्र गुढे, डॉ. भूषण ठाकरे, डॉ.अभिषेक काळपांडे, डॉ.प्रथमेश भकारे, डॉ. अविनाश ठाकरे, परिचारिका प्रतीक्षा रंगारी, मंजु बेलसरे यांनी रुग्णांची रोग निदान तपासणी केली. यात ८० रुग्णांनी लाभ घेतला.तत्पूर्वी मामासाहेब निर्मळ, आशिष जोशी, मोहन जोशी, प्रमोद जोशी, राजेंद्र जोशी यांनी सर्व डॉक्टर टीमचे स्वागत केले. या शिबिराचे आयोजक शारदा नारायण कृषी विज्ञान मंडळाचा जोशी परिवार यांनी मोफत रोग निदान तपासणी शिबिर घेण्यास पुढाकार घेतल्याबद्दल याप्रसंगी गावकऱ्यांनी त्यांचे आभार मानले.



# बारावीची परीक्षा 'कॉपीमुक्त' वातावरणात सुरू

## १३७ केंद्रांवर पहिल्या दिवशी इंग्रजीचा पेपर सुरळीत

### -जिल्हाधिकाऱ्यांची परीक्षा केंद्रांना भेट , -पहिल्याच दिवशी प्रशासनाचा कडक पहारा




**अमरावती/प्रतिनिधीः-** बारावीच्या परीक्षेला जिल्ह्यात उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात सुरुवात झाली. जिल्ह्यातील १३७ केंद्रांवर पहिल्या दिवशीचा इंग्रजी विषयाचा पेपर सुरळीत पार पडला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज पहिल्याच दिवशी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असलेल्या 'कॉपीमुक्त' अभियानामुळे परीक्षा केंद्र परिसरात शांतता दिसून आली. आज एकाही केंद्रावर गैरप्रकार आढळून आला नाही.

कॉपीमुक्त अभियानासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली असून नियोजन करण्यात आले आहे. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संस्था प्रमुखांची बैठक घेऊन सूचना दिल्या. त्यानुसार प्रत्येक परीक्षा केंद्रावर पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. केंद्रावरील कोणत्याही गैरप्रकारासाठी या समितीला जबाबदार धरले जाणार आहे. परीक्षेच्या पहिल्या दिवशी आज सकाळीच जिल्हाधिकाऱ्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संस्था प्रमुखांशी संवाद साधून सतर्क राहण्याच्या सूचना केल्या. प्रशासनातर्फे भरारी व बैठे पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जिल्हा प्रशासनाच्या विविध विभागातील वर्ग एक व वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांची परीक्षा केंद्र भेटीसाठा☞(पान २ वर)

# शाळेतून परतणाऱ्या अल्पवयीन मुलीवर सामुहिक अत्याचार

## पाच पैकी तिघे ताब्यात

### चांदूर रेल्वे हद्दीत धक्कादायक प्रकार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शाळेतून परत घरी जाणा-या एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर पाच जणांनी सामूहिक लैंगिक अत्याचार वा ल्याचा संतापजनक घटना चांदुर रेल्वे पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारी (दि.१०) उघडकीस आली आहे. आठ महिन्यापूर्वी ही घडली असून त्यानंतर पीडिता व तिच्या कुटुंबीयांनी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, तिघांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित दोन आरोपी अल्पवयीन असून त्यांना बाल न्यायालयात हजर करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार☞(पान २ वर)



■ माहितीनुसार पीडित तरुणी ७ जुलै २०२५ रोजी शाळेतून घरी जात होती. त्यावेळी आरोपी सम्यक व अजिंक्य तिच्या जवळ आले. हे दोघे तिच्या भावाचे मित्र होते. आरोपींनी तिला म्हटले की, तुझी गावात बदनामी करेल तुझे मुलांसोबत लफडे आहे असे म्हणून आरोपी तिला रोडवरील मागे घेऊन गेले. तिथे आरोपींनी बळजबरीने अत्याचार केला. पिडित अल्पवयीन मुलीने हा प्रकार कोणालाही सांगीतला नाही. पोटात दुखत असल्यामुळे ती रूग्णालयात गेली असता ती गरोदर असल्याची माहिती समोर आली. यानंतर तिने सोमवारी आरोपी विरुद्ध चांदुर रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी पाचही आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून दोन आरोपींना अटक केली आहे.

# जनता दरबार आयोजित करून नांदगावच्या नगराध्यक्षांनी स्वीकारला पदभार

## १०७ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचे पत्र वाटप



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** थेट जनतेतून निवडून आलेल्या प्रथम महिला नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांनी नगरपंचायतच्या प्रांगणात जनता दरबाराचे आयोजन करून पदभार स्वीकारला आणि यावेळी १०७ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचे पत्र वाटप सुद्धा केले. आयोजित जनता दरबारात नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यात आल्या. यावेळी ४८७ नागरिकांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात नगराध्यक्षांकडे सादर केल्या. नगराध्यक्षांनी जनता दरबार आयोजित करून अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पदभार स्वीकारण्याची हि पहिलीच वेळ असल्याचे नागरिकांमधून चर्चा आहे. जनता दरबार हाच आमचा पदभार असा नगराध्यक्षांकडून संदेश देण्यात आला. यावेळी शहरातील नालेसफाई, दैनंदिन स्वच्छता, पाणी पुरवठा, बंद असलेले पथदिवे, घरकुल अश्या अनेक मूलभूत समस्या ☞(पान २ वर)

# दारूच्या दुकानात सेवानिवृत्त रेल्वे कर्मचा-याची हत्या, तिघांना अटक

### विटाळा येथील घटना

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** क्षुल्लक वादातून सेवानिवृत्त रेल्वे कर्मचा-याची हत्या करण्यात आली आहे. ही घटना मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाणे हद्दीत विटाळा येथील देशी दारू दुकानात सोमवारी रात्री घडली. अनिल सुखदेवराव आव्हाड (वय ६८, गुंजखेडा, देवळी, जि. वर्धा) असे मृतकाचे नाव आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी अमोल विजय समरीत (वय ३२), घनश्याम निंबाते (वय ४०) व संजू उर्फ संजय महादेव दिघोरे (वय २७,तिन्ही रा. विटाला धामणगाव रेल्वे) या तिघांना अटक केली आहे. माहितीनुसार सोमवारी



रात्री सेवानवृत्त रेल्वे कर्मचारी अनिल आव्हाड नेहमीप्रमाणे विटाळा येथील देशी दारू दुकानात गेले होते. आरोपी अमोल समरीत पण तिथे येत होता. दोघे एकमेकांना ओळखत होते. सोमवारी दोघांनी सोबत दारू पिली. यानंतर आरोपी यांनी आव्हाड यांच्या खिशातील मोबाईल हिसकविण्याचा प्रयत्न केला. यामुळे त्यांच्यात वाद झाला. यावादात आरोपींनी आव्हाड यांना भिंतीवर आपटून ओट्यावरून☞(पान २ वर)

# महापालिकेत शिंदे सेनेसह बसपाचा नवीन गट

## डॉ.राजेंद्र तायडे गटनेता, राजकीय समीकरण बदलणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** महापालिकेत महापौर आणि महापौर निवडणूक झाल्यानंतर आता शिंदे सेना आणि बसपाने एकत्र येत नवीन गट तयार केला आहे. सहा नगरसेवकांच्या या गटाचे गटनेता डॉ. राजेंद्र तायडे हे आहे. या नवीन राजकीय समीकरणाचा स्थायी समितीसह इतर समितीच्या निवडणुकीमध्ये प्रभाव पडणार असे चित्र दिसू लागले आहे. महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवकांच्या निवडणुकीतही यामुळे प्रभाव पडणार आहे. महानगरपालिकेच्या २२ प्रभागातून ८७ नगरसेवक निवडून आले होते. मनपा मध्ये भाजपाचे २५ सदस्य आहे. त्या व्यतिरिक्त युवा स्वाभिमान पार्टीचे १५,काँग्रेस १५, एमआयएम १२,राकाँपा अजित पवार ११,शिवसेना शिंदे ३, शिवसेना उबाठा २,बसपा ३, वंचित बहुजन आघाडीचा☞(पान २

# लाडकी बहीण योजनेसाठी आता आधार प्रमाणीकरण

## ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत

अमरावती/प्रतिनिधीः-

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लाभार्थी महिलांनी ई-केवायसी





प्रक्रिया पूर्ण केली आहे. तथापि, सदर प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ☞(पान २ वर)

# इंग्रजीच्या पेपरला विभागात २२ कॉपीबहाद्दर

## -वाशिममध्ये सर्वाधिक प्रकरणं


**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यभरात बारावीच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी शिक्षण विभागानं कंबर कसली आहे. भरारी पथकं तर तैनात आहेतच, पण सीसीटीव्ही तसंच ड्रोनद्वारे देखील परीक्षा केंद्रांवर नजर ठेवली जात आहे. तरी देखील काही परीक्षा केंद्रावर कॉपी होत असल्याचं दिसून आलं आहे. अमरावती विभागात आज पहिल्या



दिवशी इंग्रजी चा पेपर देताना २२ कॉपी बहाद्दर पकडण्यात आले आहे. यामुळे कॉपी रोखण्यासाठी शिक्षण विभागाच अपयशी ठरल्याचं दिसून येत आहे. अमरावती विभागात १ लाख ५७ हजार २६७ विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवशी ५४३ केंद्रांवर इंग्रजीचा पेपर दिला. अमरावती☞(पान २ वर)

# दुपारी झोपण्यासाठी गेलेल्या तरुणाचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** जेवण झाल्यावर दुपारी झोपण्यासाठी गेलेला २९ वर्षीय तरुण पुन्हा उठलाच नाही. झोपेतच त्याचा मृत्यू झाल्याची घटना सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत समोर आली आहे. रोहित रमेश गजभिये (२९,समाधान नगर) असे मृतक तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार रविवारी दुपारी रोहित गजभिये याने जेवण केले आणि चार वाजता तो आईला सांगून झोपण्यासाठी आपल्या बेडरूम मध्ये गेला. रात्रीचे साडेनऊ



वाजले पण तो उठला नाही. यामुळे त्याची आई त्याला आवाज देण्यासाठी गेली. आवाज दिल्यावर ही त्याने काही प्रतिसाद दिला नाही. त्याच्या शरीरातून काही हालचाली पण होत नव्हत्या. त्यामुळे आई घाबरली. त्यांनी तात्काळ☞(पान २ वर)

# चिखलदरा येथे पर्यटन विकासासाठी प्रयत्न करणार

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा येथे स्काय वॉक, गोलमार्ग, ग्लो गार्डन, मधाचे गाव आमझरी आदी उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनातर्फे पाठपुरावा करण्यात येत आहे. चिखलदरा परिसरात पर्यटन क्षेत्र विकासाला वाव असून याठिकाणी पर्यटकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात पर्यटन आणि पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. येरेकर यांनी चिखलदरा येथे सिडकोमार्फत स्कायवॉकचा आढावा घेतला. स्कायवॉकची लांबी असल्याने मध्यभागी आधार द्यावा लागणार आहे. यासाठी वनविभागाची परवानगी घेण्यात आली आहे. या स्कायवॉकला कायमस्वरूपी आधार द्यावा लागणार असल्यामुळे या भागातून माकड किंवा इतर प्राणी चढून जाऊ नये, म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. यासोबतच २७ किलोमीटरचा गोलमार्ग तयार करण्यात येणार आहे. वन क्षेत्रातून जाणाऱ्या मार्गासाठी वनविभागाची परवानगी घ्यावी. तसेच ग्लो गार्डनसाठी शक्यता तपासून पहाव्यात. चिखलदरा येथे पर्यटन वाढीसाठी नवीन प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. याठिकाणी ट्रेकींगचे पर्याय दिल्यास पावसाळ्यानंतर मार्चपर्यंत पर्यटक येतील. यासाठी वन विभागाने ट्रेकचे मार्ग निश्चित करावेत. पर्यटनामुळे चिखलदरामध्ये क्रांती घडू शकते. त्यामुळे येथे पर्यटकांना सुविधा द्याव्यात. पीएम मित्रा पार्कमधील महापारेषणने उपकेंद्राचे काम सुरू करावे. यासाठी आवश्यक असणारे ☞(पान २ वर)

# महापौर तेजवानी यांनी घेतला शहराचा आढावा

### स्वच्छता, प्रधानमंत्री आवास, ई-बस व आर्थिक स्थितीवर चर्चा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावती महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहराशी निगडित विविध विकासात्मक, आर्थिक व नागरी सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



या बैठकीत स्वच्छता व्यवस्था, प्रधानमंत्री आवास योजना, ई-बस सार्वजनिक वाहतूक सेवा, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती, मालमत्ता कर वसुली, महानगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत, झोन कार्यालयांची कार्यप्रणाली, ट्रान्सपोर्ट नगर येथे नवीन मार्केटची उभारणी तसेच बडनेरा येथील सोमवार बाजार येथे नव्याने बाजारपेठ विकसित करण्याबाबत आढावा घेण्यात आला. महापौर श्रीचंद तेजवाणी☞(पान २ वर)

# जानवी दाभाडे व झोया फातिमा यांचे राष्ट्रीय स्तरावर यश

**अचलपूर/प्रतिनिधीः-** जगदंब महाविद्यालय अचलपूर येथील वनस्पतिशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी परिषदेत उल्लेखनीय यश संपादन केले. श्री शिवाजी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अकोला येथे दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय विद्यार्थी परिषदेत जानवी दाभाडे हिने पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच झोया फातिमा हिने ओरल प्रेझेंटेशन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.



या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रमाकांत शेरकार, व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश कोहळे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा खापेकर, प्रा.डॉ. विशाल देशमुख,☞(पान २ वर)

# राजपूत ढाबा मार्गावर भीषण अपघात; दोघांचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राजपूत ढाबा मार्गावरील पेट्रोलपंपाजवळ बोलेरो वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दोघाचा मृत्यू झाला. एका दुचाकीस्वारांचा जागीच आणि दुसर्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि.९) रात्री घडली. अपघातानंतर बोलेरो चालक पसार झाला असून, गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मृतांमध्ये भारत आठवले (वय ५४) आणि दिनेश जोशी (वय ३५, दोघेही रा. कुंडखुर्द) यांचा समावेश आहे.




भारत आठवले आणि दिनेश जोशी हे दोघेही एमएच २७ आर ६९१६ क्रमांकाच्या दुचाकीने लालखडी येथून कठोरा नाक्याकडे जात होते. राजपूत ढाबा मार्गावरील पेट्रोलपंपाजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या बोलेरो वाहनाने त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघेही रस्त्याच्या कडेला फेकले गेल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. भारत आठवले यांचा ☞(पान २ वर)

# राजापेठ परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम

## -आस्थापनावर ५ हजारांचा दंड

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगर पालिकेच्या वतीने आज दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी झोन क्र. २ अंतर्गत राजापेठ परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम राबविण्यात आली. ही मोहीम राजापेठ पोलीस स्टेशन ते राजकमल चौक दरम्यान राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान एकूण २०



आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अनेक आस्थापनांमध्ये कापडी व कागदी पिशव्या तसेच ५१ मायक्रोनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, एका आस्थापनामध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर सुरू असल्याचे ☞(पान २ वर)